

# माझी मैना गावावर राहिली

मीना मेनन, नीरा आडारकर

### आपली महामुंबई

चारशे वर्षांपूर्वी ब्रिटिशांना आंदण मिळालेली मुंबई म्हणजे डासांनी आणि रोगराईने ग्रासलेला, गर्द झाडीने व्यापलेला आणि प्रामुख्याने मच्छिमार कोळी आणि आगरी लोकांची वस्ती असलेला सात बेटांचा समूह होता. आठ वर्षांनी ब्रिटिश राजवटीने ही बेटं ईस्ट इंडिया कंपनीच्या स्वाधीन केली. एक शतक उलटून गेल्यावर कंपनीने या नैसर्गिक बंदराचा वापर सुरू केला, तो प्रथम चाच्यांपासून संरक्षण करायला. गुजरातमधल्या सुरत शहराचं महत्त्व एक व्यापारी बंदर म्हणून कमी झालं, तेव्हा ईस्ट इंडिया कंपनीला या सात बेटांच्या समूहाचा एक नैसर्गिक बंदर म्हणून विकास करावासा वाटला. फ्रेंच, मराठे, शिद्दी वगैरे जमातींच्या आक्रमणांपासून संरक्षण करता करता ब्रिटिशांनी या सात बेटांवर पूर्ण जम बसवला. 18व्या शतकाच्या मध्यापर्यंत एकमेकांपासून वेगवेगळी असणारी ही बेटं जोडली गेली. 1661मध्ये केवळ दहा हजार वस्ती असलेल्या मुंबईने 1780पर्यंत एक लाख लोकांना आश्रय दिला. 1830मध्ये अडीच लाखाच्या आत असलेली वस्ती 1891मध्ये मुंबईची लोकसंख्या आठ लाख एकवीस हजारापर्यंत पोहचली. 1951मध्ये 25.3 चौरस मैलांच्या या परिसरात वीस लाख तीस हजार लोक सामावले गेले. आज मुंबईची लोकसंख्या एकशे वीस लाख आहे.

सुरुवातीला रोगट वातावरण असलेल्या या मुंबईचा कायापालट व्हायला अनेक कारणं होती. सुरत शहराचं महत्त्व कमी होणं, मराठ्यांचा पराभव होणं या वस्तुस्थितीबरोबरच ब्रिटिशांनी मूलभूत सुविधा उभारायला सुरुवात केल्यामुळे रस्ते, रेल्वे, टपाल आणि तार सेवा याचं जाळं तयार होऊ लागलं. सुवेझ कालवा उघडला गेल्यामुळे भारताचा आंतरराष्ट्रीय व्यापार वाढू लागला. एक नैसर्गिक बंदर म्हणून मुंबई या व्यापाराचं महत्त्वाचं केंद्र बनली. शहराचा विकास करण्याच्या या प्रक्रियेत ग्रामीण जीवनाचा आणि रोजगाराचा विविध प्रकारांनी ऱ्हास होत गेला. ब्रिटिश राज्यकर्त्यांच्या धोरणांमुळे ग्रामीण शेतीप्रधान व्यवस्था आणि कारागिरी यांना आर्थिक फटका बसला. लोकांचं पोषण करायला केवळ शेतीव्यवसाय असमर्थ ठरल्यामुळे शेतकऱ्यांना शहराच्या दिशेने स्थलांतर करणं भाग पडू लागलं.

थोडक्यात सुमारे 1850पासून मुंबई ही 'बडी बांका नगरी' बनण्याच्या दिशेने वाटचाल करू लागली होती. जागतिकीकरणाच्या अर्थव्यवस्थेत आज कळीचं स्थान मिळालेल्या या मुंबईच्या आर्थिक विकासाचा इमला उभारला तो इथल्या कापड उद्योगाने.

**विष्णू बयाजी शिंदे (वय 74 वर्षे)**

गिरणी कामगारांच्या दुसऱ्या पिढीचे प्रतिनिधी. कमला मिलमधली नोकरी 1982च्या प्रदीर्घ संपानंतर सुटली. सध्या प्रभादेवी येथील सिल्वर अपार्टमेंटमध्ये लिफ्टमनची नोकरी करतात.

आमचं गाव जाखण. सातारा जिल्ह्यातल्या खटाव तालुक्यामध्ये होय. तिकडून माझे वडील आले मुंबईत. हा जो काळ हाय ना माझ्या वडलांचा तो गेल्या शतकातला. त्यांचा जन्म 1864चा. 1890च्या आसपास ते मुंबईत आले. म्हणजे शंभर वर्षांपूर्वी. कारण आमच्याकडे जमीन न्हाइच जवळजवळ.

गावचे तीन-चार लोक मुंबईत होते तेव्हा. त्यांच्याबरोबर आले असतील. त्यावेळेला देशावरचे लोक पहिले गोदीत लागायचे. तिथे पोट भरायची व्यवस्था व्हायची. मोठमोठे धंदे होते ना. दगडी कोळसा बोटीने यायचा. त्याचा चढउतार इथे व्हायचा. गिरणभाग वाढला तेव्हा मग गिरणीत कामाला लागायचे. वडील थोडे दिवस जी.आय.पी.रेल्वे म्हणजे आताची सेंट्रल रेल्वे मध्ये कामगार होते. मग ते डोळ्यांनी जरा अधू झाल्यावर अनपेड झाले. म्हणजे नोकरी गेली. हिन्दुस्थान मिल ठाकरसीची, तिथे एक हेडक्लार्क होते पाटणकर म्हणून. ते आमच्या नात्याचे होते. त्यांनी वडीलांना कामाला लावलं.

माझा थोरला भाऊ 1900 सालात जन्मलेला. त्याच्यानंतर तीस वर्षांनी मी. मध्ये दहा मुलं झाली. पण ती गेली. मी अकरावा. तो भाऊ 15 वर्षांचा असताना त्याच्या मित्राच्या मामाच्या ओळखीने ब्रॅडबरी मिलमध्ये म्हणजे तेव्हाची नानाभाई मिल नोकरीला लागला. तेव्हा 18 वर्षांच्या खालच्या कामगाराला अर्ध्या पासाची पद्धत होती. अर्धा पास आणि अर्धा पगार.

वडील मुंबईला आल्यावर आग्रीपाड्याची बी.आय.टी. चाळ हाय ना, अजून हाय, तिकडे राहायला लागले. चाळ नंबर तेरामध्ये. वडीलांचे लग्न झाला होते. नंतर आईपण आली. मी बी.आय.टी. चाळीतच वाढलो.

**गिरण्या आणि चाकरमाने**

मुंबईची पहिली भारतीय कापडगिरणी होती 'द बॉम्बे स्पिनिंग मिल'. 1851मध्ये कानसजी नानाभाई दावर या पारशी उद्योजकाने ताडदेवला ही गिरणी बांधली. ब्रिटिशांनी सुरतेमधून मुद्दाम बोलावून घेतलेले पारशी हे सुरुवातीच्या स्थलांतरित जमातीपैकी होते. प्लॅट ब्रदर्स या ब्रिटिश कंपनीच्या मदतीने उभ्या केलेल्या या गिरणीत मुंबईतल्या जवळ जवळ पन्नास उद्योजकांनी पैसा ओतला होता. ही गिरणी चालू झाली 1854मध्ये. याच व्यवस्थापनाने 'बॉम्बे थ्रॉटल मिल' बांधली. 1857मध्ये ती 'अलायन्स मिल' या नावाने ओळखली जाऊ लागली. या दोन्ही गिरण्या चांगल्या चालू लागल्यामुळे माणेकजी पेटीट या आणखी एका पारशाने 1858मध्ये 30 हजार साचे असलेली 'ओरिएन्टल मिल' काढली. ही पहिली संयुक्त गिरणी. या आधी फक्त सूत उत्पादन होई. आता त्याचा कपडाही बनू लागला. पारशी, भाटिया, खोजा आणि ज्यू या धंद्यात उतरले. यातील अनेकांनी याआधी अफूच्या व्यापारात बराच पैसा मिळवला होता. 1860 साली रॉयल मिल, कुर्ला मिल, बॉम्बे युनायटेड, ग्रेट ईस्टर्न या गिरण्या चालू झाल्या. अल्बर्ट मिल 1867 साली, अलेक्झांड्रा 1869 साली तर मोरारजी 1870 साली चालू झाल्या. 1870पर्यंत मुंबईत एकूण 13 गिरण्या निघाल्या. त्यात 8100 कामगार कामाला होते.

अमेरिकन यादवी युद्धापर्यंत भारतामधून ब्रिटन केवळ 20 टक्के कापूस आयात करत होता. पण युद्धामुळे ब्रिटनला भारताच्या कापसावर अवलंबून राहायला लागलं. 1865मध्ये जेव्हा अमेरिकेमधलं युद्ध थांबलं तोपर्यंत मुंबईतल्या कापसाच्या व्यापाराने आठ कोटी स्टर्लिंग पौंडांची कमाई केली होती. शहरातल्या या प्रचंड आर्थिक तेजीमुळे शेअर बाजार अभूतपूर्व फोफावला. 1876पर्यंत मुंबईत 31 बँका, 8 रेक्लमेशन कंपन्या, 10 गोदी उद्योग, 20 विमा कंपन्या

आणि 62 स्टॉक कंपन्या होत्या. दक्षिण मुंबईतला रेक्लमेशन प्रकल्प याच काळातला. मुंबईतला प्रसिद्ध राजाबाई टॉवर ज्याने बांधला तो प्रेमचंद रायचंद कापूस धंद्यातला 'कॉटनकिंग' म्हणून प्रसिद्ध होता. एशियाटिक बँक ही त्याच्याच मालकीची होती. पण अमेरिकेतलं यादवी युद्ध थांबलं आणि वरील बहुतेक सर्व कंपन्यांचं दिवाळं वाजलं. दोन महिन्यांतच मुंबईच्या उद्योगाला प्रचंड धक्का बसला. जवळजवळ एका रात्रीत कापसाच्या किमती कोसळल्या. शेअर मार्केट ढासळलं आणि शेकडो सट्टेबाजांचं दिवाळं वाजलं. कोलमडलेला हा गिरणी धंदा सावरायला 1870 साल उजाडावं लागलं.

मुंबईच्या कापडधंद्याचं इंग्लंडमधल्या लँकशायर शहरातल्या कापडधंद्याबरोबर सुरुवातीला जवळचे संबंध होते. गिरण्यामधील मशिनींबरोबर त्यांचं तंत्रज्ञान आणि व्यवस्थापन यासाठी इथला गिरणीधंदा लँकशायरवर पूर्णपणे अवलंबून होता. मुंबईची नुकतीच सुरुवात असल्याने लँकशायरला तसा स्पर्धेचा धोकाही नव्हता. जमशेदजी टाटा या उभरत्या उद्योजकाने 1869मध्ये अलेक्झांड्रा गिरणी आणि पाठोपाठ 'सेन्ट्रल इंडिया स्पिनिंग अॅण्ड वीव्हिंग कंपनी' काढली. 1886मध्ये 'स्वदेशी मिल' आणि जमशेदजींच्या मृत्यूनंतर 'टाटा मिल' सुरू झाली. मोरारजी गोकुळदासने 1870मध्ये आपली पहिली गिरणी उभी केली आणि पाठोपाठ अनेक गिरण्या उभारल्या. ठाकरसी मूळजी यांची 'हिंदुस्थान स्पिनींग अॅण्ड वीव्हिंग मिल' 1875 साली कपडा बनवायला लागली. गिरणी धंदा तेजीत चालू झाला. पुढल्या दहा वर्षांत आणखी 21 नव्या गिरण्या मुंबईत धूर ओकू लागल्या आणि शंभर वर्षांत गिरणी धंदा हा मुंबईच्या आर्थिक उलाढालींचा उगमस्त्रोत बनला. सबंध भारतामधल्या आर्थिक गुंतवणुकीच्या 25 टक्के गुंतवणूक ही फक्त मुंबई शहरात होती. 1865मध्ये मुंबईत असलेल्या दहा गिरण्यांमध्ये शहरातल्या आठ लाख लोकवस्तीपैकी जेमतेम 6600 कामगार नोकरीला होते. तर 1892मध्ये 1 लाख कामगार गिरणी धंद्यात लागले. त्यांपैकी वीस हजार स्त्रिया होत्या.[1]

मुंबईच्या जवळपास असलेल्या गरीब ग्रामीण विभागाने या गिरण्यांना भरपूर कामगार मिळवून दिले. सुरुवातीला कोकणपट्टीतून आणि नंतर सातारा, सोलापूर या घाटावरच्या भागातून गिरणीमालक आपल्या सुपरवायझरना (त्यांना नंतर 'जॉबर' हे नाव पडलं) कामगार आणायला गावी पाठवत. गिरणी कामगार बनायला सुरुवातीला काही खास कौशल्य लागत नसे. तरीही कोंदट आणि डासांनी भरलेल्या मुंबई शहरात यायला गावचे लोक फारसे उत्सुक नसत. रेल्वे चालू होण्याआधी कापूस मुंबईत यायचा तो सुरत बंदरातून समुद्रमार्गे. तिथून तो मँचेस्टरला निर्यात होत असे. या काळात गुजराथमधून अनेक लोक कामानिमित्त मुंबईत स्थलांतरित झाले. ब्रिटनमधल्या गिरण्यांना कापूस पुरवण्यासाठी ब्रिटिश सरकारने पुढे महाराष्ट्रात कापसाच्या लागवडीला उत्तेजन देण्याचं धोरण अंमलात आणलं. 1853 साली सरकारने पहिली रेल्वेलाईन सुरू केली. लवकरच ती गुजरात आणि खानदेशच्या कापूस पिकविणाऱ्या भागात नेण्यात आली. निर्यातीसाठी आणि मुंबईत उभ्या राहणाऱ्या गिरण्यांच्या विकासासाठी याचा फायदा झाला. जहाजबांधणीसाठी आणि नवीन रेल्वे रूळ टाकण्यासाठी आवश्यक असलेल्या लाकडाचा पुरवठा करण्यासाठी रत्नागिरी जिल्ह्यातल्या वृक्षतोडींवर असलेले निर्बंध तिथल्या कलेक्टरने 1829 सालीच उठवले होते. पुढच्या 20 वर्षांतच याचे पर्यावरणीय आणि आर्थिक दुष्परिणाम दिसू लागले. दाट जंगलाचं संरक्षण गेल्यामुळे डोंगरकड्यावरच्या मातीची पावसात धूप होऊन भातशेती नष्ट झाली. नद्यांच्या मुखांमध्ये साचलेल्या धुपींच्या गाळामुळे समुद्रामार्गे होणारा व्यापार ठप्प झाला. जो जिल्हा तांदळाची निर्यात करत असे, तो आता दुष्काळपीडित, अर्धपोटी शेतकऱ्यांची, मुंबईतल्या गिरण्या आणि गोदीमध्ये मजुरीसाठी निर्यात करू लागला. 1911मध्ये मुंबईच्या गिरणी कामगारातले दोनतृतीयांश कामगार याच रत्नागिरी

जिल्ह्यातले होते. गिरणीमालकांनी कामगारांना राहण्यासाठी चाळी बांधायला सुरुवात केली. सुरुवातीला एकेकटे कामगार, मग पुरुष नातेवाइकांबरोबर आणि मग बायकामुलांसकट राहू लागले. हळूहळू मुंबई शहर वसू लागलं. गिरणी कामगारांच्या ऐतिहासिक ठरलेल्या 1982च्या संपापर्यंत मुंबईत 55 गिरण्या होत्या आणि त्यात 2 लाख 50 हजार कामगार रोजगारीवर होते.

कोकणातल्या मनीऑर्डर अर्थव्यवस्थेचा उगम गिरणीमधील चाकरमान्यांमुळे झाला. शेतीपासून उत्पन्न कमी, इतर उद्योगधंदे नाहीत, त्यामुळे कोकणात राहणारी बहुसंख्य कुटुंबं मुंबईतल्या चाकरमान्यांनी पाठवलेल्या पैशांवर जगत. या आर्थिक संबंधांचा परिणाम, कोकणपट्टी आणि मुंबई यांच्यातल्या सामाजिक, राजकीय आणि सांस्कृतिक संबंधांवरही झाला. रेल्वे सुरू झाल्यावर घाटावरच्या सांगली, सातारा, पुणे इथून लोक मुंबईत गिरणी कामगार म्हणून काम करू लागले. घाटावरची जमीन कोकणापेक्षा सुपीक, तरीही वाढत्या कुटुंबासाठी त्यातून मिळणारं उत्पन्न पुरेसं नव्हतं. मग पुणे आणि मुंबई इथे नोकरीसाठी स्थलांतर चालू झालं.

### एस. एस. मिरजकर (1898-1980)

माजी महापौर, 'गिरणी कामगार युनियन' हे अनेक दशकं सक्रिय असलेल्या संघटनेच्या आरंभीच्या काळातले साक्षीदार. पहिले कम्युनिस्ट महापौर. 'अंधारातून प्रकाशाकडे' या त्यांच्या आत्मचरित्रातून खालील उतारा घेतला आहे.

धरमतरला चार आण्यांचं तिकीट काढून बोटीत बसलो आणि मुंबईच्या धक्क्याला येऊन थडकलो एकदाचे. धक्क्यापासून नळबाजारात यायला रेकली मिळत. रेकलं म्हणजे बैलगाडीसारखं वाहन असे. अगदी स्वस्त. बसायला गादीगिरदी. पाठीमागे एक दरवाजा. एखाद्या बॉक्सप्रमाणे बंदिस्त. चार माणसं बसत त्यात. पण आम्ही धक्क्यावरून चालतच निघालो, समुद्राच्या लाटांच्या आवाजाच्या पार्श्वभूमीवर. खिशात चार दमड्याही नसताना अनवाणी पावलांनी बोचकं खांद्यावर घेतलेली माझी आई आणि भिरभिरत्या डोळ्यांनी या विराट शहराकडे पाहणारा मी. रस्ता पायी तुडवू लागलो. मी फक्त तेरा वर्षांचा होतो...

आईला एका गिरणीत कॉटन-पिकरची नोकरी मिळाली. त्यावेळी मुंबईच्या गिरण्यांमध्ये खूप स्त्रिया नोकरीला असत. आता त्यांचं प्रमाण हटलंय. त्यांना पुरुषांपेक्षा कमी पगार मिळे. काम कष्टाचं. घरदार, मुलं सांभाळून मामूली पगारात गुरासारखं राबावं लागे. गिरणीत माझ्या आईलाही मामूलीच पगार होता. माझं शिक्षण चालवण्याइतपतही पैसे राहत नव्हते...

– मुंबईच्या विराट व्यक्तिमत्त्वाची ओळख मला पटली. इथे बोलली जात नाही अशी भाषा नव्हती. तमाम सगळ्या जातीचे, धर्माचे, प्रांतातले लोक आपापली वैशिष्ट्ये टिकवून नांदत होते. पारशी, मारवाडी, गुजराथी, इंग्रज, ख्रिश्चन, बंगाली, पंजाबी–किती प्रकार सांगावेत? या शहराला गतिमान, झपाटलेलं, उद्योगी असं एक व्यक्तिमत्त्व होतं. कुणालाही आकर्षून घेईल असं...
– आम्ही राहत होतो त्या ठिकाणी कोकणातून, घाटावरून आलेला कामगार राहत असे. कोकणातला माणूस अधिक स्वच्छ, नीटनेटका, सडसडीत आणि ब्राह्मण नसला तरी बरेच शुद्ध मराठी बोलत असे. घाटावरचे लोक अंगकाठीने जबरदस्त, कुस्त्या करणारे, तालमीत जाणारे. कोकणातले लोक इतक्या प्रमाणात तालमीत जात नसत, पण मारामारीत महावस्ताद.

### दादा सावंत (वय 65 वर्षं)

लालबागला जाम मिल कंपाउंडमधल्या चाळीत वास्तव्य. गिरणगावच्या समाजकल्याण केंद्रात सरकारी नोकरी होती. निवृत्तीनंतर गिरणी कामगार संघर्ष समिती आणि रोजगार हक्क समितीत सक्रिय.

आमचे वडील, काका वगैरे मुंबईत आले ते 1938च्या सुमाराला पैसे मिळवायला. कारण कोकणात सगळे शेतीवरच

गुजराण करणारे होते. फक्त भातशेती होती आणि एकच पीक वर्षातून निघायचं. देशावर कशी सपाट जमीन असते. म्हणून सातत्याने काम करायला बरं पडतं. आमच्याकडे डोंगरांमुळे प्रत्येकाच्या वाट्याला तुकडे तुकडे येतात. त्यामुळे शेती करायला कठीण. पाण्याची व्यवस्था काय नाय. फक्त पावसावर अवलंबून. म्हणजे डोंगरावर तशी नाचणी व्हायची. पण जमीन वरकड. पाच-सहा महिने पुरेल एवढंच धान्य निघायचं. मग येरे माझ्या मागल्या. शिमग्यानंतर पाऊस पडेपर्यंत नदीला पाणी नाय. विहिरीमध्ये थोडं फार असायचं. मग आजूबाजूच्या वाडीतल्या बायका एकत्र येऊन वांगी, दोडकी, पडवळ अशा भाज्या काढायच्या. पावसाळ्यात आम्ही फणसाच्या आठल्या उकडून खायचो. आमच्या देवगड, कणकवली भागात तर पाणी अजिबात नाय. कुडाळ ते गोवा या भागात मात्र दोन पिकं काढायचे. नारळी, पोफळी, काजू अशी उत्पादनं काढायचे. कोकणातला मधला पट्टा तसा मागासलेलाच हाय.

गावात जाती चिक्कार. शिवाय बारा बलुतेदार. सुतारकाम, गवंडीकाम, विटकाम, हातमाग असे धंदे असणारे. पण धंदा फारसा चालेनासा झाला तसे ते पण मुंबईकडे वळले. दलितांची वस्ती वेगळी. पण गावातली पालखी ओढायचा पहिला मान त्यांचा. मात्र बाकी काय सुद्धा एकत्रित नाय. भेदभाव खूप होता. दलित मुंबईला आले, शिकले, त्यांच्यावर उच्चवर्णीयांचे संस्कार झाले. 1945 सालानंतर. तसे जत्रेला मात्र आता सर्व एकत्रित येतात.

पगार तसा कमीच होता. लोक शिकलेले नव्हते ना. फारतर व्हर्नाक्युलर फायनल. म्हणजे खूपच. मुंबईत चाळीत राहायचं 8 × 10 खोलीत, गाववाल्यां- बरोबर. खाणावळ होतीच जेवायला. चाळीत असायच्या खाणावळ चालवणाऱ्या बायका. लोक बिऱ्हाडं नाय करायचे. एकेकट्याने पण एकत्र राहायचे. आमचे वडील सांगायचे की त्यावेळी चाळीत रिकाम्या खोल्या होत्या. हां. पण कधी वाटलाच नाय ना की हे आपलं घर म्हणून. आपला तो गावच. पेरणीसाठी गावाला जायचं महिनाभर. गिरण्यांतून रजा पण मिळायची. शिवाय ठराविक सणावाराला पण जायचं. गावची जत्रा, गणेशचतुर्थी, पालखी, सगळे सण तेव्हा गावाकडे.

पूर्वी एकत्रित कुटुंबातला एखादा भाऊ मुंबईत असायचा चाकरमाना. तो सर्व कुटुंबाला शेतीला, घराला पैसे पाठवायचा. मग दुसरे भाऊ पण मुंबईत नोकरीला यायला लागले. एखाद दुसरा माणूस गावाकडे राह्यचा. नंतर हे भाऊ आपापल्या बायकापोरांसाठी वेगवेगळे पैसे पाठवायला लागले. बिऱ्हाडं वेगवेगळी झाली. मुंबईतही यायला लागली.

**विष्णू बयाजी शिंदे (वय 74 वर्षे)**

गिरणी कामगारांच्या दुसऱ्या पिढीचे प्रतिनिधी.

होळीचा जन्म हाय माझा. 1930 सालचा. आता या शिल्वर अपार्टमेंटमध्ये मी लिफ्टचं काम करतो. वीस वर्षांपासून, लिफ्टमन. तसा मी वारकरी आहे पंढरपूरचा. तिथे अलिबागकर नावाचा मठ आहे. प्रसिद्ध आहे. त्यांचंच विठ्ठल रखुमाईचं मंदिर इथे दादर, गोखले रोड साऊथला आहे, माझा मुक्काम तिथेच असतो. राह्यला मी कुटुंबामध्ये घरी थांबत नाही. ते स्ट्राईक झाल्यापासून. 82चा दत्ता सामंतांचा स्ट्राईक. मी इथेच आलो. तसा आधी असायचोच. आता वळणच पडलं. न्हाणं-धुणं मंदिरातच. कपडे घरी असतात, पण अंथरूण पांघरूण इथेच. पहिली बरीच माणसं येत होती या मंदिरात. पण मिल बंद पडल्याच्या नंतर सोडून गेली. गिरणीचाच वर्ग होता. भजनग्रुप होता. मग बिल्डर रविशेट म्हणून हायेत त्यांनी ही जागा विकत घेतली. आशिषभवन बांधलं आणि मंदिर पण परत बनविला. त्यांनी विचारलं, लिफ्टची नोकरी जमेल काय? म्हटलं, जमेल. वारकरी म्हणून ते मला मानायचे. पहिले 300 रु.पगार होता. आज 1900 हाय. ज्याचं जमण्यासारखं नव्हतं ते कामगार गावी गेले. आमची उधळपट्टी नसल्यामुळे आमचं जमून जात होतं. तेव्हा आमचा मुलगा बारा वर्षांचा होता. वाडीतल्या मुलांना तिकडचे एक-दोन दुकानदार मदतीला घेऊन जायचे. माझा मुलगा गणपतीच्या मंडपवाल्या

कॉन्ट्रॅक्टरकडे जायला लागला. 5-6 रुपये दिवसाला मिळायचे. तो आपल्या मनाने गेला. ही कल्पना आम्हांलासुद्धा नव्हती. माझा स्वभाव परंपरेला धरून हाय. आम्ही मुलांना जाणवू दिलं नाय की बेकारी हाय. आमच्या गावची बैठक ना, ती मध्यम लेव्हल. म्हणजे आम्हांला जरा उच्च दर्जाने जोखतात. गावी आम्हांला मानसन्मानाने वागणूक हाय. आमचं उत्पन्न कमी, जमीन कमी, पण भावकीत मान देतात. माझ्या आजोबांना पाच मुली होत्या. त्यावेळच्या संस्कृती आणि संस्कारांमुळे हुंड्यामध्ये जमीन गेली. फक्त चार एकर उरली. तीन भाऊ, त्यांची कुटुंबं. म्हणजे आमची गरीबीच चालून आली.

आता थोरल्या भावाचं कुटुंब फक्त त्या जमिनीवर जगतं. तशी घाटावरची जमीन चांगली असते, तीन प्रकारची. कंप्लीट काळी जमीन पिकाला उत्तम. पाणी धरून ठेवते. सफेत जमिनीवर घरं बांधतात आणि लाल तांबूस जमीन म्हणजे कोकणात असते तशी, तिला माळरान म्हणतात. ज्वारी, बाजरी आणि गहू ही मेन पिकं वर्षभरातली. उत्पन्न लवकर काढण्यासाठी घेवडा लावतात. पूर्वी पाण्याचा बंदोबस्त नव्हता. पावसाळी शेती केली जायची. विहिरी एवढ्या नव्हत्या. व्हाळ म्हणजे ओढा असेल तिथे धरण बांधून शेती केली जायची. आता खताने दोन पिकं निघतात. कोकणातल्या लाल मातीसारखी जमीन आमच्या डोंगराच्या कठडीला असते. त्यात भात पिकवतात. लाल मातीच्या माळरानात मटकी, आंबाडी, हुलगे असं होतं. हुलगे म्हणजे कोकणात त्याला कुळीथ म्हणतात ते.

मग मुंबईला लोक का यायचे? जमिनीच्या बाबतीत निराधार झाले की यायचे. जसे माझे वडील आले. नाहीतर दुसरं कारण म्हणजे हौशीने येणारे, म्हणजे घरात, कुटुंबात ज्याचं पटत नाय ते रागाने यायचे. दुसरीकडे पोट भरेन, हिमतीने राहीन असं म्हणून.

कामगारांना नोकरी आणि खोली मिळाली तरी कामाच्या ठिकाणी स्थिती अत्यंत वाईट होती. गिरण्यातल्या स्पिनिंग विभागात आवश्यक तपमान आणि आर्द्रता राखण्यासाठी बॉयलरची गरम वाफ सोडली जाते. यामुळे 90 अंश ते 100 अंश सेल्सिअस तपमान निर्माण होतं. एवढं उच्च तपमान सुतासाठी योग्य असलं तरी कामगारांसाठी हा उष्मा भयंकर असे. त्यामुळे अर्धी चड्डी आणि बनियन हा कामगारांचा अघोषित गणवेष बनला. कापड खात्यातल्या साच्यांच्या घणाघाती आवाजामुळे कामगारांच्या ऐकण्याच्या क्षमतेवर अल्पकाळातच वाईट परिणाम होई. कापसाच्या बारीक कणांनी गिरण्यातलं अवकाश भरून जाई. श्वसनाचे रोग विशेषत: दमा आणि क्षय या रोगांचे, कामगार हमखास शिकार बनत. सुरुवातीला कामाचे तास सूर्योदयापासून सूर्यास्तापर्यंत असत. पुढे विजेचे दिवे आल्यावर तर कामाचे तास आणखी वाढले. कामाचा पगार मात्र मालकाच्या मर्जीवर असे. कधी मजुरी कमी होई तर कधी उशिरा मिळे. कामगारांचं नोकरीला लागताना सरासरी वय 17 होतं. पण या परिस्थितीमुळे 45 वर्षांपर्यंतसुद्धा ते नोकरीत टिकू शकत नसत. बालमजूरी बेकायदेशीर होती, तरीही 1892मध्ये बालकामगारांचं प्रमाण एकूण कामगारांच्या 5.6 टक्के इतकं होतं. अनेक वेळा वयाच्या मानाने अंगापिंडानं मोठ्या दिसणाऱ्या आपल्या 10-12 वर्षांच्या मुलांना कामगारच नोकरीला पाठवत.

गिरणीमालक कामगारांचा पगार त्यांच्या मर्जीनुसार कमी करत. आणि अनियमितपणे देत. कामाचा दर्जा मालकाच्या पसंतीस उतरला नाही तर कामगाराला दंड भरावा लागे.1870 ते 80च्या दशकात हा दंड 2 ते 4 आणे होता. हा दंड म्हणजे त्या वेळच्या कामगाराच्या रोजच्या पगाराचा अर्धा हिस्सा वा पूर्ण पगार होता. याहून मोठा दंड म्हणजे कामगाराला गिरण्यातलं कापड विकत घ्यायला लावणं आणि या कापडाची किंमत त्याच्या मासिक पगारातून वळती करून घेणं.[2]

सुरुवातीला गिरण्यांच्या आत किंवा कामगारांच्या घरात घड्याळं नसत. वाफेवर चालणाऱ्या भोंग्यांना म्युनिसिपालिटीने बंदी केली होती म्हणून सकाळी उठल्यावर

कामगार लगेच गिरण्यांच्या दिशेने चालू पडत. अनेकदा उशीर व्हायला नको म्हणून गिरण्यांच्या गेटबाहेरच झोपत. संडास असलेच तर ते दूरवर असत. नसले तर कामगारांना बाहेर कुठेतरी आडोसा शोधावा लागे. प्रत्येक गिरणीत न्हावी येत असे आणि आंघोळीला पाणी असे. चहावाला येई पण जेवण मात्र नसे. फॅक्टरी कमिशनपुढे एका गिरणीमालकाने अशी साक्ष दिलेली दिसते की कामगार त्याचं दुपारचं जेवण साच्यासमोरच उभ्या उभ्या जेवतात. कारण साचे कधी थांबतच नसत. जेव्हा आपोआप त्यांचा वेग कमी होई तेव्हा कामगारांना बाहेर अंधार झाल्याचं समजे. जॉबर लोक हे कामगारांवर देखरेख करण्यासाठी नेमले होते. ते कामगारांच्या कामाचा दर्जा तसंच रोजचे नियमदेखील ठरवत असत. कामगारांचा संबंध मालकाशी क्वचितच येई. जॉबर हेच मालकांतर्फे कामगारांच्या संपर्कात असत. कामगारांची भरती, त्यांचे पगार, सावकारी अशी कामगारांच्या आर्थिक व्यवस्थेची नाडी या जॉबर लोकांच्या हातात असे. त्याबाबत तक्रार करायला सुविधाही उपलब्ध नव्हती.

कामगारांच्या भयानक परिस्थितीविरुद्ध आवाज उठवला तो मुंबईच्या आणि भारताबाहेरच्या सुधारकांनी. यामुळे सरकारने परिस्थिती सुधारण्यासाठी काही पावलं उचलली. अशा सुधारकांमध्ये ना. म. लोखंडे हे नाव गिरणीकामगारांच्या इतिहासात कोरलं गेलं आहे. ना. म. लोखंडे हे मुंबईतले महत्त्वाचे समाजसुधारक आणि कामगार नेते होते. महात्मा ज्योतिराव फुले यांचे अनुयायी असणारे लोखंडे हे कम्युनिस्ट कामगार संघटना अस्तित्वात येण्यापूर्वी गिरणी कामगारांना संघटित करून संघर्षाला प्रवृत्त करणारे पहिले सुधारक होते.[3] 'दीनबंधू' हे सत्यशोधक चळवळीचं मुखपत्र लोखंडे यांनी 1880पासून मुंबईत चालू केलं होतं. कामगारांचे कामाचे तास, त्यांच्या साप्ताहिक सुट्या अशा अनेक मुद्द्यांवर ब्रिटिश सरकारला त्यांनी आपल्या लिखाणाने आणि संघर्षाने धारेवर धरलं. अशा संघर्षामुळे गिरणी कामगारांची लढाऊ वृत्ती घडत गेली. लवकरच कुणा नेत्याशिवाय देखील उत्स्फूर्तरीत्या संघटित होऊन आपल्यावरच्या अन्यायाविरुद्ध संपाचं हत्यार वापरायची धमक त्यांच्यात उपजली.

असं वसलं गिरणगाव

**वसंत पारकर (वय 57 वर्षं)**

चिंचपोकळी गणेशोत्सव मंडळात वाचनालय चालवतात. गिरणी कामगार असलेले पारकर अविवाहित असून आपल्या भावाच्या कुटुंबाबरोबर राहतात.

आमच्या काळी म्हणजे 1950 साली गिरणी कामगारांना कारकुनांपेक्षा जास्त पगार होता. त्यामुळे सगळे लोक गिरणीत लागायला बघायचे. हे कामगार लोक जॉबर लोकांना पैसे पण द्यायचे 'माझ्या पोराला चिकटवा' म्हणून. आता काय तसलं राहिलं नाही. तेव्हा एवढं शिक्षण पण लागायचं नाही ना. आणि एकाच्या पगारात दहाजणांचं भागायचं.

गिरणी कामगारांना गावचं खूप असायचं. अर्धा तर तिकडचाच असायचा तो. पेरणी वगैरे हंगाम असला की सुट्टी घेऊन गावाला जाणारच. कोकणी असला तर भात कापायला आणि घाटावरचा असला तर ऊस. हे नेहमीचंच होतं. मिलवाले स्पेशल सुट्या पण मंजूर करायचे त्याच्यासाठी.

1954 साली एकूण पगार होता66 रुपये 6 आणे महिना. त्यात 30 रुपये बेसिक आणि 36 रुपये 6 आणे महागाईभत्ता. म्हणजे मी लागलो तेव्हा मला पहिला पगार एवढा मिळाला. त्यातले सतरा रुपये जायचे खाणावळीला. कोकणी म्हटला की त्याला मासे लागणारच. म्हणून आमच्या खाणावळीत आठवड्यातून दोनदा मासे असायचे. एकदा मटण वगैरे असायचं. तेव्हा एवढी महागाई नव्हती. त्यामुळे खायची-प्यायची कमी नव्हती. म्हणजे मला आठवतं, एका पैशात एवढी भाजी यायची, की एका माणसाला खाऊन संपणार नाही.

1954मध्ये मी हिंदुस्थान मिलमध्ये होतो. त्या काळात गिरण्यांमध्ये बारा-बारा तासांच्या फक्त दोनच पाळ्या असायच्या. सगळीकडे लाल बावट्याचाच जोर होता. जेव्हा जेव्हा डांगे संपाची घोषणा द्यायचे तेव्हा ती बातमी अशी तोंडीच

सगळीकडे पसरायची. आणि लगेच पटापट सगळ्या गिरण्या बंद व्हायच्या. यंत्रं थांबायची.

गिरणी कामगार लालबाग, परळ, शिवडी अशा गिरण्यांच्या परिसरात राहत होते. काही गिरण्यांच्या आवारात किंवा लगत, गिरणीमालकांनी बांधलेल्या चाळीत वा बैठ्या झावळ्यांच्या झोपडीवजा घरात राहत. सरकारने 'बॉम्बे इम्प्रूव्हमेंट ॲक्ट'खाली कामगारांसाठी घरं बांधायला गिरणीमालकांना स्वस्त दराने दीर्घ मुदतीची कर्जं द्यायला सुरुवात केली. आधी 28 वर्षांची मुदत होती ती पुढे 50 वर्षांपर्यंत केली. एकेका खुराडेवजा खोलीत 6 ते 10 माणसं राहत. वस्ती वाढू लागल्यावर, चाळीच्या पॅसेजमध्ये आणि रस्त्यावर देखील माणसं झोपायला लागली. 1919मध्ये मुंबईच्या 12 लाख वस्तीपैकी 9 लाख लोक अत्यंत घाणेरड्या, एका खोलीच्या घरात राहत होते.[4] चाळीतल्या सार्वजनिक सोयीसुविधांमुळे लोकांमध्ये एक वेगळंच कौटुंबिक नातं निर्माण होई. शिवाय जेव्हा जॉबर आपापल्या गावात जाऊन नवीन कामगार आणत, ते कामगार नंतर आपल्या नातेवाइकांना, आपल्या जातीच्या, आपल्या 'ग्रामस्थांना' आपापल्या गिरण्यांतून नोकरीला लावत असत. त्यामुळे एका गिरणीत किंवा एका चाळीत बहुसंख्य कामगार एकाच गावचे, एकाच जातीचे आणि बरेचदा एकाच कौटुंबिक गोतावळ्याचेदेखील असत. हे राहते परिसर कोकणी व घाटी असे विभागले गेले. अजूनही त्यांची ओळख तशीच आहे. तरीही या स्थलांतरित चाकरमान्यांचे आपसातल्या 'गिरणगावी' अस्मितेमुळे घट्ट नातेसंबंध निर्माण झाले.

### शिवाजी दिवटे (वय 59 वर्षे)

पिंपळगाव ग्रामस्थ मंडळाचे पदाधिकारी. व्यवसायाने शिंपीकाम करणारे. मित्रमंडळींसमवेत भजन मंडळ चालवतात. गणेशोत्सवात आणि इतरत्र त्यांचे भजनाचे कार्यक्रम होतात.

आता काय, गिरण्या बंद पडत चालल्यामुळे साधारणपणे दिवसपाळीच चालते. पण तेव्हा तीन पाळ्यांत गिरणीचं काम चालायचं. त्यामुळे एका खोलीत खूप लोक राहू शकायचे. कारण एक पाळीवर जायच्यावेळेला दुसरा परतायचा. तो झोप वगैरे पूर्ण करून निघाला की तो गेलेला परतायचा.

आम्ही राहायचो त्या चाळीमधल्या गाळ्यांचे काही नियम होते. म्हणजे दारू प्यायची नाही. जुगार खेळायचा नाही आणि सगळ्यांनी नऊच्या आधी गाळ्यावर यायला पाहिजे म्हणजे पाहिजेच. त्याच्यानंतर खोलीतला दिवाच काढून टाकायचे. कारण दुसऱ्या दिवशी पहिल्या पाळीला जाणाऱ्यांना सकाळी पाच वाजता उठावं लागायचं. पहाटे साडेपाच ते सहा वाजेपर्यंत ज्ञानेश्वरीचं पारायण झालं की निघाले कामाला. दुसऱ्या पाळीचे लोक सात वाजता उठायचे. अकरा वाजता त्यांचं जेवण व्हायचं. दुपारपर्यंत झोपायचे आणि दुपारी दोन वाजता निघायचे. त्याच्यानंतर तिसरी पाळी. तिसऱ्या पाळीचे लोक घरीच परतायचे पहाटे. दहा वाजता जेवले की संध्याकाळी पाच वाजेपर्यंत ते ताणून द्यायचे, चांगलं. नंतर भजनी मंडळात वेळ घालवायचे आणि रात्री अकरा वाजता ड्युटीवर जायचे. नाय नाय, असा काय पक्का नियम वगैरे नव्हता, पण तसं नाय केलं तर सगळीच गडबड होऊन गेली असती. आता कोणाला वाटलंच की बाबा आणखी जरा झोपू या, तर कोण लगेच जाऊन उठवणार नाय त्याला. पण तसं कोणी झोपायचं नाय सहसा. वेळ पाळायलाच लागायची. एका गाळ्यात वीसवीस, तीसतीस माणसं आहेत म्हटल्यावर ते आलंच. तीन पाळ्या होत्या म्हणून फक्त ते जमायचं. मग रजाबिजा असली तर सगळी पंचाईत होऊन जायची. मग काही लोक बाहेर गॅलरीत झोपायचे. प्रत्येकाचं सामान तिकडे एकेका खुंटीवर टांगलेलं असायचं.

खरा त्रास झाला संपाच्या वेळेस. नोकरी कोणालाच नाय आणि सगळेच घरी बसलेले. काहीतरी काम त्यांना शोधायलाच लागायचं. आम्ही एक म्हणू, 'ठीक आहे. चला, भाड्याचे पैसे नका देऊ;' पण पोट भरायला तर पैसे लागणारच. मग हे कामगार कुठच्यातरी छोट्यामोठ्या कारखान्यात काम

बघायचे. भूक तर लागतेच ना रोज. आता कोणाचं दोन महिन्याचं खोलीचं भाडं थकलं तर मात्र त्याला जागा सोडावी लागायची. गाळा तर सांभाळावाच लागतो ना?

कोणी रिटायर झाला की आम्ही त्याच्यासाठी निरोपसमारंभ पण करतो. काही काही लोकांची कुटुंबं वाढली. मग ते दुसरीकडे राहायला गेले. पूजेला मात्र नेमाने येतात हे लोक अजून. आम्ही खास बोलावतो त्यांना. पण जेव्हापासून दत्ता सामंतांचा संप झाला ना, पूर्वीचं काही राहिलं नाय. सगळंच बदललंय. पूर्वीइतके कार्यक्रमसुद्धा होत नाहीत इथे. टी0 व्ही0पण आले सगळ्यांकडे. कोणी एवढं येत नाही कार्यक्रमांना. आमचं मंडळ पण आता एवढं उत्साही नाही राहिलं.

चाळीतल्या एका 'झिलग्या'च्या खोलीत 12 ते 15 जण राहू शकत. कुटुंबाशिवाय एकेकटयाने राहाणारे हे चाकरमाने गिरण्यांच्या कामाच्या पाळ्यांप्रमाणे झोपण्याच्याही पाळ्या करू लागले. मोकळ्या वेळी रस्त्यांवर 'गजाली' करत किंवा वेगवेगळ्या मंडळांमधून वेगवेगळ्या छंदांमध्ये स्वत:ला रमवू लागले. भजनीमंडळं, ग्रामस्थ मंडळं, नाट्यमंडळं अशी अनेक मंडळं चाळीचाळीतून उभरून येऊ लागली. खाणावळ चालवणारी बाई आपल्या हाताने घरच्यासारखं जेवण, महिन्याची 'खाणावळ' घेऊन पुरवू लागली. या बायकांनी जेवणाबरोबर चाकरमान्यांना घरपण देखील दिलं. तिथे ग्रामदेवतेचे उपास पाळले जात, कामगारांच्या सवयीप्रमाणे मासे किंवा मटण यांची सोय होई. वेगवेगळ्या पाळ्यांचे कामगार एकमेकांना या खाणावळवाल्या बायकांमार्फत निरोप ठेवत. वैयक्तिक सुखदु:खं खाणावळ बाईजवळ मोकळेपणाने बोलली जात. एक घरगुती नातेसंबंध या खाणावळींच्या माध्यमातून तयार झाला.

**इंदुबाई पाटील (वय 55 वर्षे)**

गिरणी कामगाराची मुलगी. खाणावळ चालवून घराला हातभार. नायगावच्या चाळीत वास्तव्य.

आम्ही मूळचे घाटावरचे. कोल्हापूरकडचे. इकडे माझे वडील मफतलाल मिलमध्ये कामाला होते. आई घरी खाणावळ चालवायची. काय होतं की तेव्हा गिरणीतले पगार खूपच कमी होते. त्यात मुलांचं शिक्षण वगैरे होणं शक्यच नव्हतं. तेव्हा आई म्हणाली, 'नाहीतरी घरी बसून मी काय करणार? तर मी खाणावळ सुरू करते.' इकडेच आजूबाजूला राहणारे काही लोक आणि आमचे नातेवाईक वगैरे असे लोक आमच्याकडे जेवायला यायचे. मी मदत करायची तेव्हा आईला कामात. म्हणजे भांडी घासायची, थोडे कपडे धुवायचे. नाहीतर धान्य वगैरे निवडायचं. किंवा वाण्याकडे जाऊन सामान आणायचं. अशी कामं. तेव्हा मी तिसरीत होते. शिक्षण माझं सातवीपर्यंत झालंय. माझी आई तेव्हा वरचेवर आजारी पडायची. तेव्हा शाळेतून एक वाजता परत आलं की मी तिला मदत करायला लागायची. माझी शाळा सकाळी सातला होती. दुपारी परत आले की अडीचच्या सुमाराला मी शेगडीबिगडी पेटवून मग आईला उठवायची. ती उठून जेवण बनवायची. रात्री सात-आठ वाजेपर्यंत जेवायचा टाइम व्हायचा. सगळे खाणावळी काही एकदम नाही यायचे. आता एक आला, मग एक आला असं चालायचं. पण सकाळचे डबे जायचे ते बरोब्बर पाच वाजता पहाटे. कामगार सकाळच्या पाळीवर असायचे त्यांच्यासाठी. त्यामुळे दहानंतर कोणी आलं तर आम्ही वाढायचो नाही. मग त्याच्या वाट्याचं जेवण त्याच्या डब्यातूनच जायचं. हिशोबाचं सगळं माझे वडील सांभाळायचे.

1962मध्ये माझं लग्न झालं, मी सतरा वर्षांची असताना. हे बॉम्बे गॅस कंपनीत क्लेरिकलला होते. सासरीसुद्धा मी खाणावळ सुरू केली. सुरुवातीला सातआठ लोक होते, मग वाढले. मी अजूनसुद्धा खाणावळ चालवते. पण आता काय एवढे लोक येत नाहीत. 72-73पर्यंत खूप लोक असायचे खाणावळीत. तेव्हा ते जोरात चालायचं. जवळजवळ तीनशे खाणावळी होत्या याच भागात. नंतर नंतर साडेसहाशेपर्यंत त्यांचा आकडा पोहोचला होता. आणि तेव्हा कसं खाणावळींतून तीन वेळचे जेवण दिलं जायचं. तेव्हा घरातली मुलं पण मदत

करायची. कुठे चपात्या भाजी, कुठे डबेच पोहोचव. असं काही ना काहीतरी.

आता जेवायला माणसं एकत्र जमतायतच म्हटलं तर गप्पाटप्पा चालायच्या त्यांच्या. आपल्या अडचणी सांगायचे. कोणाची बायको आजारी असायची. कोणाला गावी घर बांधायचं असायचं. नाही म्हटलं तरी पाचसहा वर्षं एका ठिकाणी जेवतायत तर त्यांच्यात एकदम घरच्यासारखे संबंध बनायचे. गणपतीत बरेच लोक गावी जायचे; त्यामुळे इकडे जेवायला कमी माणसं असायची. पण असे सणवार असले की आम्ही काहीतरी गोडधोड करायचो. तेव्हा मटणमच्छी काही करायची नाय. शनिवारी, गुरुवारी आणि मंगळवारी पण ते नाही शिजवायचं.

आता काय तसलं घरगुती वातावरण उरलेलं नाय. सगळ्याचा धंदा झालाय.

1973च्या संपानंतर गव्हाचा तुटवडा झाला होता. तेव्हा मग आम्ही खाणावळ्यांना चहाबरोबर चपाती द्यायचं बंद केलं होतं. फक्त दुपारच्या जेवणात द्यायचो. एका कामगाराला कमीत कमी चारपाच तरी चपात्या लागायच्या. म्हणजे12 लोक असले जेवायला तर 60 चपात्या बनवायलाच लागायच्या. आता लोकं त्यामानाने कमी खातात. आम्हांला, खाणावळवाल्यांना सुट्ट्याबिट्ट्या कधीच नसायच्या.

**शाहीर निवृत्ती पवार (वय 70 वर्षे)**

महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध गायक, मीठवाले शाहीर म्हणून गिरणगावात ओळख. 'काठी न् घोंगडं' या गाण्याने प्रचंड लोकप्रियता मिळवली. त्यांच्या अनेक गाण्यांच्या रेकॉर्ड आणि कॅसेट लोकप्रिय आहेत. 2002 साली निधन. तोपर्यंत गिरणी कामगारांचे मोर्चे, धरणं यात सामील होऊन ते आपल्या थकल्या पण दमदार आवाजाने लोकांना रिझवत असत.

गिरणगावात तेव्हा सगळं मोकळं होतं. हवा, पाणी, स्वच्छता, टापटीप सगळं. एवढी गर्दी नव्हती. माणसं खेटत नव्हती. मोकळं. सगळं मोकळंच. सुंदर. प्रसन्न वाटायचं. तेव्हा आम्ही 'उघडा उघडा डोळा', 'चल उठ सायबा नीट विलायत गाठ' ही गाणी चोरून म्हणायचो. माझ्या मावशीची खाणावळ होती नायगावला, तिथे जेवायला भूमिगत लोक यायचे. आम्हांला गाणी म्हणायला लावायचे. चोरून चोरून ही गाणी म्हणायचो. तालमीतले सगळे पैलवान मोकळेच राहायचे. त्यांच्या बायका गावीच. तेव्हा खोल्या घेऊन कोणी बायकोला आणीत नव्हते. खोल्या घ्यायच्या, बायकांना आणायचं हे नंतर सुरू झालं. तर ते पैलवान मला एक गाणं म्हणायला लावायचे. म्हणायचे, 'अहो जावई, गाणं म्हणा की.' कारण देगाव माझं आजोळ. देगावच्याच शंकर मास्तरची तालीम होती. सगळे पैलवान तिथलेच. तर म्हणायचे 'म्हणा गाणं' की मी म्हणायला लागायचो,

''एक सरळ खेडेगाव हाय कोल्हापूर जिल्ह्याला
सह्याद्रीची राणी नदीचं पाणी हाय त्या गावाला
कारभारी गेले मुंबईला एक महिना कि ग झाला
बाजारात गेले खुशालीचा कागूद नाही आला.
शिरपा सारखा रडतो, काय सांगू त्याला
घडी घडी सख्याची ग रोज सय होती मला
कुठं जेवत असंल, कुठं बसत असंल, कुठं फिरत असंल.''

असं म्हणल्यानंतर त्या माणसांना गुदगुल्या व्हायच्या. म्हणायचे, 'अहो, म्हणा, आणखी गाणं म्हणा.' कारण बायकांची त्यांची वर्षवर्ष गाठ पडायची नाही. गावी जायचे वर्षा, सहा महिन्यांनी. तर त्यांना आनंद वाटायचा हे गाणं ऐकल्यावर. सगळ्या आठवणी यायच्या. मी परत परत तीच तीच गाणी म्हणायचो.

कौटुंबिक भावबंधनांना पर्याय म्हणून विविध प्रकारची गावकरी मंडळं उदयाला आली. आपल्या गावाशी, कुटुंबाशी संपर्क ठेवणं या मंडळांतर्फे शक्य होतं. कुणीही गावाला जाणार असला वा जाऊन आला तर मंडळात भेटून भेटी, पत्र, निरोप याची देवाणघेवाण होई. गावाकडच्या राजकीय आणि सामाजिक व्यवहारावर मुंबईच्या या गावकरी मंडळांचा खूप प्रभाव असे. ग्रामदेवतेच्या जत्रेत मुंबईतले गरीब आणि श्रीमंत

सर्व थरातले, जातीचे चाकरमाने न चुकता हजेरी लावत. गिरणीतले जीवन काहीसं सुसह्य व्हायला विविध सांस्कृतिक संस्थांचं जाळं मोठ्या प्रमाणात कारणीभूत झालं. संघटित राजकीय जाणीवा तयार होण्यासाठी ट्रेड युनियन-कामगार संघटना यानंतर उदयाला आल्या. गावकरी मंडळासारख्या गिरणगावातल्या वेगवेगळ्या सांस्कृतिक संस्था म्हणजे भजनी मंडळ, नाटक मंडळ, व्यायामशाळा, गणेशोत्सव मंडळ, चाळ कमिट्या. या कामगारांचं फक्त मनोरंजन करीत नव्हत्या तर त्यांच्यातली विविध प्रकारची सांस्कृतिक, सामाजिक सृजनशीलता देखील फुलवत होत्या. त्यांच्या आविष्काराला व्यासपीठ देत होत्या. विशेषत: भजनी मंडळं खूपच लोकप्रिय झाली. घाटावरच्या कामगारांतून अनेक निष्ठावंत वारकरी निर्माण झाले. नेमाने आषाढी आणि कार्तिकी एकादशीला पंढरपूरच्या वारीसाठी जाणाऱ्या लोकांमध्ये आजही गिरणगावातून मोठ्या संख्येने लोक जातात. चाळीतली खास भजनी मंडळं असत, तशी वेगवेगळ्या गिरण्यांचीही स्वत:ची भजनी मंडळं असत. आंतरगिरणी भजनस्पर्धा या आंतरगिरणी नाट्यस्पर्धेसारख्याच लोकप्रिय झाल्या. गिरणीच्या व्यवस्थापनाकडून या स्पर्धांसाठी आर्थिक सहाय्य मिळत असे.

**मारुती सतकार (54 वर्षे)**

गिरणगावातल्या लोअर परळ भागातल्या पिंपळगाव ग्रामस्थ मंडळाचे कार्यकर्ते.

मी सातारा जिल्ह्यातल्या पिंपळगावहून मुंबईला आलो, रोजगाराच्या शोधात. शिकलो बिकलो फार नव्हतो. हेच सगळ्यांसारखं. सहावी सातवीपर्यंतच शिक्षण झालंय. मुंबईत माझे नात्यातलं असं कोणी नव्हतं, पण ऐकून माहीत होतं की आपल्या गाववाल्यांचं 'पिंपळगाव मंडळ' म्हणून इकडे आहे. संतोष डेरी म्हणून हॉटेल होतं, तिथे पंधरा रुपये महिन्यावर कामाला राहिलो. मग मला मोरारजी मिल नं.2 मध्ये ट्रेनीचा पास मिळाला. तेव्हा तिचं नाव सयाजी मिल होतं. तीन महिन्यांचं ट्रेनिंग होतं. 1971 आणि 72, मी तिकडे होतो. नंतर हिंदुस्थान मिल्समध्ये लागलो. अजूनही मी तिथेच आहे.

गावकऱ्यांनी आमच्यासारख्यांसाठी मंडळ बनवलं. का? तर प्रत्येकालाच काय भाड्याने खोली घेऊन रहाणं जमायचं नाही. आमच्या मंडळाच्या खोलीचं भाडं त्यांना त्यांच्या ऐपतीप्रमाणे भरता येतं. आमची एक खोली लालबागला होती, एक प्रभादेवीला वाकड्या चाळीत आणि एक चिंचपोकळीला गणेश टॉकीजच्या जवळ. त्यावेळेला, चार-पाच हजारांत खोल्या मिळायच्या.

तेव्हा या मंडळाचे आम्ही 10-12 जणच सभासद होतो. ऑफीस कोणी चालवायचं हे आम्ही मिळून निवडायचो. आधी मंडळाची वर्गणी 165 रुपये होती. ती वाढून 200 रुपये झाली. आता सध्या सभासद होण्यासाठी 4,000 रुपये भरावे लागतात. कारण खोल्यांची भाडी, बाकीचा खर्च, शिवाय मंडळाचे कार्यक्रम या सगळ्यासाठी पैसे लागतात.

आमचं भजनी मंडळसुद्धा आहे. आधी तर लेझिमची प्रॅक्टीस पण चालायची. आणखी एक खेळ होता, 'संग्राम'. पूर्वी तुम्हांला माहीत असेल की डबल बारी असायची. भजनांच्या स्पर्धेसारखं असायचं ते. म्हणजे प्रत्येक पार्टीने समोरच्या पार्टीला प्रश्न विचारायचे आणि समोरच्यांनी उत्तर द्यायचं, असे सवाल जवाब चालायचे. भजनच असायचं, पण त्यात ते एकमेकांना काहीही सुनवायचे. पण सगळं भजनाच्या तालावर. या डबलबारीमध्ये आमचं मंडळ एकदम तरबेज होतं. चांगले चांगले शास्त्रीय गायक होते आमच्या मंडळात. त्यातले काही रेडिओवर पण गायले आहेत. ते भजनं, भारुडं, सोंगी वगैरे मस्त म्हणायचे. आमचे ढोलकीवाले, पेटीवाले पण होते.

आमच्या मंडळाने गावातसुद्धा खूप कार्य केलं आहे. गावाला वीजपुरवठा, पाणीपुरवठा करून दिलाय. दोन देवळंसुद्धा बांधली आहेत. दर तीन वर्षांनी गावाला लक्ष्मीची जत्रा भरते. तिला आम्ही सगळे जातो. स्पेशल सहा दिवसांची सुट्टी घेतो त्याच्यासाठी. इकडून खास बस निघते पिंपळगावसाठी. सहाच्या सहा दिवस तिकडे भरपूर कार्यक्रम असतात. लोकनाट्य, कुस्त्या, बैलांच्या झूंजी. आता काय, नवीन जमाना

आहे, त्याच्याप्रमाणे पण वागलं पाहिजे, म्हणून आम्ही क्रिकेटच्या मॅच पण ठेवतो हल्ली. आमची स्वत:ची पतसंस्था आहे. गावचे काही लोक तिकडे कामाला आहेत. बाकी आम्ही सगळे वेगवेगळ्या ठिकाणी कामाला आहोत. संपूर्ण वेळ मंडळाचं काम बघणारं असं कोणी नाही आहे. पण एखाद्या सभासदाला काही अडचण आली, म्हणजे गावाकडचं कुणी वारलं म्हणा, तर मंडळ त्याला लगेच मदत करतं. आणि त्याला गावी लगेच पाठवायची सोयही करतं.

आमचे बरेचसे घाटी लोक गिरणीत स्पिनिंग खात्यात आहेत. गावातला कोण तरी जॉबर गावाकडच्या तरुण मुलांना मिलमध्ये लावून द्यायचा आणि मग हळूहळू तो परमनंट व्हायचा. गावातले लोकसुद्धा कामगारांना खूप मदत करायचे.
अजून सुगीला वगैरे आम्ही जातो गावी. नातेवाईक भेटतात. गाववाले भेटतात.पण गावाला तसं फार बरं आयुष्य नाही हो. कुटुंब, संसार वाढत जातो, पण त्यामानाने पीक काही मिळत नाही. म्हणून बघा तुम्ही, प्रत्येक कुटुंबातला एकजण तरी इकडे मुंबईत कामासाठी येतो. कोणी तरी सैन्यात असतो आणि तिसरा असाच कुठेतरी.

**गिरण्यांमधील स्त्रिया**

सुरुवातीला नोकरीसाठी मुंबईत आले ते पुरुषच. 1864 मधल्या आकडेवारीनुसार मुंबई शहरात दर हजार पुरुषाप्रमाणे फक्त 539 स्त्रिया होत्या. 1921मध्ये सुद्धा स्त्रियांचं प्रमाण 525 होतं. 1870च्या दुष्काळामुळे आणि 1880 नंतर कापड उद्योगामुळे स्त्रियादेखील आर्थिक कारणांसाठी स्थलांतर करू लागल्या. 1879मध्ये मुंबईत दहा गिरण्या होत्या, त्यात 8553 स्त्रिया होत्या. 1896मध्ये 71 गिरण्यात स्त्री कामगारांची संख्या होती 78,455.[5] मुंबईतल्या कापड गिरण्यातल्या कामगारपैकी सर्वसाधारणपणे 20-25 टक्के स्त्रिया होत्या. पण विजेचे दिवे आले आणि स्त्रियांची संख्या कमी करण्यात आली. रात्रपाळीला स्त्रियांना ठेवायला बंदी होती. शिवाय झगडून मिळवलेले खास फायदे म्हणजे पाळणाघर, बाळंतपणासाठी सुट्टी वगैरे नंतर स्त्रियांच्या नोकरीच्या मूळावर आले. त्यामुळे त्यांच्या संख्येत घट झाली. 1884मध्ये 22.19 टक्के स्त्रिया होत्या. तर 1934मध्ये 18.93 टक्के.

**रुक्मिणी ऐनापुरे (वय 69 वर्षे)**

गिरणी कामगार. अन्नपूर्णा महिला मंडळाच्या पुणे शाखेत निरीक्षक म्हणून काम बघतात. वरळी कोळीवाड्यातल्या एका झोपडीवजा खोलीत राहतात.

माझा जन्म पुण्याजवळच्या खेड्यात झाला. वडील वारल्यानंतर आमचे काका आम्हांला त्यांच्या घरी घेऊन गेले. मी कधी शाळेत गेले नाही. नंतर नंतर मग आई आणि माझी वहिनी यांच्यात सारखी भांडणं व्हायला लागली. तेव्हा मग आई मला घेऊन मुंबईला आली आणि मिलमध्ये कामाला राहिली. तेव्हा आम्ही मुंबईत असेच कोणा नातेवाइकांच्या घरी राहत होतो.

तसं माझं लग्न बाराव्या वर्षीच झालं, पण वयात येईपर्यंत मी आईबरोबरच राहत होते. म्हणजे सासरी गेले होते मी. इथंच या वरळी कोळीवाड्यात ह्यांचं घर होतं. पण नणंद सारखी कटकट करत राहायची की, ही काही काम करत नाही, नुसती बसून असते. म्हणून मी परत आईकडे निघून आले. आई कामाला जायची, तिथली एक मुकादम बाई तिच्या ओळखीची होती. हो. मुकादम असलेल्या बाईला नाईकीण असं नाव होतं. आईने मलासुद्धा कामाला लावायला तिला सांगितलं. ती मला मागावर बसवायची आणि सूत काढायला शिकवायची. तिच्याकडूनच मी शिकले काम. मग तिने मला कामावर ठेवलं. मी आईच्याच मिलमध्ये होते. पण कामावर असताना आई माझ्याशी कधी बोलायची नाही. म्हणायची, 'बोलायचं काय असतं. घरी जाऊन बोलू हवं तेवढं. इकडे काम करायला आलो आहोत. तर कामंच करायचं.' ते लोक कापसाचं वजन करून आमच्या खात्यात पाठवायचे, आम्ही त्याचं सूत काढून परत करायचो. नाईकीण आमच्यावर नजर ठेवून असायची. मशिनी नीट चालतायत का? सगळं व्यवस्थित चालतंय का? हे ती बघायची. मास्तर काय, सकाळी आणि संध्याकाळी एक एक फेरी मारायचे. इथली मुकादम नाईकीणच.

आमच्या खात्यात सगळ्या स्त्रियाच होत्या. आम्ही साडीवर एक फडकं बांधून घ्यायचो म्हणजे साडी मशीनमध्ये अडकायला नको.

मग एकदा 'हे' मला सासरी न्यायला आले. गांधींचा खून झाला त्याच दिवसांमध्ये कधीतरी. मी पहाटे 5.30ची ट्राम पकडून कामाला जायचे ती संध्याकाळी परतायचे. माझी गिरणीत सात ते पाच अशी शिफ्ट होती. तेलाची गिरण म्हणायचे तिला. मी काय परमनंट नव्हते. टेंपरवारीच लागले होते. मग रोज काम मिळायचं नाही. माझा खूप वैताग व्हायचा. ते लोक स्त्रियांनाच मुद्दामहून असं करायचे. पुरुषांना कधी नाही. त्यांना तर स्त्रिया कामावरच नको असायच्या. कारण बाई म्हटली की तिच्या बाळंतपणाची वगैरे रजा द्यायला लागायची. तरी मी पाच वर्षं गिरणीत होते. मग मी ते काम सोडून दिलं.

'हे' मधुसूदन मिलमध्ये होते. मी पहिल्यांदा बाळंत झाले त्याच्यानंतर लगेच आम्ही इकडे या वरळी कोळीवाड्यातच दुसरी खोली घेतली. आणि वेगळं राहायला लागलो. पाच मुलं झाली मला. दोन लगेच गेली त्यातली. आता तीन मुलं आहेत. ह्यांना प्यायची खूप सवय होती. त्याच्यापायी घरी पैसे पण नीट द्यायचे नाहीत. नाही, तसा बाकी त्रास नव्हता. मारायचे पण नाहीत. पण जुगाराचा नाद होता. त्याच्यात सगळे पैसे उडवायचे. कधीकधी घरात एक पैसा पण नसायचा. कसं भागवणार आणि कसं चालवणार घर? म्हणून मी खाणावळ सुरू केली. आमचे घाटी लोकच होते जेवायला. कोकणी कोण नव्हतं. मी डबे पण पाठवायची तिकडे क्रॉफर्ड मार्केटला. माझा मुलगा पोहोचवायचा.

एवढ्या सगळ्यात पोरांना काय शिकवता आलं नाही मला. माझ्या मुलीच्या शाळेतल्या बाई किती सांगायच्या मला की तू शिकव तिला. डोकं चांगलं आहे तिचं. इकडे घरी त्या स्वत: यायच्या सांगायला. पण मी काय करणार? पैसाच नव्हता त्यांना शिकवायला. सगळा जायचा ह्यांच्या दारूत आणि जुगारात. त्यांचा पगार झाल्यावर आठवडा-आठवडाभर गायब असायचे. अख्खा पगार संपेपर्यंत. मग माझा एक मुलगा एका हॉटेलात कामाला राहिला आणि दुसरा दुकानावर. मुलीला म्हटलं, तू घरीच राहा, माझ्या मदतीला. तिला गाण्याची खूप आवड. तिचाच मुलगा आता गाण्यांना चाली देतो. त्याने आईकडून उचललं. चांगले पैसे मिळवतो.

नंतर ही अन्नपूर्णा संस्था सुरू झाली. प्रेमा पुरवने नोकरी गेलेल्या गिरणी कामगार स्त्रियांसाठी चालू केलेली. त्यांनी आमची परिस्थिती बदलण्यासाठी खूप काम केलंय. मी पण अन्नपूर्णामध्ये जायला लागले. आम्ही बटाटेवडे करून विकायचो सुरुवातीला. महागाई आणि भाववाढीविरुद्ध मोर्चे पण काढलेले आहेत. एकदा मोर्चा घेऊन परळला गेलो होतो. सगळं ट्राफीक अडवून धरलं होतं. प्रेमाताई पुरव होत्या, डांग्यांची मुलगी रोझा होती. हो, मी प्रेमाताईबरोबर डांगेंच्या घरी गेले आहे, रोझाला भेटायला. तेव्हाचा आमचा मोर्चा आम्ही रेशनकार्डवर तांदूळ, रॉकेल वगैरे व्यवस्थित मिळायला पाहिजे म्हणून काढला होता. भरपूर लोक होते तेव्हा. पोलीस आले आम्हांला पकडायला. त्यांनी आम्हांला आधी आझाद मैदानाला नेलं आणि नंतर सोडून दिलं. आधी आम्ही अन्नपूर्णाची सुरुवात प्रेमाताईंच्या घरातूनच केली. नंतर आम्हांला दुसरी जागा मिळाली. तेव्हा आम्ही ऑफीस आणि कंपन्यांसाठी जेवण पाठवायचं काम सुरू केलं.

पण माझा मुलगा वारला अचानकच. हार्टअ‍ॅटॅकने गेला. दुसरा मुलगा मिलमध्ये होता. तो पण वारला. तो संपामध्ये होता. त्याला खूप होतं त्याचं म्हणजे संप वगैरे. अटक पण झाली होती एकदा. आणि नंतर नोकरीच सुटली त्याची. माझी सूनसुद्धा गिरणीकामगार आहे. मी आता अन्नपूर्णामध्ये सुपरवायझर आहे.

### सहजीवन

शहरात स्थलांतर केलेल्या एकेकट्या स्त्री-पुरुषांना आपापल्या कुटुंबापासून दूर राहिल्यामुळं वैवाहिक सहजीवनाला मुकावं लागे. अनेक स्त्रिया देखील या शहरात काही ना काही कारणामुळे सहजीवनाला वंचित झालेल्या होत्या. जवळीकेच्या ओढीमुळे अनेक स्त्री-पुरुषांमध्ये

वैयक्तिक नातेसंबंध निर्माण झाले. बरेचदा गावाकडच्या बायकामुलांना हे माहीत असे. अशी कुटुंबं मुंबईत राहायला आल्यानंतरही नवऱ्याचे, बापाचे आधीचे नातेसंबंध चालू राहत. काही वेळा तर एका घरात हे विस्तारित कुटुंब वास्तव्य करी. घरातल्या स्त्रियांना हे सहजीवन सोपं नव्हतं. परंतु दोन आयांच्या प्रेमाने मुलं मात्र समृद्ध झाल्याची अनेक उदाहरणं दिसतात.

**भाई भोसले (वय 75 वर्षे)**

काँग्रेसप्रणीत राष्ट्रीय मिल मजदूर संघाचे माजी जनरल सेक्रेटरी. माझगावमधून 1972 साली आमदार म्हणून निवडून गेले. वरळी सागर को-ऑपरेटिव्ह सोसायटी या आमदार आणि खासदारांसाठी बांधलेल्या फ्लॅटमध्ये वास्तव्य. 2002मध्ये निधन.

माझे वडील गिरणी कामगार. नंतर मग वर्कर्स सुपरवायझर झालो. ज्याला 'मुकादम' म्हणतात ते. वीव्हिंग डिपार्टमेंटमध्ये. जिथे कापड विणलं जातं तिथे. आयुष्याची 35 वर्षं त्यांनी नोकरी केली. पण सगळं अशिक्षित जीवन. म्हणजे कशाचा, कशाला पत्ता नाय. मला तर हेही माहीत नाही की माझा जन्म मुंबईत झाला की कोकणात. पण मी असं समजतो की मी मुंबईतच जन्मलो, कारण माझं सबंध आयुष्य मी मुंबईतच घालवलंय. माझ्या तर जन्मतारखेचाही पत्ता नाही. ते मग शाळेतल्या मास्तरांनी 15 ऑक्टोबर 1925 म्हणून माझी जन्मतारीख ठरवली.

करीरोड पूलाला लागून एक जी हाजीकासम चाळ आहे तिकडे आम्ही राहत होतो. तिथेच म्युनिसिपल शाळेत चौथीपर्यंत होतो आणि पाचवीपासून शिरोडकर हायस्कूलमध्ये जायला लागलो. तेव्हा शिरोडकर हायस्कूल नुकतंच सुरू झालं होतं. त्यानंतर युद्ध सुरू झालं. तेव्हा एक घटना घडली. ससून मिलजवळ ज्या पाचसहा गिरण्या होत्या, तिथे बॉयलर फुटला. त्याचा मोठा स्फोट झाला. त्यावेळेला जपानची विमानं वगैरे मद्रासपर्यंत आली होती. सगळ्यांचा समज झाला की जपाननेच बाँब टाकला. आणि सगळ्यांनी मुंबई सबंध खाली केली. पळून गेले. जसं जमलं तसे. कोणी रेल्वेने, कोणी बोटीने. आम्हीसुद्धा गावाला पळालो. कुडाळला. मला शाळा कन्टीन्यू करायची होती. मग दोन-तीन वर्षं तिकडच्या शाळेत काढली. तिकडे मैदानावर मुलं, खेळायची तेव्हा तिथे दोन सद्गृहस्थ यायचे. एक यायचे आर.एस.एस.वाले आणि एक राष्ट्र सेवादलवाले होते. त्यांना काही सिलेक्टेड 12-14 वर्षांची मुलं हवी असायची. सुदैवाने माझी राष्ट्रसेवादलवाल्यांशी गाठ पडली.

मुंबईला परत आल्यावर मी पुन्हा शिरोडकर नाईट हायस्कूल जॉइंट केलं. तेव्हा काय, गिरण्यांमधली परिस्थिती खूपच वाईट होती. दहा-दहा तासांचं भयानक काम असायचं. सगळे ऑड अवर. त्यात माझे वडील होते वीव्हिंग डिपार्टमेंटमध्ये. तिकडे कापड विणताना कापडाला कांजी लावून ताठ केलं जायचं. त्याचे तुषार उडत आणि ते घशात गेले की एकप्रकारचा दम्याचा रोग होई. माझे वडील त्यामुळे जवळजवळ कोलॅप्स झाले. त्यांना ते काम अजिबात जमेना. मग माझ्यावर पाळी आली. घरी बहीण आणि आई होती. त्यामुळे मी नाईट स्कूल सोडलं आणि कुठेतरी नोकरीधंदा मिळतो का ते बघायला लागलो. गोदीमध्ये टॅलीक्लार्क म्हणून लागलो. तिथे कसल्याही सोयी नव्हत्या. मग ते सोडून दिलं आणि बॉम्बे टेलिफोन कंपनीत लागलो. सातरस्त्याला होती तेव्हा ती. वडील तेव्हा गावाला परत गेले होते.

तेव्हाच्या गिरणगावातलं सामाजिक वातावरण म्हणजे मघाशी म्हटल्याप्रमाणे एका खोलीची संस्कृती. पोरांनी कॉमन नळाखाली आंघोळ करायची वगैरे. सगळं अशिक्षित वातावरण. एखादा मुलगा मॅट्रिक झाला म्हणजे त्याच्या कुटुंबाचे हात गगनाला पोहोचले अशी परिस्थिती. अशात मग ते वाईट धंदे सगळे तिथे होते. दारू पिणं, जुगार, अमकं तमकं, सगळं. मी दारू प्यायली नाय. गंमत म्हणजे मला लोक असं म्हणायचे की बुवा तुझे वडील एवढे पट्टीचे पिणारे आणि तुझं काय? तर म्हटलं, नाय. ते काय मला जमत नाय, आणि ते माझं कायम राहिलं. अगदी हल्लीपर्यंत. पण माझ्या वडिलांचं एक होतं,

की बाकीचे जे रस्त्यात बरळत सुटतात वगैरे, असलं त्यांचं काय नव्हतं. त्यांचं काम व्हायचं साडेतीनला. पहाटेला यायचे आणि थोडे झोपायचे, मग बाजारबिजार आणायचा आणि मग थोडंसं 'ते' घ्यायचे. जेवायचे आणि झोपायचे. परत मग संध्याकाळी चार वाजता उठून साडेपाचला नोकरी. ही चायना मिल आहे, त्याच्यामध्ये त्यांची नोकरी होती.

हां हां. ते संबंध म्हणजे काय बघायला नको ते. सर्रास प्रकार होता. म्हणजे लग्न झाली तरी. ते एक असं सर्वमान्य मानलं जायचं. तो एक पुरुषार्थच म्हणा ना. संबंध जुळायचे हो. आता कसे ते कसं सांगणार? कधी विधवा असायच्या. कधी परित्यक्त्या. त्या बायासुद्धा अतिशय लॉयल असायच्या. त्या पूर्ण कुटुंबाशी. किंवा त्याची जी लग्नाची पत्नी असेल तिच्याबरोबर, त्यांच्या मुलांबाळांबरोबर. असं ते एक वातावरण होतं त्या काळात. कुटुंबातही त्यांना सामावून घेतलं जायचं. एक्सेप्टन्स होता. सुरुवातीला टीका वगैरे व्हायची. पण त्या राहिल्या तर आहेत ना घरातल्या एक मेंबर म्हणून. मग लोक चालवून घ्यायचे. त्यांना पण एक स्टेटस् असायचं. म्हणजे घरच्या कारभारात त्यांच्या शब्दाला किंमत असायची. आणि त्यांचा इंटरेस्ट असायचा की बाबा हे कुटुंब माझं आहे, सवत ही सुद्धा माझीच आहे. माझ्या पुरुषाची ती माझ्यासारखीच बायको आहे. तिची मुलं माझी मुलं आहेत. असं ते सगळं. त्यामुळे आपुलकी निर्माण व्हायची. माझ्या वडिलांची दोन लग्नं झाली. पहिली आई वारली. मी 'माझी आई' जी म्हणतो ना, ती माझ्या वडिलांच्या लग्नाच्या पूर्वीपासून संबंधित होती. पण तिनेच माझ्या वडिलांचं लग्न करून दिलं. पहिलं करून दिलं, दुसरंसुद्धा करून दिलं. दुसऱ्या पत्नीचा मी. आम्ही दोन मुलं. मी आणि माझी बहीण. हां, पण ते संबंध होते. सगळं ती करायची म्हणजे असं नाही की बायको करून दिली, आता तुम्ही माझ्याबरोबर राहा. हा पण एक संस्काराचा भाग होता. आता तिनेच का लग्न केलं नाही वडलांशी म्हणाल तर जातीचा प्रश्न असेल किंवा ती विधवा होती म्हणून असेल. मी तिला 'माझी आई'च म्हणायचो. माझ्या आईने इतकं केलं नसतं एवढं ती माझ्यासाठी करायची. माझ्या बहिणीसाठी करायची. मला समजू लागल्यापासून मी सांगायचो की ती माझी आई आहे. मुंबईतून कोकणात जायचो आम्ही. हो हो हो. एकत्र रहायचो. गावाला जायचो पण एकत्रच. असं नाही की तिला मुंबईतच ठेवा आणखी आपण जा. तिथे सुद्धा गावातसुद्धा एकसेप्ट केलं होतं, की बाबा ठीक आहे, त्यांची बाई आहे. हे सगळं या संस्कृतीचा भाग आहे.

### गोविंद फणसेकर (वय 73 वर्षे)

काँग्रेस पक्षाशी निष्ठा असलेले कामगार भागातले लढवय्ये, बेडर कार्यकर्ते. सेंच्युरी मिलमध्ये40 वर्षे कारकूनची नोकरी. एच वॉर्ड काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष होते. वरळीच्या 'वाकडी चाळ'मध्ये आयुष्यभर वास्तव्य. धिप्पाड व्यक्तिमत्त्वाच्या 'अण्णा' फणसेकरांनी त्यांच्या लहानखोर, नाजूक बांध्याच्या पत्नीला मुलाखतीच्या तिन्ही सत्रांना प्रेमाने आवर्जून आणलं होतं. 2001 साली निधन.

मी इथे प्रभादेवीच्या वाकड्या चाळीत जन्मलो. चाळीचं नावच वाकडी चाळ. 1927 सालचा जन्म माझा. 42ची चळवळ इथून पाहिली, 44ची पाहिली, नंतर संयुक्त महाराष्ट्राचं आंदोलन पाहिलं. एकूण एक सगळं.

वडील माझे पोलिसात हवालदार होते. मला ते पोलीस ऑफीसर करायला बघत होते. मी म्हटलं नाय! 42 साली मला कृष्णा देसाई भेटला. तेव्हाच मला छबिलदास शाळेमधून काढून टाकलं आणि वडीलांनी मला आर.एम.भट मध्ये टाकलं होतं. दीनानाथ कामत, विनायक पाटील अशी सगळी मुलं मला तिकडेच भेटली. हे कम्युनिस्ट माझे मित्र होते. पण मी त्या पार्टीचा कार्यकर्ता कधी झालो नाय. कारण त्यांचं माझ्या भागात नेहमी संप करणं, मारणं वगैरे मी बघायचो. मला नेहमी वाटायचं की राष्ट्रीय मिल मजदूर संघाचं, गं. द. आंबेकरांचे राज्य पाहिजे. त्यांचं काम फार चांगलं होतं.

माझी आई अडाणी बाई होती. पोलीस शिपायाचीच

बायको ती. वडलांना जुगाराचा नाद होता. पोलिसातल्या हवालदारांना असतात ते सगळे नाद त्यांना होते. पिणं वगैरे सगळे. आणि जुगाराचं तर एवढं होतं की एकदा पत्ते खेळायला बसले तर कधीकधी आठवडाभर बसूनच राहायचे खेळत. पण आम्हांला त्यांनी कधी काही त्रास नाही दिला. आम्हांला वाढवलं, मोठं केलं. मला आठवतं की आम्हांला ते सगळे उपास करायला लावायचे. स्वत: मात्र त्यांनी कधी कोणता उपास केला नाही. एकदा असंच चाळीतल्या मुलांबरोबर पत्ते खेळताना त्यांनी मला बघितलं. आणि तसंच पकडून भरपूर बदडलं. त्यांना मी जुगार खेळावा हे अजिबात आवडायचं नाही. त्यांना आम्हांला शिकवायचं होतं. शेवटी 1940मध्ये ते रिटायर्ड झाले आणि गावी जाऊन बसले.

माझ्या आईला माझं हे नाटकात वगैरे काम करणं, सगळं माहीत होतं. घरात पंगतीला बाहेरचं कोणी ना कोणी रोज असायचंच. ती जास्त जेवण करून ठेवायची आधीच. कधी कधी माझे मित्र यायचे आणि माझ्या बहिणीला उठवून सांगायचे, 'चल ग, एक ऑम्लेट टाक.' ती पण करून द्यायची. ते बरेचदा राह्यलेले सुद्धा आहेत माझ्या घरी. पण घरच्यांनी कधी कुरकूर केली नाही. आम्हांला खूप सपोर्ट होता त्यांचा. कधी कधी काय व्हायचं मी नसताना माझ्या मित्रांना पोलीस उचलून न्यायचे. तेव्हा चार लोकांशी बोलून, पैसे गोळा करून, त्यांना जेलमधून बाहेर काढेपर्यंत सगळं माझ्या आईने केलेलं आहे. ती पैसे बाजूलाच काढून ठेवायची तेवढ्यासाठी.

आणखी एक काकी राहायला होती आमच्या घरी. बॉम्बे डाइंग मिल्समध्ये कामाला होती ती. आमचं सगळं आवडीने करायची ती. जीव होता आमच्यावर तिचा. कधी मला रात्री परत यायला उशीर झाला तर आई झोपून जायची. पण ही काकी वाट बघत थांबलेली असायची, दाराबाहेर. मी आलो की हळूच माझ्यामागून घरात यायची. जवळजवळ दुसरी आईच होती माझी ती. तशी नात्याची नव्हती. तसं लग्नही नव्हतं झालं माझ्या वडलांशी. पण राहायची आमच्याकडेच. तिच्या मुलींची लग्नं आम्हीच लावून दिली. वारली तेव्हा माझ्या धाकट्या भावाने अग्नी दिला तिला.

### गिरणगावातला सांस्कृतिक उत्सव

मुंबईतल्या चाळ संस्कृतीत सार्वजनिक गणेशोत्सवाचं स्थान सगळ्यात वरचं. गणेशोत्सवातल्या अनेक सांस्कृतिक कार्यक्रमात स्थानिक लहान-थोरांना आपल्यात असलेल्या कलागुणांची जोपासना करायला हक्काचं व्यासपीठ मिळू लागलं. अशा अनेक उत्सवात त्यातल्या धार्मिकतेपलीकडे असलेलं सांस्कृतिक परिमाण महत्त्वाचं असे. निरनिराळ्या राजकीय नेत्यांची व्याख्यानं, स्थानिक वा पाहुण्या कलावंतांची नाटकं, गायन, वादन अशा कार्यक्रमाने मुंबईच्या मराठी मध्यमवर्गात आणि कामगारवर्गात गणेशोत्सव कमालीचा लोकप्रिय झाला. मध्यमवर्गीय गिरगावात1893 साली केशवजी नाईकांच्या चाळीत पहिला सार्वजनिक गणेशोत्सव साजरा झाला. गिरणगावच्या कामगारवर्गाने आपल्या सळसळत्या चैतन्याने तो प्रतिवर्षी समृद्ध करत नेला.

### अरुण खातू (वय 60 वर्षं)

चिंचपोकळीच्या गणेशोत्सव मंडळाचे पदाधिकारी. निवृत्त गिरणी कामगार. चिंचपोकळी पूलाखाली मंडळाच्या जागेत इतर सदस्यांच्या उपस्थितीत मुलाखत घेतली गेली. संध्याकाळी इथे या भागातले रहिवासी गप्पा मारण्यासाठी एकत्र येतात.

आमच्या मंडळाची स्थापना 1920 साली झाली. म्हणजे लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या निधनाच्या वर्षी. आता शंभर वर्षं पूर्ण केली. गिरगावातला मुगभाटातला गणपती पहिला. आमचं मंडळ दुसऱ्या क्रमांकाचं आहे. त्यावेळी त्यात इकडचे स्थानिक लोक होते. म्हणजे भाऊसाहेब कोल्हटकर, अर्जुन पुजारे, महादेव बसण्णा. हां, त्यात माझे वडीलसुद्धा होते. तात्या मसूरकर होते, बाबाजी कोकाटे होते. त्यावेळी इथे जागा वगैरे नव्हती. या ठिकाणी एक छोटासा गणपती आणायचा आणि बसवायचा. मला वाटतं पहिल्यापासून मोठा गणपती नव्हताच. 1943 साली या उत्सवाला जास्त भरारी मिळाली. कारण तेव्हा

तो पारतंत्र्याचा काळ होता. पुन्हा 47 साली तो दंगा झाला, त्या दंग्यानंतर दोनतीन वर्षं अशीच निघून गेली. उत्सव होतो की नाही ही चिंता होती लोकांना.

गणेशोत्सव या धार्मिक उत्सवाची कास धरून लोकांनी एका ठिकाणी भेटण्याचं निमित्त तयार केलं. ब्रिटिशांचं राज्य असल्याने बोलण्यावर, चालण्यावर, सगळ्यावर बंधन होतं. मग परळ गावासारख्या ठिकाणी एकत्र येऊन विचारांची देवाण-घेवाण करायची असा एक उद्देश होता.

मंडळाची वर्गणी तेव्हा चारआणे की काहीतरी होती. वर्गणीची पावती अजून आहे माझ्याकडे. डोअर टू डोअर जायचे कार्यकर्ते पावती फाडायला. मग वर्गणी गोळा व्हायची. कोणी देणगीच्या रूपात द्यायचे, काही म्हणायचे की बाबा मी तेल देतो. मी साखर देतो, मी गुलाल देतो. म्हणजे अशातऱ्हेने तो खर्च बाहेरच्या बाहेर भागवला जायचा. त्यावेळी काय की चार आण्यांची किंमत चारशे रुपयांसारखी होती. पण लोकांची एक सद्‌भावना होती की, माझा उत्सव आहे. माझ्या विभागातलं मंडळ आहे, तर मी काही खर्च उचलायला हवा. गणेशचतुर्थीपासून अनंतचतुर्दशीपर्यंत गणपतीची मूर्ती ठेवायचे. त्यावेळी त्याचं वैशिष्ट्य असं होतं, की ड्रेसवाले, म्हणजे जे आज नावारूपाला आलेत, ते लोक त्या गणपतीला एकदा रामाचं स्वरूप, एक दिवस कृष्णाचं रूप द्यायचे. म्हणजे मूर्ती एकच पण त्यांना कपडे, आयुधं वेगवेगळी देऊन थोडी व्हरायटी द्यायची. तीन-तीन दिवस निरनिराळ्या वेषात तो प्लॉट दाखवायचा की जेणेकरून लोकं ते बघतील. त्यांना आत्मीयता वाटेल. लोकांना पण काम करायची हौस होती. कारण या इथल्या भागातला हा आमचा पहिलाच गणपती. त्यावेळी लालबाग बाजारातला गणपती पण नव्हता. तिथले लोकसुद्धा इथेच यायचे दर्शनाला. काळाचौकीपर्यंत लोक यायचे. नंतर लोकसंख्या वाढली. कार्यकर्ते वाढले. आता मग रंगारी बदक, चिंचपोकळी, लालबाग, गरमखाडा वगैरे लोकांनी आपापल्या विभागांपुरती गणेशोत्सव मंडळं स्थापन केली. ते सुद्धा एकमेकांशी संबंध चांगले ठेवून. आमची वर्गणीसुद्धा आम्ही त्यांना तोडून दिली होती.

विभागाप्रमाणे त्यावेळेला भजनी मेळे, त्यानंतर मैदानी खेळ, कसरती, नाटकं वगैरे कार्यक्रम व्हायचे. मालवणकडचं दशावतारी नाटक पण व्हायचं. नमन, गौरी नाच, तमाशा, भारुडं, खेळे हे पण असायचं. शिवाय चक्रीव्याख्यानं, अभिवृत्त न्यायालयसुद्धा असायचं. मधू दंडवतेंसारखे लोक येऊन गेलेत व्याख्यानांसाठी. पुढे संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत जनजागृती करण्याकरता शाहिरी पथकं यायची. अमर शेख, शाहीर साबळे, कोल्हटकर वगैरेंचे कार्यक्रम आमच्याकडे झालेले आहेत.

### शेख जैनू चांद (वय 63 वर्षे)

गिरणगावचे शाहीर. शाहीर अमर शेखांचे एकेकाळचे सहकारी. अमर शेखांच्या अपघाती मृत्यूनंतर 'अमर शेख कलापथक' चालवत असत. सात रस्त्यावर असलेल्या मॉडर्न मिलसमोरच्या 'अमर शेख पथ' या अरुंद रस्त्यावर तळमजल्यावर त्यांचं लहानसं घर आहे. गिरणी कामगारांच्या मोर्च्यांसाठी शेवटपर्यंत कार्यक्रम करत असत. 2006मध्ये निधन.

प्रत्येक गणेशोत्सवात आम्ही नवं नाटक बसवायचो. गिरणगाव तेव्हा सगळ्या मराठी संस्कृतीचं केंद्र होतं. इथल्याच कलाकारांमुळे मराठी रंगभूमी इतकी वाढली. अख्ख्या महाराष्ट्रावर त्याचं ऋण आहे. यात फक्त प्रेक्षक नव्हते, तर कलावंत होते. लेखक होते. भजनी बुवा होते. अभिनेते होते. 1949 नंतरचा काळ असा होता की एक दिवससुद्धा मला मोकळा मिळायचा नाही. प्रत्येक चाळ कमिट्यांकडून काही ना काही कार्यक्रम आखले जायचे. आम्ही कधी त्याच्यासाठी बिदागी मागितली नाही. ते देतील तेच गोड मानून घेतलं. कधी कधी तर रात्रभर कार्यक्रम करूनसुद्धा त्याचे पाचच रुपये मिळायचे. नंतर मग आम्ही आमच्या कलाकारांसाठी रीतसर पैसे घ्यायला लागलो. म्हणजे समजा, वीस रुपये मिळाले तर प्रत्येक कलाकाराला नाईटचे तीन-तीन रुपये मिळायचे.

मी काय, अर्धा कोकणी आणि अर्धा घाटी आहे. घाटावर आणि कोकणात होणाऱ्या कलाप्रकारांमध्ये चांगलाच फरक आहे. कोकणात दशावतार होतात आणि घाटावर तमाशे. मुंबईमध्ये ह्या दोन्ही प्रकारांचा संगम झाला. थोडं ह्यांचं त्यांनी घेतलं, थोडं त्यांचं ह्यांनी. मी स्वत: माझ्या कार्यक्रमांत या दोन प्रकारांचं मिश्रण केलेय.

चाळी-चाळीतून वेगवेगळे सण साजरे व्हायचे. त्यात मुख्य असते सत्यनारायणाची महापूजा. स्वातंत्र्यानंतर 15 ऑगस्ट, 26 जानेवारी, 14 नोव्हेंबरचा बालदिन अशा राष्ट्रीय उत्सवांची पण भर पडली.

लोकमान्य टिळक स्वराज्याची मागणी घेऊन ठाकले होते. गिरणी कामगारांमध्ये टिळक अत्यंत लोकप्रिय होते. गिरणीकामगारांचा पहिला उत्स्फूर्त संप 1908 साली झाला. टिळकांना सरकारने जाहीर केलेल्या शिक्षेविरुद्ध. महाराष्ट्रात स्वराज्याची चळवळ संघटित स्वरूपात उभी करण्यासाठी त्यांनी गणपती उत्सव आणि शिवजयंती उत्सव सुरू केले. जनजागरणासाठी आवश्यक असणारी भावना जागृत करणारी प्रतीकं लोकांना मिळवून दिली. वैयक्तिकरीत्या पूजला जाणारा गणपती आता सार्वजनिक उत्सव झाला. नवीन राष्ट्राच्या उभारणीसाठी राजकीय आणि ऐतिहासिक मिथकांचा वापर टिळकांनी केला. 1893च्या हिंदू-मुस्लिम दंगलीनंतर लगेच टिळकांनी गणेशोत्सवाला प्रोत्साहन दिलं. मात्र गिरणी कामगारांवरचे अन्याय हिरीरीने मांडणारे आणि ब्राह्मण्यवादावर टीका करणारे दुसरे नेते, नारायण मेघाजी लोखंडे यांचे या उत्सवावरून लोकमान्य टिळकांशी मतभेद होते. 18 सप्टेंबर 1894च्या केसरीमध्ये टिळकांनी पुण्यात साजरा झालेल्या प्रचंड स्वरूपाच्या सार्वजनिक गणेशोत्सवाचं कौतुक केलं. केवळ पांढरपेशा घरात साजरी होणारी पूजा आता सार्वजनिक झाल्यामुळे या उत्सवात बहुजनसमाजाचे लोक सामील होऊ शकतात असा त्यांनी उल्लेख केला.[6] लोखंड्यांनी मात्र गणेशोत्सवाचं लोण पसरू लागल्यानंतर त्यात अपप्रवृत्ती शिरल्याची तक्रार करून टिळकांवर घणाघाती टीका केली, 'ज्यास देशाची खरी कळकळ आहे, त्यास असली मेळ्याची ढोंगे उपयोगाची नाहीत. कारण या मेळ्याची उत्पत्ती केवळ मुसलमान लोकांच्या चुरशीवर झाली आहे.' 1893 साली झालेल्या दंग्यानंतर एरवी हिंदू-मुसलमान एकत्रितपणे भाग घेत असलेल्या ताबूत मिरवणुकीला पर्याय म्हणून, फक्त हिंदूचे बहुजनसमाजाला बरोबर घेऊन करमणूक कार्यक्रम केले तर काय बिघडले असा सूर टिळकांच्या केसरीतल्या (18 सप्टेंबर 1884) अग्रलेखात स्पष्ट दिसतो. टिळकांनी या गणपती मेळ्यांची तुलना पंढरपूरच्या वारीशी केली. यावरही लोखंड्यांनी टीका केली. 'पंढरपूरच्या आषाढी कार्तिकी दिंड्यांची व ताबूताच्या जागी केलेल्या गणपतीपुढे नाचणाऱ्या मेळ्याची समता दाखवून लोकांच्या डोळ्यात धूळ टाकणे केसरीकारासच शोभते.'[7]

लोखंड्याचं वृत्तपत्र 'दीनबंधू' आणि टिळकांचं 'केसरी' यातील वादविवादातून हे वैचारिक मतभेद समोर आले तरी वास्तवात सर्वसामान्य लोकांच्या पातळीवर प्रत्येक वर्षी गणपती उत्सव अधिकाधिक उत्सवप्रियतेने साजरा होऊ लागला. समाजाच्या सर्व थरातील लोकांच्या आर्थिक पाठबळावर गणपती मंडळं उभी राहिली. गिरणगावात तर सर्वात अधिक सामाजिक आणि राजकीय प्रभाव पाडणारा असा हा उत्सव झाला. मुंबईच्या अस्मितेचं एक महत्त्वाचं प्रतीक म्हणून गणपती उत्सव, विशेषत: त्याचा उत्साही विसर्जन सोहळा याला आंतरराष्ट्रीय प्रसिद्धी मिळाली.

महाराष्ट्रातल्या डाव्या पक्षांनी गणेशोत्सव वा शिवजयंती उत्सव यांच्या धार्मिक अंगाला अवास्तव महत्त्व दिलं. या उत्सवाच्या लोकप्रियतेचं कारण धार्मिकतेपेक्षा सांस्कृतिक होतं, हे वास्तव बहुतेक नेत्यांनी दुर्लक्षिल्यामुळे, समाजाच्या एका मोठ्या परिमाणाला ते समजून घेऊ शकले नाहीत. लोकांमध्ये प्रत्यक्ष काम करणाऱ्या कार्यकर्त्यांचाही त्यामुळे वैचारिक गोंधळ झाला. कार्यकर्त्यांची आणि डाव्या चळवळीला पाठिंबा देणाऱ्या कामगारांची मन:स्थिती दुभंगली

गेली. याचा फायदा 1966नंतर शिवसेनेला मिळाला. शिवसेनेने गणेशोत्सव, शिवजयंती, नवरात्र या उत्सवांच्या धार्मिक अंगाला उत्तेजित केलं आणि सांस्कृतिक अंगाचा आपल्या राजकारणासाठी फायदा उठवला. कामगारांच्या दुभंगलेल्या मानसिकतेचाही फायदा शिवसेनेला मिळाला. कामावर असताना डाव्या युनियनला पाठिंबा तर चाळीत परतल्यावर मात्र शिवसेनेच्या शाखेशी बांधिलकी अशा कात्रीत कामगार अनेक वर्षं सापडले. अखेर कालांतराने डाव्या संघटनांशी असलेलं ऐतिहासिक नातं तोडून त्यांनी शिवसेनेची कास धरली. (शिवसेनेवरच्या प्रकरण 4मध्ये याचा ऊहापोह केलेला आहे.) पुढे 'मराठी माणूस' हा मुद्दा शिवसेनेनं हिंदुत्वाच्या राजकारणासाठी सोडून दिल्यावर या उत्सवांना पूर्ण भगवा रंग मिळाला. डाव्या आणि इतर धर्मनिरपेक्ष (सेक्युलर) पक्षांनी समाजाच्या सांस्कृतिक गरजांना आत्मविश्वासाने आणि योग्य वेळी प्रतिसाद दिला असता, तर कदाचित इतिहास बदलू शकला असता.

### धार्मिक आणि जातीय भेदभाव

एका व्यापक अर्थाने गिरणगावात कामगारांची एकसंध संस्कृती निर्माण झाली हे खरं असलं तरी धार्मिक कलह अगदी 19व्या शतकाच्या मध्यापासून वेळोवेळी प्रकट होत असत. हिंसा हा जगण्याचा एक अविभाज्य घटक होता आणि जातीधर्माचे मतभेद अनेक वेळा हिंसक पद्धतीने रस्त्यावर येत. त्याचे प्रतिसाद गिरण्यातही उमटत. गिरणगावातले लोक बहुसंख्येने महाराष्ट्रातील मधल्या जातीचे, बहुजनसमाजातले हिंदू होते. पण कालांतराने उत्तरप्रदेश, आंध्रप्रदेश या भागांतूनही पोटापाण्याकरता मुसलमान आणि हिंदू लोक मुंबईत येऊ लागले.

### हरिनाथ रामप्यारे तिवारी (वय 52 वर्षे)

मूळ उत्तर प्रदेशचे असले तरी मुंबईतल्या तिसऱ्या पिढीचे प्रतिनिधी. पण शिक्षण उत्तर प्रदेशात. स्टँडर्ड मिल (पूर्वीची चायना मिल) मध्ये नोकरी. मराठीत उत्तम भाषण करतात.

आमच्या एकूण तीन पिढ्या मुंबईत गेल्या. सगळ्यात आधी माझे आजोबा इथे आले. आम्ही मूळचे उत्तर प्रदेशातल्या रानीपूरचे. तिथल्या राजघराण्यामध्ये आमचे पूर्वज पेशवा होते. पण मग राजेशाही संपली. आणि घरची परिस्थिती बिघडली तसा आजोबांनी मुंबईचा रस्ता धरला. त्यानंतर 1950 साली वडील मुंबईत आले. माझा जन्मही इथलाच. पण बारावीपर्यंतचं शिक्षण मात्र उत्तर प्रदेशातच झालं.

वडील इकडे नॅशनल बायसिकल कॉर्पोरेशनमध्ये कामाला होते. 1972 साली मी इकडे आलो आणि तिथेच हेल्पर म्हणून कामाला लागलो. नंतर हळूहळू सायकल फिटर बनलो. पण दोनच वर्षांत कंपनी बंद पडली. आणि माझी ती नोकरी सुटली. मग 1974 साली शिवडीच्या चायना मिलमध्ये बदलीवर राहिलो.

मुंबईला आलो तेव्हा मी काहीतरी18-19 वर्षांचा असेन. आम्ही राहत होतो सायन कोळीवाड्यात. आजूबाजूला सगळी मराठी वस्ती. आणि मी उत्तर प्रदेशवाला. इकडे आलो तोही तिकडच्याच वेशात. धोतर, हाफ कमीज आणि लांब शेंडी. तर कोळीवाड्यातली मुलं माझी शेंडी ओढायची आणि मला 'शेंडीवाला भय्या' म्हणून चिडवायची. या प्रकारामुळे मी खूप कंटाळलो होतो. मराठी तर जराही समजायचं नाही. मग वडिलांना विचारायचो, 'ही मुलं काय म्हणतायत?' तेव्हा वडील सांगायचे, 'अरे हम जो शिखा रखते है उसे मराठीमें शेंडी कहते है और उत्तर प्रदेशवालोंको भय्या बोलते है. लेकिन यहाँपर सब मराठी लोगही है, उनसे झगडा मत करना.' पण माझ्या स्वभावानुसार मी भांडायचो आणि वडिलांसारखी मी शेंडी छोटीही केली नाही. तेव्हा अख्ख्या कोळीवाड्यात शेंडी ठेवणारा मी एकटाच होतो.

मला मराठी कसं यायला लागलं ती सुद्धा एक गोष्टच आहे. आमच्या शेजारी अलिबागचे म्हात्रे म्हणून राहायचे. त्यांच्या मुलीचं आणि माझं नळाच्या पाण्यावरून रोज भांडण व्हायचं. आम्ही आपापल्या भाषेतून भांडायचो. तीन महिन्यांत ती हिंदी शिकली आणि मी मराठी शिकलो!

1974 साली शिवडीला चायना मिलमध्ये लागलो तेव्हा

शिकाऊ म्हणून होतो. वीव्हिंग खात्यात. सात महिन्यानंतर मला बदलीचा पास मिळाला. पण मला काम नेहमी मिळायचं; कारण मी ड्युटीवर असताना साधा चहा प्यायलाही बाहेर जायचो नाही. तेव्हा आमच्या खात्यातल्या 330 कामगारांपैकी 95 टक्के कामगार मराठी होते आणि उरलेल्या पाच टक्क्यांत यू.पी.वाले, कामाठी, मुसलमान वगैरे होते. पण सगळे जण एकमेकांशी खेळीमेळीने राहायचे. इतके की डबा पण एकत्र खायचे. म्हणजे समजा, मी चपाती आणली आहे, आणखी कुणाचं लोणचं आहे. तर सगळे प्रसादासारखं वाटून खायचे. मराठी माणूस म्हणजे त्याच्या प्रत्येक वाक्याच्या आधी शिवी घालणार पण प्रेमाने. मला आधी थोडे दिवस त्यांनी शेंडीवाला म्हणून चिडवलं. थोडी धुसफूस करणारे लोकही होते, पण 90 टक्के माणसं चांगली होती. ती म्हणायची, ''तो जरी बाहेरून आलेला असला तरी कामगार चांगला आहे. आमच्या खात्यातले जॉबरसुद्धा माझ्याशी चांगले होते. कधीकधी बदली मिळाली नाही तर म्हणायचे, 'अरे कुठे परत चाललास?' आणि स्वत:च्या खात्यात काम द्यायचे.

असेच एक जॉबर होते कृष्णा सावंत म्हणून. ते माझे गुरू. त्यांनी वेळ पडली तर मारून मारून मला काम शिकवलं. त्यांची एक आठवण आहे. तेव्हा परब म्हणून एक सुपरवायझर होता. सगळे त्याला देव आनंद म्हणून चिडवायचे. तर त्याचा माझ्यावर खूप राग होता. दर दोन दिवसांनी तो माझ्या कामात काहीतरी चूक काढायचा आणि 50 पैसे फाइन करायचा. हे कृष्णा सावंतांना कळलं तेव्हा ते त्याला म्हणाले, 'अरे परब्या, तू त्या भय्याच्या मागे का लागतोस?' परब सांगायला लागला, 'अरे वो कपडा खराब चलाता है. मला तर त्याला चार्जशीट देऊन बाहेर काढायचं आहे.' हे ऐकल्यावर मागाच्या शटलचं लाकूडच कृष्णा सावंतनी हातात घेतलं. म्हणाले, 'अरे हरामखोरा! तो चांगला कामगार आहे. त्याला कशाला काढतोस?' आणि त्यांनी ते लाकूड त्याच्यावर उगारलं. परब तर खात्यातून पळूनच गेला. नंतर काही माझ्या वाटेला गेला नाही.

आणखी एक, राष्ट्रीय मिल मजदूर संघाचा लीडरसुद्धा असाच त्रास द्यायचा. मला ते आवडायचं नाही. मी बोलायचो. तर तो मला म्हणायला लागला, 'भय्या, जास्त हुशारी करू नकोस. मी संघाचा प्रतिनिधी आहे. तुला बाहेर काढू शकतो.' मी एकदा त्याला म्हटलं, 'आज सुटल्यावर तुझ्याशी बोलायचं आहे.' मग मी माझ्या चारपाच जणांना घेतलं आणि त्याला खाडी मैदानात नेलं. तिकडे त्याला विचारलं की, 'मला काही यातलं कळत नाही. युनियन म्हणजे काय? मला सांग. युनियन कामगारांच्या भल्यासाठी असते की त्यांना त्रास द्यायला?' त्याला इतकं बोललो की तो खजीलच झाला. पण संघाच्या कार्यकर्त्यांचा सगळ्याच कामगारांना जाच व्हायचा. सगळ्यांचा रोष होता त्यांच्यावर. कधी पाच पैशाची पगारवाढ करून दिली नाही त्यांनी. कामगाराला मिळणाऱ्या पैशातले 2 टक्के स्वत: खायचे. जबरदस्ती पावती फाडायला लावायचे. याचा इतका राग आला होता की 1982 साली नर्दुल्ला टँकवर सभा झाली, त्यात मी स्वत: दोन्ही हात वर करून ओरडत होतो की संप झालाच पाहिजे. कारण संघवाल्यांच्या तावडीतून सुटायचं होतं.[८]

मूळचे अफगाणिस्तान आणि नैर्ऋत्य सीमा भागातले उंच-निंच गोरेपान, धिप्पाड, सैल झगा आणि पायघोळ सलवार घातलेले आणि हातात सोटा घेऊन फिरणारे पठाण गिरणगाववासीयांना चांगलेच माहितीचे होते. कामगारांना दहशत बसावी अशा सर्व कामात त्यांचा वाटा होता. ते सावकारी करायचे, गिरणीच्या गेटवर पगाराच्या दिवशी गटागटाने जाऊन व्याजाची वसूली करायचे. ज्या गरीब बायकांना त्यांच्या कर्जाची परतफेड करता येत नसे त्यांचा गैरफायदा घ्यायचे, किंवा कर्जबाजारी पुरुषांना त्यांच्या बायका आपल्याला विकत द्यायची सक्ती करायचे.[९] हे पठाण कामगार मैदानामागे असलेल्या आपल्या चाळीबाहेर, रस्त्यांवर सुंभाच्या खाटांवर पडलेले दिसत असं उषा डांगे यांनी आपल्या आत्मचरित्रात म्हटलं आहे. लोक त्यांना घाबरून तो रस्ता चुकवून जात असत. याच भीतीचा उद्रेक 1929च्या हिंदू-

मुसलमान दंग्यात झाला. या दंग्यांना 'पठाण दंगे' असंही नाव आहे.

गिरणगावात जवळजवळ 12-14 गिरण्या या ज्यू धर्मीय मालकांच्या असल्यामुळे गिरणीकामगारात ज्यूधर्मीयदेखील होते.

**सॉलोमन कुडगावकर (वय 89 वर्षे)**

लाल निशाण पक्षात अजून सक्रिय. स्टँडर्ड मिल (पूर्वीची चायना मिल) मध्ये 33 वर्षं नोकरी केली. धर्माने ज्यू असणारे सॉलोमन इस्त्राएलला जाऊन परत आले. त्यांचा एक मुलगा तिथे स्थायिक झाला आहे. अत्यंत उत्साही असे सॉलोमन स्वत:हून मुलाखतीसाठी आले.

मी भारतीय आहे. मी इस्त्रायलला कशाला जाऊ?

दोन हजार वर्षांपूर्वी झालेल्या युद्धात ज्यूंनी पॅलेस्टाइन सोडलं आणि जगभरातल्या अनेक भागांत ते पोहोचले. त्यांच्या जहाजांपैकी एक जहाज आधी केरळच्या किनाऱ्याला लागलं आणि नंतर उत्तर कोकणात येऊन थांबलं. त्यातले ज्यू मग इथेच राहिले. दलित स्त्रियांशी संबंध ठेवून त्यांना मुलं झाली.

माझा जन्म जंजिरा तालुक्यातल्या गोंडघर गावात झाला. आता तो भाग रायगड जिल्ह्यात येतो. जंजिऱ्यावर पूर्वी मुसलमानी राजवट होती. सर मोहम्मद सिद्धी राजा होता. हिंदू त्याच्या पाया पडायचे. त्यामुळे इथे मुसलमान वस्ती जास्त प्रमाणात आहे. इथले बरेच लोक आफ्रिकेला गेले. त्यांची आडनावं म्हणजे गजगे, सोंडे, बंदरकर अशी. पैसे कमवायला. त्यातून मग त्यांनी इथे जमिनी विकत घेतल्या. इथले बहुतेक जमिनीचे मालक एकतर मुसलमान आहेत किंवा मग ब्राह्मण.

आम्ही इथल्या कुळांपैकी होतो. आम्हांला शनिवार तेली म्हणायचे. शनिवार ज्यूंचा शब्बाथ ना. माझी आई म्हणजे अशी मजबूत बांध्याची होती. शेतात काम करायची. धिप्पाड होती आणि वडिलांपेक्षाही उंच होती. आमची बैलगाडी भाड्यावर देऊन वडील दिवसाला सहा आणे कमवायचे. मोठे धार्मिक होते. म्हसळे गावातल्या सिनेगॉगला (ज्यू धर्मीयांचे देऊळ) नेमाने जायचे. 14 मुलं झाली त्यांना. पण त्यातली फक्त चार जगली.

माझं शिक्षण पाचवीपर्यंत झालंय. बहीण मुंबईला दिलेली होती. आमच्या जंजिऱ्यावरून बोटीने भाऊच्या धक्क्याला पोहोचायला सहा तास लागायचे. तिथून पुढे गिरणगावात ट्रामने जायला एक आणा. पण बहिणीला काही माझ्या शिक्षणाचा खर्च उचलणं जमणारं नव्हतं. त्यामुळे मला गावी परतावं लागलं. माझा भाऊ तेव्हा एडवर्ड मिलमध्ये (आताची भारत टेक्सटाइल) होता, बदली कामगार म्हणून. तिकडे तो ड्रॉअरचं काम करायचा.

तेव्हा या गिरणउद्योगात बरेच ज्यू होते. जॅकब ससून म्हणून एक ज्यू गिरणीमालक होता. मुंबईत त्याच्या चौदा गिरण्या होत्या. पण त्याची जात वरची होती. 'कोहेन' जात. आम्ही 'इस्त्रायली ज्यू' म्हणजे सगळ्यात खालची जात. आणखी एक मधलीही जात असते 'लेव्ही' म्हणून. माझ्या भावाचे प्रयत्न चालू होते त्याच्या मिलमध्ये मला चिकटवण्याचे. तिथल्या एका ज्यू मॅनेजरच्या ओळखीने. पण ते काही झालं नाही. मग मी बऱ्याच वेगवेगळ्या गिरण्यांमधून काम करत राहिलो. हे ज्यू मॅनेजर संप फोडण्यात आघाडीवर असायचे.

त्या काळात विणकरांचं काम सगळ्यात कठीण असायचं. हातमाग असायचे ना तेव्हा. हे यंत्रमाग वगैरे 1970च्या नंतर आले सगळे. तेव्हा म्हणजे त्या विणकराला एका हातात लिव्हर धरून एका हाताने धोटा खेचावा लागायचा. एका मिनिटाला तीन धोटे. शिवाय त्या धोट्यातून कांडी वेगळी काढून टाकायची असायची. महायुद्धाच्या दिवसात आम्ही ब्रिटिश सैन्यासाठी कॅनव्हासचे शीट्स बनवायचं काम करत होतो. त्यासाठी सोळा धाग्यांचा एक धागा बनवायला लागायचा. ते सूत इतकं जाड बनवायचं की मशीनवर चक्कं सरळसोट न वाकता उभं राह्यचं. त्या कॅनव्हास शीट बनवण्यासाठी 5 रिळांचा हातमाग वापरायला लागायचा. सगळा कापूस नाकात जायचा आणि तिथेच साठायचा. त्याचा मला भयंकर त्रास झाला. दहा दिवस

हॉस्पिटलमध्ये पडून होतो. खोकल्यातून सूताची जाड घाण बाहेर आली. हे तर काय सगळ्यांसाठी नेहमीचंच होतं. जवळजवळ 10-12 टक्के कामगारांना तरी टी.बी.ची नाहीतर दम्याची लागण व्हायचीच.

1940 साली आमचा मिनीमम पगार होता महिन्याला 30 रुपये आणि बोनस मिळायचा 40 रुपये.

तेव्हा मुस्लिम वस्ती जी होती ती लालबागला, पेरू कंपाउंडमध्ये जास्त होती. पेरवाची चाळ म्हणायचे. मशीद पण होती एक तिथे. आणि एक बाजार होता. तिथल्या गाळ्यांची भाडी गोळा करणारेसुद्धा सगळे मुसलमानच असायचे. हो, पण जाम मिलजवळच्या मोहम्मदी बिल्डींगमध्ये मात्र हिंदू मुस्लिम दोन्ही सारख्याच प्रमाणात राहायला होते. गिरण्यांमधून जे मुसलमान कामाला होते ते बहुतेक करून यू.पी.वाले असायचे आणि सगळे अतिशय चांगले कारागीर होते. ते साधारणपणे स्पिनिंग नाहीतर साइझिंग खात्यात असायचे. या पेरूच्या चाळीच्या मैदानात मुसलमान मासळी मटणाचा व्यापार करायचे, तर हिंदू कांदेबटाट्याचा. पठाण मुसलमान होते ते रुपयाला एक आणा, दोन आणे व्याजाने धंदा करायचे. कर्ज द्यायचे. मासळी विकणाऱ्या कोळिणींकडून व्याज वसूल करायचे. खूप त्रास द्यायचे.

मुसलमान कामगारांशी मात्र दुश्मनी वगैरे कधी नसायची. फक्त हिंदू कामगार त्यांच्या डब्यातलं काही खायचे नाहीत. मी मात्र खायचो. मी तर हिंदूंच्या पण घरात जाऊन त्यांच्या घरचं खायचोबियचो. मला त्यांनी ज्यू म्हणून स्वीकारलं होतं. 1947 सालच्या दंगलीत मात्र अनेक मुसलमान पळाले.

दलित? नाही. त्यांना मात्र कधी वीव्हिंग डिपार्टमेंटमध्ये घ्यायचे नाहीत. एकदा मात्र ज्युपिटर मिलमध्ये तसं झालं होतं. एका लोकल कम्युनिस्ट पुढाऱ्याने एका महार कामगाराला वीव्हिंग खात्यात लावलं होतं. त्याला ते काम शिकवलं. पण सगळं खातं त्याच्या विरोधात गेलं. का? तर त्यांचं म्हणणं असं होतं की कम्युनिस्ट चळवळ ज्या युरोपातून आली तिकडे हा जातीपातीचा प्रश्न नाही. तिथे चालत असेल! इथल्या पुढाऱ्यांना पण जातीपातींच्या झगड्यापेक्षा वर्गावर्गातला लढाच जास्त महत्त्वाचा वाटत होता.

शहरीकरणाच्या प्रक्रियेत जातिभेदाच्या भिंती कमकुवत होतात हे खरं असलं तरी रोजच्या जीवनात दलित आणि सवर्ण यांच्यामधल्या भिंती अजूनही टिकून आहेत. गिरणगावदेखील याला अपवाद नाही. जातिभेदाचे चटके पूर्वी अस्पृश्य असणाऱ्या दलितांनी सगळ्यात जास्त सोसलेले आहेत. 1864च्या जनगणनेत मुंबईत 3.9 टक्के दलित (अस्पृश्य) आढळून आले होते. 1872मध्ये त्यांची संख्या 4.86 टक्के होती. 1901 साली ती टक्केवारी 9.38 एवढी वाढली. त्या अनुसार प्रमाण गिरणी कामगारांत असलेल्या त्यांच्या टक्केवारीतही दिसतं. 1872मध्ये 0.99 टक्के, 1911मध्ये 9.05 टक्के, 1921मध्ये 11.91 टक्के तर 1941मध्ये 13.81 टक्के. 1921पासून दलित गिरणी कामगारांचं प्रमाण एकूण लोकसंख्येच्या त्यांच्या प्रमाणापेक्षाही अधिक दिसून येऊ लागलं.[10]

या 1920च्या दरम्यान टाकीचे संडास बांधले जाऊ लागले. आणि दलितांच्या वाट्याला आलेल्या हलालखोरीच्या डोक्यावरून विष्ठा वाहून नेणे पद्धतीला थोडा आळा बसू लागला. आपल्या कामात निष्णात असणाऱ्या 'जुलेहा' जमातीच्या कामगारांना इतर कामगारांनी सामावून घेतलं पाहिजे असा नियम करणाऱ्या मालकांनी दलितांच्या बाबतीत तशी पावलं उचलली नाहीत. उलट काही गिरण्यात दलितांना नोकरीवर घेण्यास मज्जाव होता. उदाहरणार्थ, 1874 साली युनायटेड स्पिनिंग अॅण्ड वीव्हिंग मिलच्या मॅनेजरने जाहीर केलं की 'मागासवर्गीय' कामगारांना नोकरी मिळणार नाही. पण या गिरणीत मुसलमान कामगारांना तशी बंदी नव्हती. तशीच बंदी 1908 साली पेटीट मिलने घातली होती.[11] वीव्हिंग खातं ज्याला त्रासन खातं म्हणतात त्या खात्यात तोंडाने बॉबिनचा धागा तोडायचा असल्याने तिथे अस्पृश्य कामगाराबरोबर स्पृश्य कामगार काम करायला नकार देत.

### दत्ता इस्वलकर (वय 52 वर्षे)

1982च्या संपानंतर बंद झालेल्या गिरणीच्या कामगारांना घेऊन संघर्ष उभा करण्यात पुढाकार. गेली 20 वर्षे गिरणी कामगारांच्या विविध प्रश्नांवर सातत्याने आणि कल्पकतेने लढणाऱ्या गिरणी कामगार संघर्ष समिती या युनियनचे सरचिटणीस. मॉडर्न मिल कंपाउंडच्या बैठ्या चाळीत वास्तव्य.

गिरण्यांमध्ये वीस वर्षांपूर्वीही बरीच जातपात पाळली जायची. आमच्या क्लेरिकल मधल्या काहींनी एकदा विष्णूला–दलित होता तो–ऑफीसबाहेर असलेलं पाण्याचं मडकं भरायला सांगितलं. तर वरच्या जातीतले लोक त्या मडक्याला हातही लावायला तयार झाले नाहीत. त्यांना मी हटकलं तर म्हणाले, 'मास्तर, महाराने भरलेलं पाणी कसं पिणार?' हे लोक बसून पान खातील त्यांच्याबरोबर, पण त्यांचा स्पर्श झालेलं पाणी प्यायला त्यांना नको. म्हणजे त्यांनी कधी विष्णूला वाईट वागवलं नाही. उलट मित्रच होते त्याचे. पण कधी त्याच्या घरी मात्र गेले नाहीत. कधी कोणत्या दलिताच्या डब्यातलंसुद्धा खायचे नाहीत. गंमत म्हणजे या मराठी कामगारांना यू.पी.वाल्या कामगारांची जात कळायची नाही. त्यामुळे त्यांच्याबरोबर ते शिवाशीव वगैरे पाळायचे नाहीत.

आता दलितांना गिरणीत कामाला ठेवण्यापासून तुम्ही कोणाला थांबवू शकत नाही. पण त्यांना फक्त स्पिनिंग खात्यात काम द्यायचे. पूर्वी काय होतं, की वीव्हिंग खात्यात बॉबिनीतून ओठांनी धागा खेचून काढावा लागायचा. तर आधीच्या पाळीत एखाद्या साच्यावर कोण दलित बसला असेल तर नंतरच्या पाळीतला सवर्ण कामगार त्या साच्यावर बसायला नकार द्यायचा. पुढे आधुनिक साचे आले तरी ही पद्धत चालूच राहिली. अर्थात पगार त्यांना सारखाच मिळायचा. जवळजवळ 30 टक्के कामगार महार जातीचेच होते तेव्हा.

एकदा आमच्या मिलमध्ये पूजा व्हायची होती. पूजा कमिटीवरचा एक मेंबर कम्युनिस्ट पार्टीचा होता. त्याने एका दलिताचं नाव कमिटीच्या उपाध्यक्षपदासाठी पुढे केलं. त्याच्या जातीचा मुद्दा तर आम्ही लक्षातच नव्हता घेतला. आम्ही त्याला निवडलं. कारण त्याला कार्यक्रमाचं आयोजन छान जमायचं. तर कामगारांनी आमच्याजवळ या गोष्टीची तक्रार केली. पूजेचा प्रसादही घेतला नाही. नंतर त्याचं मोठंच प्रकरण झालं आमच्या मिलमध्ये. पण आम्ही आमच्या निर्णयावर ठाम राहिलो.

### विष्णू बयाजी शिंदे (वय 74 वर्षे)

गिरणी कामगारांच्या दुसऱ्या पिढीचे प्रतिनिधी.

1890च्या सुमाराला आमचे वडील बी.आय.टी. चाळीत तेरा नंबरमध्ये राहायला लागले. या म्युनिसिपालिटीच्या चाळी होत्या. त्यात कोकणी, घाटी असे वेगळे नव्हते. म्हणजे त्यांच्या भाषेत फरक होता पण एकत्रित राहायचे. तसे एकमेकांना कमी मानायचे. म्हणजे कोकणी म्हणायचा की हा 'घाटी' आहे; म्हणजे कमी प्रमाणाचा. तसेच घाटीला पण वाटायचे. पण जातीची बंधनं होती. म्हणजे बी.आय.टी. चाळीत खोली घ्यायच्यावेळी विचारणा व्हायची. सोनापूर स्मशानासारखी! जात, पोटजात विचारली जायची. तशीच व्यवस्था असायची. म्हणजे मांग आणि महार यांच्याकरता वेगळ्या चाळी. चांभारांची वेगळी. ते महारांमध्ये नाय रहाणार. मराठे आणि त्यांच्या पोटजाती म्हणजे तेली, भंडारी, परीट वगैरे एकत्र चाळीत राहणार. आम्ही मराठा. हो, पोटजात नाही. गिरणीत पण भेदभाव असायचा. अस्पृश्यांना पाणी पिण्याची व्यवस्था वेगळी होती. पाण्याची टाकी आणि नळ होता तिथे जातीवाचक बोर्ड लावलेला असायचा दिवारावर साईडला.

1949पर्यंत अशी स्थिती होती. स्वातंत्र्यानंतरसुद्धा काही वर्षं. अस्पृश्याने मराठ्यांना हात लावायचा नाही. त्याला 'दोष होतो' असं म्हणायचे. गिरण्यात वीव्हिंग डिपार्टमेंटमध्ये मराठा आणि पोटजाती असायच्या. तिथे अस्पृश्यांना प्रवेश नव्हता. स्पिनिंगमध्ये अस्पृश्य असायचे. तेव्हा हॉटेलमध्ये अस्पृश्यांना चहाचे कप वेगळे होते. हॉटेलच्या दरवाजाच्या बाहेर फळी मांडलेली असायची. तिथे पाण्याचे ग्लास ठेवलेले असायचे अस्पृश्यांकरता. हो हो, मी समक्ष पाहिलेला अनुभव हाय. बी.आय.टी. चाळीजवळ आग्रीपाड्याला रिपन रोडवर आमच्या चुलत्याचं यशवंत हॉटेल होतं. त्या तिथे अस्पृश्यांना बाहेर

दुसऱ्या भांड्याने पाणी आणून द्यायचे. अस्पृश्याने पाणी पिऊन मग भांडे विसळून ठेवायचे. हॉटेलच्या आत त्यांना शिरकाव नव्हता. स्वातंत्र्यानंतर कायदा झाला. म्हणून हॉटेलांमध्ये तुम्ही बोर्ड बघता ना, 'हे हॉटेल सर्वांना खुले आहे' किंवा 'हे मंदिर सर्वांना खुले आहे', असं नंतरच्या काळात त्यामुळे लिहायला लागले.

मात्र उत्तर प्रदेशांतून किंवा मध्यप्रदेशांतून लोक यायचे. त्यांना कुठेही प्रवेश असायचा. कारण त्यांची जात कळायची नाही. त्या भय्यांना पंडित म्हणायचे. दूधाचा धंदा करायचे, ते यादव. ते हंड्यांनी दूध विकायचे. दुसरी कोणती जात हा धंदा करायची नाही. त्यांच्यातले कोण अस्पृश्य असतील ते वरकड काम करायचे; म्हणजे पानपट्टीच्या दुकानावर वगैरे. ओळखता नाय यायचे. पण जानवं नाही तो कमी समजला जायचा.

मी बी.आय.टी. चाळीतच वाढलो. आम्ही तेरा नंबरवरून सोळा नंबरला आलो होतो. मला आठवतं, अगदी 1940 सालात म्हणजे मी दहा वर्षांचा होतो. मुंबईचे रस्ते रोज पाण्याने साफ केले जायचे. म्युनिसिपालीटीचे झाडूवाले करायचे. कारण मालवाहतूक मुख्य बैलगाड्यांनी व्हायची. लॉऱ्या 1950 नंतर आल्या. तोपर्यंत एखादीच लॉरी खळखळ असा साखळ्याचा आवाज करीत जायची. बैलगाड्यांचं शेण खूप सांडायचं म्हणून रस्ते धुवायला लागायचे.

मी मसजिद बंदरात मामाबरोबर कामाला लागलो. महायुद्ध चालू होतं, 40 साल असेल तेव्हा. लाकडाचे खोके-क्रेट करायचं काम होतं. मजुरी चांगली मिळायची. एक खोका केला की एक रुपया. मी दिवसाला दहा करीत होतो. मग संध्याकाळी बी.आय.टी. चाळीतच राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची शाखा भरायची तिकडे जायचो. बालपथकात होतो. आता तिथल्या दोनच शिक्षकांची नावं आठवतात. एक श्याम राजे होता आणि एक गोखले होता, वाटतं ब्राह्मण होते. तिथे झेंडावंदन व्हायचं. झेंडा म्हणजे भगवा झेंडा. नंतर लाठी आणि लेझीम असायची. डॉ.हेडगेवार यांनी स्थापन केलेला संघ एवढं माहीत आहे. गाणी वगैरे म्हणायचो. आज ती आठवत नाहीत. प्रत्येक संक्रांतीला मेळावा असायचा. गोळवलकर गुरुजी यायचे, पाठीवर थाप मारून जायचे. दोन वेळा आलेले मला आठवतं. त्यामुळे आपुलकी वाटायची.

1942ची वार्ता सांगतो. गांधीजींचा लढा होता तेव्हा. आर.एस.एस.मध्ये आम्हांला सांगायचे की ही शाखा संरक्षणाकरता आहे. दुष्मनांपासून आपलं संरक्षण करायचं. ब्रिटिशांना घालवणं आपलं काम नाय असं सांगायचे 1942च्या लढ्यात आपण सामील नाय असं शाखेत सांगायचे. पण एक होता हां शाखेत. आम्हांला नेते काय सांगायचे की शाखेत जी चर्मकार मुलं होती, त्यांना घरी घेऊन जा, चहा पाजा, मैत्री करा. ब्राह्मणच पायजे असा काय नाय. शाखा सर्वांचीच होती. पण मला आधीपासूनच ते शिवायचा नाय वगैरे आवडायचं नाय. मी मुद्दामहून अस्पृश्य असला तर शिवायचा. गांधीहत्या झाली ना 1948 साली. तेव्हा दंगली झाल्या. घोडपदेवला बोरकरदादा म्हणून तालीमवाला होता. तिथून पार्टी आली, सोळा नंबर चाळीत आमचे नेते राहायचे गोखले, त्यांच्यावर हल्ला करायला. मी तेव्हा 18 वर्षांचा झालो होतो. शाखेत जाणं पण सोडलं होतं. दरम्यान कमला मिलमध्ये नोकरीलाही लागलो.

गिरणगावातल्या कामगार संस्कृतीत हिंसाचार वर्ज्य नव्हता. किंबहुना नेहमीच्या जीवनात कुठल्या ना कुठल्याप्रकारे त्याचा आविष्कार होतच असे. 1893 साली सौराष्ट्रात हिंदू आणि मुसलमान यांच्यात दंगा झाला. तो दंगा शमतो तोच त्याचं लोण मुंबईत पसरलं. आपापल्या धर्माच्या लोकांच्या संरक्षणासाठी हिंदू आणि मुसलमानांनी मुंबईत वेगवेगळ्या सभा घेतल्या. 11 ऑगस्ट 1893ला दक्षिण मुंबईतील जामा मशिदीतून प्रार्थनेनंतर बाहेर आल्यावर मुसलमानांनी हिंदूंवर हल्ला केला. दुसऱ्या दिवशी गिरणगावातल्या हिंदूंनी मुसलमानांवर प्रतिहल्ला केला. दंगा एवढा उसळला की गोदी आणि गिरण्या बंद कराव्या लागल्या. आठ दिवस चाललेल्या या भीषण दंगलीत 80 लोक मरण पावले. (यात 33 हिंदू, 46 मुसलमान आणि 1 ज्यू)

सातशे लोक जखमी झाले.[12] टिळकांनी केसरीत लिहिलं की मुसलमान शेफारले आहेत, कारण त्यांना इंग्रज सरकारची फूस आहे. पुण्यात शनिवारवाड्याच्या समोर झालेल्या सभेत टिळकांनी हिंदूंना संघटित आणि लढाऊ व्हायला सांगितलं. त्याचं कारण त्यांनी असं सांगितलं की दोन्ही जमाती जर तुल्यबळ असतील तर इंग्रजांना दंगल घडवून आणणं कठीण जाईल. त्याचबरोबर आपण हिंदूंना मुसलमानांपासून वाचवतो असं म्हणून दोन्ही जमातीत वितुष्ट आणणंही कठिण जाईल. पण नारायण मेघाजी लोखंडे यांनी टिळकांच्या या मुसलमानांना दोषी धरण्याच्या प्रवृत्तींवर टीका केली. त्यांच्या मते सौराष्ट्रातील जुनागढ येथून आलेल्या मुसलमानांनी इथल्या मुसलमानांना चिथावण्याचं काम केलं.

1929मध्ये झालेल्या हिंदू-मुसलमान दंगलींना 'पठाण दंगली' म्हटलं जातं. शिवडीच्या जनरल मोटर्समध्ये फेब्रुवारी 1929मध्ये संप चालू होता. तो फोडायला मालकाने पठाण आणले. यावरून दंगल सुरू झाली आणि काही पठाण मारले गेले. शौकतअली म्हणून भेंडीबाजारातल्या एका जातीयवादी कट्टर मुसलमानाने याला जातीय रंग दिला असं एस.एस.मिरजकरांनी आपल्या आत्मचरित्रात म्हटलं आहे. हे पठाण मुलं पळवत आहेत अशा अफवा पसरल्यावर गिरणगावचे कामगार लोखंडी शिगा, काठ्या, वगैरे घेऊन पठाण चाळीवर आणि इतर मुसलमान रहिवाशांवर चाल करून गेले. या परिसरात एव्हाना जम बसवलेल्या कम्युनिस्ट पुढाऱ्यांनी भडकलेला हा दंगा टाळण्याची शिकस्त केली होती.

**शेख जैनू चांद (वय 63 वर्षे)**

गिरणगावचे शाहीर. शाहीर अमर शेखांचे एकेकाळचे सहकारी. 2006मध्ये निधन.

हो तर. मुंबईतल्या दंग्यांबद्दल भयंकरच ऐकलंय हो. गिरणगावामध्येच दंगा जास्त झाला. दंगेखोरांना पेटवण्याचं काम इथेच जास्त झालं. म्हणजे बघा, लालबाग किंवा परळ, शिवडी, सैतानचौकी किंवा एल्फिन्स्टन या भागांमध्ये ते झाले. त्याचं कारण असं की इथले जे मुसलमान लोक होते ते कुठेतरी एका चाळीत एकत्र राहायचे. नाहीतर एखाद्या वाडीत दहा-पाच घरं असायची. उलट मदनपुरा, महम्मदअली रोड, भेंडीबाजार इथे दंग्यांचा फारसा प्रभाव झाला नाही. तिकडे ते संघटित होते. दुसऱ्या समाजाच्या लोकांना आपल्यामध्ये येऊच द्यायचे नाही. पण इथे त्यांची अशी स्थिती होती की इकडे आड, तिकडे विहीर. त्यामुळे इकडे दंग्यात मुसलमान माणसं मारली गेली. अक्षरशः कुटुंबच्या कुटुंबं गारद झाली.

याचवेळी कामगारांना पठाणांवर बदला घेणं साधता आलं. हे पठाण लोक कामगारांना कर्ज वगैरे द्यायचे आणि गिरणी सुटायच्या वेळी दारात उभे राहायचे. मग जे कर्जदार होते ते म्हणाले, हा सारखा पैसे मागायला येतो म्हणून याला संपवूनच टाका. अशातऱ्हेने मुंबईतला पठाण संपला तो दंगलींमध्ये. त्याच्याआधी तर इतकं होतं की त्या कामगार मैदानाला पठाण मैदान म्हणायचे. कारण गिरणी कामगार सुटले की पठाणाला भेटायची जागा म्हणजे ते मैदान. मग तिकडे कर्ज देणं-घेणं वगैरे सगळं चालायचं. दुपारी साडेतीननंतर रात्री आठपर्यंत पठाणच. सगळे त्या मैदानात आपला पठाणी वेष घालून बसलेले असायचे. हे सगळे एकएकटे राहायचे. कुटुंबं नसायची त्यांची. मग इथल्याच चांगल्या देखण्या बाया, मग त्या महार समाजाच्या असो नाहीतर मराठा असोत किंवा मुसलमान. त्यांच्याशी लग्न करून त्यांना बाटवायचे आणि आपल्या गावाला घेऊन जायचे. नंतर पठाण गेला तेव्हा सगळ्यांना हायसं वाटलं. अर्थात नंतर असंही वाटलं की च्यायला बरं तरी होतं ते. पैसे हातावर मिळत होते. आज आपल्याला कोणी उभंदेखील करत नाही. मारवाडी काही घेतल्याशिवाय पैसे देत नाहीत. तेव्हा त्यांना वाटलं हे पठाण उगीच गेले. कारण ते वसूली करायचे आणि ताबडतोब परत व्याजावर कर्ज द्यायचे. खरं तर ते मुद्दल मागायचेच नाहीत. व्याजच मागायचे. तेव्हा मारवाडी या पठाणांना घाबरायचे. पण नंतर मात्र मारवाड्यांचा भाव वधारला. ते लोकांना ज्या पद्धतीने नाडू लागले, छळू लागले त्यामुळे कुटुंबच्या कुटुंबं रस्त्यावर आली. अहो,

या मारवाड्यांचं शहरात भागलं नाही, ते गावाकडेसुद्धा गेले. तिकडे आपल्याला हे मारवाडी दिसतात त्याचं हेच कारण आहे. मुंबईमध्ये नाडले गेलेले कामगार होते त्यांनी आपली गावाकडची घरं त्यांना देऊन टाकली. नाहीतर यांना कोण घर देतं गावामध्ये? तुम्ही सांगा. तुम्हांला एकही गाव असं मिळणार नाही महाराष्ट्रात जिथे मारवाड्याचं घर नाही. माझ्या गावामध्ये तर एक वाण्याची गल्लीच आहे.

आमचं गाव कोतुळ. तालुका अकोला. तिथल्याच एका शेतमजूर कुटुंबात माझा जन्म झाला. आई शेतात मेहनत करायची. वडील मुंबईला बांगड्या विकायचा धंदा करायचे. त्यातून चांगले पैसे मिळायचे. महिन्याला ते 25 रुपये गावाला पाठवायचे. आई शेतमजुरी करायची, तिला पाच आणे रोज असायचा. हे सगळं मला वयाच्या10-12व्या वर्षी कळू लागलं. माझं सहावीपर्यंत शिक्षण गावालाच झालं. त्यानंतर मास्तरांनी माझ्या आईला सल्ला दिला. म्हणाले, इकडे तू याला सातवीपर्यंत शिकवशील. नंतर आपल्या तालुक्यात हायस्कूल कुठेच नाहीये. ते आहे अहमदनगरला आणि हायस्कूल म्हटल्यानंतर तिथे सगळी श्रीमंतांची मुलं असतात. त्यात तुझ्यासारख्या या मुलाला काही उपयोग होणार नाही. हा शिकला तेवढा पुरे. माझं वयही वाढत होतं ना. शिवाय ती बाकीची माणसं म्हणायची की मुसलमान समाजाची मुलं कुठे शिकतात? तुझा मुलगा शिकून शिकून फारतर मास्तर होईल शाळेचा, हेडमास्तर होईल आणि रिटायर होईल, संपलं. पण तो पुढे काही जाऊ शकणार नाही. मग तेव्हा आमची आई बोलली की शिकण्यापेक्षा जगणं महत्त्वाचं आहे. मग तिने माझ्या मामाला, तो मुंबईला होता, त्याला सांगितलं की तू आता याला घेऊन जा, काय करील ते करील. पण इथे राहिला तर इथल्या पोरांबरोबर बिघडेल. शिकून मिळवलेले गुण धूळीला लावेल. मामाने ते ऐकलं आणि मला इथे आणलं.

मामा पण बांगडीचाच धंदा करायचा. परळला सूर्य सिनेमा होता पूर्वी. त्याच्याशेजारी आदमिमिस्त्रीची गल्ली आहे. त्या गल्लीत ते राहायचे. तेव्हा सगळे मुसलमान एकत्र राहायचे. कारण दंग्याचा धोका असायचा. 48ला मोठा दंगा झाला इकडे. त्याच्यानंतर लगेचच आलो होतो मी इथे. मालेगाव, भिवंडी वगैरेच्या वस्त्या दंग्यानंतरच उभ्या राहिल्या. आधी सगळे विखुरलेले होते. गिरणगावात कामाठी होते, मुसलमान होते, भय्ये होते. इतर समाजाचे होते. घाटावरचा जो मुसलमान शेतकरी होता तो नाइलाजाने मुंबईत आला होता. याच्या त्याच्या सल्ल्याने, दोस्तीने तो गिरणीत दाखल झाला. तरी पण ते तुलनेने कमीच होते. कारण त्यांना कामाचा अनुभव नव्हता. त्यावेळेला जे कामगार झाले ते मरेपर्यंत कामगारच राहिले. ते गावाला परत गेलेच नाहीत. मुलांनाही कामगार बनवलं. बाकीचे लोक आपलं कुटुंब घेऊन आले त्यांची परिस्थिती आता बदलली. त्यांची मुलं आता वकील, डॉक्टर झाली. मुसलमान समाजात काय की शिक्षण नाही, कामाचा अनुभव नाही, यामुळे आयतं खायची सवय लागलेली. मग उनाडकी कर नाहीतर कोंबड्या विक, अंडी विक, नाहीतर चोऱ्या करायच्या, दारूचे वाईटसाईट धंदे करून जगायचं कसं एवढाच प्रयत्न त्यांनी केला. त्यामुळे त्यांना भविष्य राहिलं नाही कालांतराने. इकडे आलो तेव्हा मी काहीतरी 13-14 वर्षांचा होतो. म्हटलं काहीतरी करायला पाहिजे. म्हणून मामाने परळला एका बांगडीच्या दुकानावर ठेवलं. चाळीस रुपये महिना मिळायचे. त्यातले 20 रु.खानावळीला, काही आईला पाठवायचे आणि काही आपले इकडेतिकडे. दंगे थोडे शमल्यावर सगळे एकत्र राहायला लागले होते. खाणावळीतसुद्धा, हिंदू, मुसलमान, बौद्ध वगैरे सगळे एकत्रच जेवायचे. आता विश्वास बसणार नाही तुमचा, पण तेव्हा एका एका खाणावळीत 40-50 लोक जेवायचे. एक घाटी बाय होती. तिच्या खाणावळीत मी जायचो. त्यांच्यामध्ये सर्वात कमी खाणारा मीच असायचा. तर मग ती मला म्हणायची की, ''काय खातोस रे म्हणे तू, एक भाकरीसुद्धा खाऊ शकत नाहीस!'' म्हणाली, 'तू असाच जेवत जा. पैसे देऊ नकोस!' कारण बाकीचे कामगार एकावेळेला चारपाच भाकरी खायचे. ती आपली एक माणुसकी म्हणून बोलली. पण मी तिला पैसे देत रहायचो.

मुंबईत त्या बांगडीवाल्याच्या इथं काम करताना नाटक-सिनेमे वगैरे खूप बघायचो. त्यावेळी हौशी नाटक मंडळींची खूप नाटकं असायची. कामगार रंगभूमीवरची. त्यात वेगवेगळ्या गिरण्यांतले कामगार कामं करायचे. तेव्हा काय की दामोदर हॉल हेच एक थिएटर होतं मुंबईत, दुसरं नव्हतंच. म्हणजे इमारतीमध्ये बांधलेलं असं हे एकच. त्यामुळे त्याचं खूप आकर्षण असायचं. ते थिएटर म्हणजे तुम्हांला सांगतो, एकही दिवस रिकामं नाही. वर्षभर सारखी नाटकं चालूच होती. तिथल्या डोअरकीपरशी माझा परिचय झाला होता. त्याच्यामुळे आम्ही इंटर्व्हलमध्ये आत शिरायचो. ते बघून वाटायचं आपल्यालाही स्टेजवर जाऊन असं काहीतरी करायला हवं. तेव्हा बहुतेक ऐतिहासिक नाटकं असायची. ‘मराठ्याची मुलगी’, ‘मानाचा मुजरा’, ‘सिकंदर’, ‘तैमूरलंग’ वगैरे. याशिवाय ‘गोरा कुंभार’, ‘संत ज्ञानेश्वर’ अशा प्रकारची पण असायची.

बायका? हो, असायच्या. मला आठवतायत त्यात म्हणजे सुमन मेस्त्री, पुष्पा म्हात्रे, सुलोचना करमासे, प्रभा शिरोडकर, स्नेहलता मांजरेकर अशा होत्या. गिरणगावातल्याच होत्या. हौशी नाटक मंडळांतूनच त्या पुढे आल्या होत्या. त्यावेळी हौस म्हणून नाटकं केली जायची. धंदा म्हणून नाही.

कोकणी वस्त्यांतून दशावतार वगैरे व्हायचे. जे घाटावरचे होते त्यांचे ‘तमाशे’ असायचे हॉलमध्ये. तमाशाचं तेव्हा हनुमान थिएटर होतं. बांगडीवाल्याचीसुद्धा माझ्या माहितीप्रमाणे चौदापंधरा थिएटरं होती. कामगाराची खरी करमणूक तीच होती. मोठे मोठे तमाशे यायचे. दीपक सिनेमाचा जो नाका आहे तिकडे एक थिएटर होतं, भायखळा मार्केटजवळ होतं. नायगावला केसरबागमध्ये होतं. बांगडीवाल्याने कामगारांच्या मोक्याच्या जागा बघून थिएटर्स बांधली आणि भरपूर पैसा कमावला. त्यावेळी तमाशा आणि संगीताच्या बाऱ्यांमधून हजारो लोक आपली उपजीविका करत. पुढे बांगडीवाला शेठ वारल्यावर ते प्रमाण कमी झालं.

त्याच काळात मुंबईत कामगारांचा फार मोठा लढा चालला होता, डांगेंच्या नेतृत्वाखाली. कामगार मैदानातून कामगारांचे मोर्चे निघायचे. मग लाठीमार, अश्रुधूर वगैरे. दुकानातून बघताना मला आश्चर्य वाटायचं की हे लोक चाललेत कुठे? एकदा कामगार मैदानावर एक मोठा समारंभ होता. डांगे भूमिगत होते ते त्या दिवशी प्रकट होणार होते. लोकांना त्यांचं खूप कौतुक. मी तिकडे गेलो तर मैदानावर तूफान गर्दी. एकटाच गेलो होतो. असाच फिरत फिरत तिकडे गेलो. तर त्या सभेत अमर शेख, अण्णा भाऊ, गव्हाणकर वगैरे मोठ्यामोठ्याने गाणी गात होते. लोक प्रचंड, प्रचंड साथ द्यायचे अशा सभांना तेव्हा. तेवढी एकच युनियन स्ट्राँग होती ना. तर अमर शेख गात होते. आठवतं मला ते गाणं अजूनही.

एकजूटीचा नेता झाला कामगार तैयार
बदलाया रे दुनिया सारी, दुमदुमली ललकार

ही गाणी नवीनच पद्धतीची होती. त्यावेळेला मी पाहिलं की अमर शेख म्हणजे सदरा, धोतर घातलेला एक माणूस. अण्णा भाऊ साठे पँट वगैरे घालायचे पण काळाकभिन्न माणूस. गव्हाणकर तेव्हा डंपर वगैरे वाजवायचे. बरं, सगळी गाणी म्हणायची एका सुरात. एका तालात. मार्चिंग पद्धतीची ती गाणी लोकांना आवडायची. कधी लोक सुद्धा म्हणायचे. एक तर सभा अशी झाली होती की सगळी सभाच मिळून गाणं म्हणत होती. हां, तर तेव्हा गाणी चालू होती, आणि डांगे येऊन बसले होते स्टेजवर. कोणाला माहीत डांगे कोण ते. एवढासा माणूस बुशशर्ट, पँट घातलेला. एस.जी.पाटकरने जेव्हा जाहीर केलं की ‘आपण ज्यांची आतुरतेने वाट पाहतो आहे त्या महान डांगे साहेबांना विनंती करतो की त्यांनी स्टेजवर यावं.’ तर समोर डांगे स्टेजवरच आणि लोकांना माहितीच नाही. तेच उठून समोर आले आणि हात जोडून म्हणाले, ‘मीच तो श्रीपाद अमृत डांगे.’ आणि तुम्हांला काय सांगू, इतकी फटाक्यांची आतषबाजी झाली. आधी कधीच कोणी इतकी न पाहिलेली. मग त्यांचं भाषण झालं. ते भाषण नव्हतंच, एक कामगार म्हणून बोलत होते ते. ती सभा जबरदस्त झाली. लोकांच्या डोक्यात दुसरा विषय

नव्हता. कुठेही जा, दुसऱ्या दिवशी हेच. 'काय हो, तुम्ही डांग्यांचं भाषण ऐकलंत?' ते मालवणी लोक म्हणायचे, 'डांगो काय बोललो?' माझं तर काय झालं होतं त्या सभेनंतर काही कळेना.

ती कलापथकांची गाणी माझ्या डोक्यात राहिली. मी दोन आण्यांचं पुस्तक विकत घेतलं. त्याच्यावर बघितलं की गाणी वगैरे बरी आहेत. नाव काय होतं, 'शिवारी चला.' पुस्तक तर घेतलं, पण चाली माहीत नव्हत्या. पण ते बघून डोक्यात विचार आला की आपण मुंबईत आलोय, तर काहीतरी केलं पाहिजे. काहीतरी केलं तरच आपण जगू. नाहीतर इतरही जगतात, त्यांच्यात आणि आपल्यात फरक काय? डोक्यात सारखं तेच असायचं. त्यामुळे मी दुकानात खाडे करायला लागलो. पोटात दुखतं वगैरे सांगून आणि सभांना जायचो. तर त्या मालकाच्या लक्षात आलं. हा काही आजारीबिजारी नाही. हा तर साला चाप्टरबाजी करतो. आणि त्याने मला काढून टाकलं. मामाला सांगितलं तर तो म्हणाला, आता तू गावी जा. मी म्हटलं नको, इथेच दुसरं काहीतरी बघतो. पण काहीतरी म्हणजे काय? चोऱ्यामाऱ्या तर करू शकत नाही. खूप विचार केला आणि ठरवलं, आता गावी जाऊ. तेव्हा मामाच म्हणाला, की तिकडे जाऊन तरी काय करणार, तिकडे काही नाही म्हणून तर तुझ्या आईने तुला मुंबईला पाठवला. म्हणाला, 'मुंबई असं शहर आहे की इथे जो पोट भरू शकला नाही तो जगात कुठेही पोट भरू शकणार नाही.' म्हटलं, बरोबर आहे. मग मी काय केलं, ते जे पुस्तक घेतलं होतं ना दोन आण्यांचं, त्यावर पत्ता होता अमर शेख, धोबीघाट रोड, जेकब सर्कल. माझा एक मित्र अंडी विकायचा. तो जेकब सर्कलला राहायला होता. हसन अंडीवाला. त्याला मी पत्ता विचारला, तर तो म्हणाला, 'अरे, हे माझं गिऱ्हाईक आहे अंड्याचं.' तर तो मला इथं घेऊन आला. माझा आपला शाळेतला ड्रेस अर्धी खाकी पँट आणि शर्ट. पायात चप्पल नाही, काही नाही. तो मित्र अमर शेखना म्हणाला, 'शाहीरसाब, ये मेरा दोस्त है, ये गाना गाता है, देखो तुम्हारेपास कुछ होगा तो.' तर ते म्हणाले, 'आओ, उप्पर आओ. हिंदीतच बोलले माझ्याशी. मी पायऱ्या चढून वर गेलो. आणि तिकडे जमिनीवर बसलो. तर म्हणे, बैठो कुर्सी के उप्पर. तर मी म्हणालो, 'मेरे को आदत नही उपर बैठने की.' मी खालीच बसलो. त्यांनी मला नावगाव विचारलं. म्हणाले, तुमको गाना आता है? मी म्हणालो, ''हां. छोटा छोटा गाना गाता हूँ.'' मग त्यांनी सांगितलं येत जा इकडे. असा मी येऊ लागलो. मला सवय होतीच गायची. शाळेच्या प्रार्थना वगैरे मीच गायचो ना. मास्तर रोज विचारायचे. जैनू आलाय का? नसेन तर बोलावून आणायचे प्रार्थना म्हणायला.

## कला आणि कलावंत

गिरणगावाने गणेशोत्सवासारख्या उत्सवामधून अनेक हौशी कलाकार तयार केले. पुढे त्यातले अनेक गायक, नाटककार, नट, चित्रकार, मेकअप करणारे तंत्रज्ञ निरनिराळ्या व्यावसायिक कलाक्षेत्रांत स्थिरावले.

### शाहीर निवृत्ती पवार (वय 70 वर्षे)

सुप्रसिद्ध गायक, शाहीर. मीठवाले शाहीर म्हणून गिरणगावात ओळख. 2002 साली निधन.

माझ्या लहानपणापासून मला गाण्याचा छंद. माझ्या आईचा आवाज चांगला. तिच्या वडलांचा, भावांचा आवाजही चांगला. असं खानदानीतच असल्यामुळे माझं गाणं म्हणजे माझ्या आईकडून मला मिळालेला वारसा आहे. त्यात संस्कृती होती, प्रबोधन होतं. आमची आई पहाटे जात्यावर गायची,

पहाटेच्या पाऱ्यामंधी, माझा कोंबडा घाली साद
साद त्या कोंबड्याची, रुंझू झुंजू त्या सकाळची

ह्या सगळ्याचे माझ्यावर संस्कार झालेत. श्रीनिवास खळेंनी माझा आवाज हेरला आणि सत्तर साली माझं गाण्याचं रेकॉर्डिंग झालं. ते मी आईचंच गाणं रेकॉर्ड केलं.

वाटेच्या वाटसरा, काय बघतो भवतारा
सांडल्या हरभऱ्याची, वाट बघते कारभाऱ्याची.
वटी सांडली जवसाची, वाट बघते पावसाची.

माझं जन्मगाव चिंचळ, तालुका सातारा. वयाच्या आठव्या वर्षी गावचे प्रसिद्ध कीर्तनकार मुकुंदबुवा भागवत यांच्या कीर्तनात मी गाणं म्हटलं, तेव्हा ते म्हणाले, ''अरे हा कुणाचा मुलगा?'' सगळे म्हणाले, ''हा बाबूराव पवाराचा मुलगा.'' तसे बुवा म्हणाले, ''वा! फार छान गातो रे. पुढे मोठा गाणारा होईल.'' म्हणजे माझं भविष्य वयाच्या आठव्या वर्षीच वर्तवलं गेलं होतं.

मग मुंबईत आलो. इकडे मीठाचा धंदा होता वडिलांचा. जुना धंदा. मी सुद्धा त्यांच्याबरोबर मीठ घेऊन जायचो. गाण्याचा छंद होताच. रस्त्यात एखादं चाळीतलं भजन वगैरे ऐकू आलं की माझे पाय त्या तालात पडू लागायचे. लगेच वडील म्हणायचे, 'अरे हा गाण्याचा भिकार नाद नको. गाणंबिणं म्हणायचं नाही.' पठ्ठे बापूरावचा तेव्हा तमाशा असायचा. आम्ही तिकडनं चाललो आणि ढांग ढांग ढांग अशी ढोलकीची थाप वाजली की मला गुदगुल्या व्हायच्या. मी पाय ओढत मागेमागे राहायचो. वडील म्हणायचे, 'अरे काय मागं राहतोय? नाचायला जायचं का तमाशात?' त्यांना आवडत नसे. त्यांना वाटायचं, कलाकार लोक दारू प्यायचे, तेव्हा माझा मुलगा दारू पिईल आणि हा थोरला मुलगा असा झाला तर धाकटी मुलं काय करतील? पण पठ्ठे बापूंचे तमाशे पाहिलेत मी. 1938-40च्या सुमाराला पठ्ठे बापू इथे होते. फार गर्दी असायची तमाशांना. 2 आणे तिकीट. मी जायचो. घरच्यांना चुकवून जायचो. ढोलकी ऐकली की मला फार आनंद वाटायचा. 14 वर्षांचं वय होतं. एकदा वडिलांबरोबर त्यांच्या गुरूंच्या घरी गेलो. केडगावचे नारायण बेट महाराज. तिथे आरती चालली होती. मी आरती म्हणायला लागलो. गाणं संपल्यावर महाराज म्हणाले, 'वा, गोड आवाज आहे याचा.' तसं वडील म्हणाले, 'हा लावण्या म्हणतो तमाशाच्या, काय करायचं?' ते म्हणाले, 'काही म्हणू दे. पण मोठा गाणाराच होईल. काळजी करू नका.' मग मात्र वडिलांनी मला परवानगी दिली. 'तू काही कर जा. तमाशा कर, नाहीतर भजन कर.'

मी त्यावेळी गाणी म्हणायला शिकायचो एका शाहीराबरोबर. 1940-45 सालात. शाहीर हरिभाऊ भंडारी. तो माणूस खाजा विकायचा. त्यावेळी अन्नधान्याची टंचाई होती. 'खाजा हो खा. एक वडी खा अन् पाणी प्या, पोट भरेल,' असं सांगायचा. आम्ही गाणी म्हणत, पोवाडे म्हणत, त्याच्या मागे फिरलो थोडं. 'चल उठ साहेबा' , 'सारे चला चला रे, राष्ट्रास हाक द्या रे' हे म्हणायला लागलो. पोवाडा सांगता सांगता माणसं म्हणायची, 'पोराला म्हणायला सांगा.' मी मग गायचो.

'उघडा उघडा डोळा, वेळ आता आली' माणसांना आवडायचं. लोक मला रुपया, दोन रुपये बक्षीस द्यायचे. एकदा फुलगल्लीत म्हटलं, माणसं भारावली. एकाने 101 रुपयांची गळ्यात माळ घातली. एक रुपयाच्या नव्या कोऱ्या नोटा. ती एक आठवण मनात राहिली. आमचा पेटीवाला म्हणाला, 'कशाला दुसरा धंदा करायचा. बरंय हेच. गाणी म्हणायची. पोवाडे करायचे. लोक हार घालतात. मानसन्मान मिळतात. खाणंपिणं चांगलं मिळतं.' त्यावेळी तो छंद लागला. पैसे मिळू लागले.

गिरणगावात तेव्हा सगळं मोकळं मैदान होतं. गर्दी नव्हती. माणसं खेटत नव्हती. रस्ते इतके निर्मनुष्य असायचे की तासाला एक गाडी जायची. टॅक्स्या वगैरे एवढे नव्हते. फक्त टांगे असायचे. आम्ही रस्त्याने मोकळेपणाने सायकल वगैरे फिरवायचो. आता इतकी घाण झाली. पण तेव्हा आमचं गिरणगाव स्वच्छतेचं माहेर होतं. सुंदर वातावरण होतं. पोथ्याबिथ्या, कीर्तनबिर्तन, प्रवचन सगळं रस्त्याने जाताना ऐकू यायचं. माणसाला माणूस म्हणणारी माणसं होती. हल्ली काय सगळा गोंधळ झालाय हो. बसमध्ये गेलं तर कुणी बसायला देत नाहीत वृद्धांना.

तेव्हा मुंबईमध्ये मराठी माणसं घाबरायची बाहेरच्या लोकांना. फार घाबरून रहायची. कारण त्यावेळी माणसं एवढी शिकलेली नसायची. अडाणी माणसं. त्यांना काय माहीत, कोण साहेब आहे आणि कोण काय. इंग्लिशमध्ये बोलणारी लोकं आली की साहेब आला असं म्हणायची. दाक्षिणात्य

आणि उत्तर भागातले जे लोक होते, ते एकत्र येऊन जास्त बोलायचे इंग्लिशमध्ये. आणि ही आपली माणसं घाबरून, हात जोडून बसायची गप्प.

माझी मीठाची गिऱ्हाइकं मला शाहीर मीठवाला म्हणतात. सगळ्या महाराष्ट्रात शाहीर निवृत्ती पवार म्हणतात. पण चार नंबर वॉर्डात मीठवालेच म्हणतात. मीठवाला रेडिओवर आला, मीठवाल्याचं गाणं लागलं, असे कार्यक्रम करता करता साताऱ्याला गेलो. कोल्हापूर संस्थान फिरलो. तिकडे प्रजापरिषद होती. तिथे प्रचार केला म्हणून वारंट निघालं. लगेच पळून आलो. दानवडीला पोहोचलो. तिथल्याच मळ्यामध्ये राहिलो. याच वाटचालीमध्ये आमच्या शे.का.पक्षाचं खूप काम केलं. आमचे शंकरराव खरात, भाऊराव पाटील, काका वाघ, माधवराव बागल अशा मोठ्या मोठ्या लोकांबरोबर काम केलं. नाना पाटलांचं प्रतिसरकार स्थापन झालेलं होतं. तिकडे पण चोरून गाणी म्हणायचो. नंतर शे.का.पक्षाच्या सभा भरायच्या गिरगावला. अत्रेसाहेब, लालजी पेंडसे वगैरे मंडळी जमायची. तेव्हा पोवाडे मीच गायचो. चळवळीची गाणी गायचो. आणि नंतर तिथे सभा व्हायची. अत्रेंच्या सभेला भयंकर गर्दी असायची. पण मी कुठलंही गाणं म्हटलं तरीही लोकांना आवडायचं. कधी नाना पाटील असले तर म्हणायचे, सभेचं बालपण शाहीर भोगतो आणि म्हातारपण माझ्याकडे येतं. कारण त्यांचं भाषण शेवटी असायचं ना!

### विजय खातू (वय 45 वर्षे)

मुंबईतले सर्वात प्रसिद्ध गणेश मूर्तिकार. त्यांच्या शिवाजी पार्कमधल्या घरात ही मुलाखत घेतली.

त्यावेळी एक वेगळं आकर्षण होतं गणपतीचं. एक लालबागचा राजा म्हणजे लालबाग मार्केटचा म्हणतात तो, चिंचपोकळी गणेशोत्सव, गणेशगल्ली आणि रंगारी बदक चाळ. हे चार तेव्हाचे अगदी फेमस गणपती. नंतर मग तेजुकाया मेन्शन सुरू झालं. नंतर जयहिंद सिनेमा, हिरामणी मार्केटचे गणेशोत्सव सुरू झाले, पण ही चार मंडळं तेव्हा खास असायची. वयाच्या सोळाव्या की सतराव्या वर्षी मी पहिली चौदा फूटी गणपतीची मूर्ती बनवली. जयहिंद सिनेमाजवळ, चिंचपोकळी दक्षिण विभाग सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ आहे तिथली. जल्लोष, अक्षरश: जल्लोष असायचा गणेशोत्सव म्हटलं की. गणपती येण्यापूर्वीच महिनाभर डेकोरेशन चालू व्हायचं. त्याची मिटिंग वगैरे व्हायची. मी त्यावेळेला लहान होतो म्हणा. पण मला आठवतं चांगलं. गेट बांधणं, सजावटीची चर्चा करणं वगैरे चालायचं. आणि लोक स्वत: करायचे सगळं. शक्यतो काम बाहेर द्यायचे नाहीत. कार्यकर्तेच त्या कामाला राबवून घ्यायचे. आपलं घरचं कार्य असल्याप्रमाणे प्रत्येक गोष्ट करायचे. आज जो व्यावसायिकपणा आलाय गणेशोत्सव मंडळाला तो तेव्हा नव्हता. त्यामुळे प्रत्येकजण मनोभावे उत्सव साजरा करण्याचा प्रयत्न करायचा.

वर्गणी काढणं हा तर मोठा उत्साहाचा भाग असायचा त्यावेळी. आतासारखं त्याच्यासाठी धमकावणं वगैरे प्रकार तेव्हा नसायचा. म्हणजे वर्गणी देणारेसुद्धा वाट बघायचे. पण त्यावेळी स्वस्ताई होती म्हणा. आणि एवढे लोक एकत्र आले की उत्साहाला उधाण यायचं. पण त्यावेळेला म्हणजे संप होण्यापूर्वी, दत्ता सामंतचा गिरणी कामगारांचा संप होण्यापूर्वी जो उत्साह होता तो पुढे घटत गेला. कारण गिरणी कामगार तिथून दूसरीकडे राहायला गेले. गरीबीमुळे म्हणा किंवा बेकारीमुळे म्हणा, सगळेजण जागा विकून दूसरीकडे राहायला गेले. पूर्वी या भागात दसरा, दिवाळी गणेशोत्सव प्रत्येक गोष्टींत तुमच्या श्रीमंतांना लाजवेल असा उत्साह होता. गरीबी असूनही आता सगळ्या गोष्टी प्रोफेशनल झाल्यात. मूर्तीचं, डेकोरेशनचं, सगळ्याचं कॉन्ट्रॅक्ट देऊन टाकतात. हा काळाचा बदलही असू शकेल. पण पूर्वीची मजा राहिली नाही. कुठलाही स्वार्थ न ठेवता कामात झोकून देणं जे असतं ना, ते आता कुठे आढळत नाही.

त्यावेळेला भजनपार्टी असायच्या. भजनस्पर्धा, संगीतस्पर्धा असायच्या. एक वेगळं फॅडही त्यावेळी होतं. रेकॉर्ड डान्सचं. लोकनाट्यं पण व्हायची. नाटकं व्हायची. एकांकिका व्हायच्या, वेशभूषा स्पर्धा व्हायच्या. म्हणजे ज्या ज्या लोककला आहेत

त्या सादर केल्या जायच्या. प्रत्येक गल्लीगल्लीत हे कार्यक्रम व्हायचे. याशिवाय तेव्हा पेरू चाळीमध्ये चित्रकला प्रदर्शन असायचं गणेशोत्सवाच्या वेळेस. बरं, त्यात कोकणी, घाटी असा फरक चुकूनही नसायचा. मिरवणुकीच्या वेळी देशस्थ समाजाच्या लेझीम पथकांचा सहभाग असायचा. पोलिटीकल पार्ट्या वगैरे याच्यामध्ये कधीच नसायच्या. पण, लोकनाट्यं वगैरे होत होती. खामकर शाहीर होते तेव्हा. मला आठवतं, दादा कोंडके पण त्यांच्या सुरुवातीच्या दिवसांत या कार्यक्रमांत असायचा. आम्ही बघितलंय ना. पण राजकीय तंटे वगैरे काहीच नव्हते.

त्यावेळेला यातला धार्मिक भाग काही आम्हांला कळत नव्हता. तेव्हा गणेशोत्सवाच्या माध्यमातून चांगले उपक्रम राबवले जायचे. त्यांचं स्वरूप सामाजिक जास्त असायचं. कारण आमच्या स्पर्धा वर्षभर चालायच्या मंडळातर्फे. वक्तृत्व स्पर्धा, चित्रकला स्पर्धा किंवा विद्यार्थ्यांना पोषक असे कार्यक्रम असायचे, थोडक्यात. त्यात सामाजिक भागच जास्त असायचा. धार्मिक भावना आता निर्माण झाल्या.

गिरणगावच्या कलाक्षेत्राच्या विकासामध्ये मोठा वाटा कोकण आणि घाट या दोन्ही भागांमधून नियमितपणे मुंबईत डेरेदाखल होणाऱ्या पारंपरिक कलाप्रकारांचा आहे. कोकणामधून दशावतारी मंडळी आणि घाटावरून तमाशाचा फड आपापल्या गावकरी मंडळाच्या किंवा गणेशोत्सव मंडळाच्या निमंत्रणावरून येत असत. लोकांमध्ये मग अमाप उत्साह संचारत असे. कोकणी आणि घाटी यांच्या वस्त्या काहीशा वेगवेगळ्या. घाटी लोकांच्या परिसरात रस्त्याच्या चौकामध्ये तमाशाचे फड रात्र रात्र जागवत. तमाशाचं प्रसिद्ध थिएटर म्हणजे लालबागचं हनुमान थिएटर. आज त्याचं रूपांतर लग्नाच्या हॉलमध्ये झालं आहे.

**मधुकर नेराळे (वय 63 वर्षे)**

लालबागमध्ये असलेल्या लोकप्रिय हनुमान तमाशा थिएटरचे मालक. 40 वर्षं गिरणगाववासीयांना रिझवणारे हे थिएटर नुकसानीत जात असल्यामुळे 2001मध्ये नेराळेंना बंद करावं लागलं. थिएटरच्याच कंपाउंडमध्ये असलेल्या त्यांच्या लहानशा घरात मुलाखत घेतली गेली. महाराष्ट्रातल्या शाहीरांना संघटित करून तमाशा कलावंतांची शिबिरं घेतात. शिवाय गिरणी कामगारांच्या प्रश्नावर आयोजित केलेल्या विविध संघर्ष कार्यक्रमाला ते आवर्जून हजर असतात.

माझा जन्म पुणे जिल्ह्यातल्या जुन्नर गावचा. 1943 सालातला. त्यानंतर वर्षा दोनवर्षांतच आम्ही उपजीविकेसाठी मुंबईत आलो. लालबागसारख्या ठिकाणी त्यावेळेला खोल्या वगैरे मिळणं काही फार अडचणीचं नव्हतं. भाजीपाल्याविषयी माहिती होती. मग वडिलांनी तोच व्यवसाय स्वीकारला. भायखळ्यावरून ठोक भावात भाजी आणायची आणि इथे किरकोळ भावात विकायची. त्यावेळेला किरकोळ विक्रीचं दुकान असं लालबागपासून दादरपर्यंत आमचं एकच होतं. माझी आजी माझ्या वडिलांना यात मदत करायची. आमचं गिऱ्हाईक म्हणजे हेच कामगार आणि श्रमजीवी लोक. त्यांना परवडेल अशा दरात भाजी विकायची, असं चाललं होतं. माझं शिक्षण इथल्या सरस्वती हायस्कूलमध्ये झालं. जेमतेम आठवीपर्यंत. कारण परिस्थिती तेवढी चांगली नव्हती.

तेव्हा वडिलांचे एक मित्र होते. ते म्हणाले, 'तुम्ही दिवसा हे करताच, मग रात्री आणखी काही करू या.' आमच्या वडिलांनाही या कलेची थोडीशी आवड होती. त्या दोघांनी मिळून भागीमध्ये तमाशाचा व्यवसाय सुरू केला. म्हणजे तमाशाच्या पार्ट्या आणायच्या आणि कार्यक्रम करायचे. हे साधारण 1947-48च्या दरम्यान. आमचं आता हे थिएटर आहे इथे भाजीचा मळा होता. आणि संपूर्ण जंगल होतं ह्या बाजूला. हे कारखाने आता झाले. पण तेव्हा इकडे जी मळ्याची उघडी जागा होती ती माझ्या वडिलांनी तेव्हा भाड्याने घेतली. आणि कापडाचं असं एक थिएटर उभं केलं. आता तेव्हा आमची परिस्थिती एवढी नव्हती की बाबा पत्रे लावा, झावळ्याच लावा. मग आम्ही काय केलं. आमच्या तिकडे एक बैलांचा गोठा होता. तेव्हा माल वाहण्यासाठी बैलगाड्या वापरल्या जायच्या. ते बैल त्या गोठ्यात सोडले की मोकळ्या गाड्या

आणायच्या आणि सगळ्या बाजूंनी उभ्या करायच्या. त्याला कनात गुंडाळली की झालं आमचं थिएटर!

मुंबईला 19 तमाशाची थिएटरं होती. बांगडीवाला शेठ, अब्दुल रेहमान शेठ वगैरे तेव्हा मोठे कॉन्ट्रॅक्टर होते. आता सांगितलं तर आश्चर्य वाटेल. पण आता जो कामाठीपुऱ्याचा भाग आहे, तिथे वेश्याव्यवसाय करतात बायका पोट भरण्यासाठी आता. त्या परिसरात सगळीकडे तमाशाची थिएटरं होती. त्यावेळेला गुजराथी, पारशी आणि इंग्लिश नाटकं 'प्ले हाऊस' भागातल्या थिएटरांमध्ये व्हायची. त्याचा अपभ्रंश होऊन मग ते 'पीला हाऊस' झालं. हे जे तमाशा कलाकार होते त्यांची इथे जवळपास वस्ती असायला पाहिजे म्हणून अब्दुल रहमान शेठने ती बटाट्याची चाळ विकतच घेतली होती. सगळे कलावंत त्या ठिकाणी रहायचे आणि आजूबाजूच्या थिएटरांमधून कार्यक्रम करायचे. बांगडीवाला शेठ म्हणजे इतका दयाळू आणि दानशूर माणूस होता. त्याची पेढी पण होती. मनीष मार्केट आहे त्याच्या मागच्या बाजूला त्याचं ऑफीस होतं. तो पिशवीतून भरून पैसे आणायचा आणि कलाकार पैसे मागायला आले की पैशाची अशी चवड करून द्यायचा. मोजायचा पण नाही.

आतापर्यंतच्या माझ्या कामात मी असं अनुभवलंय की श्रमजीवी लोकांच्या आचारविचारांची एकूण बैठक आणि बुद्धीजीवी वर्गाची आवडनिवड यात खूप फरक आहे. आता श्रमजीवी लोकांचं कसं की त्याला जे आवडेल ते अतिशय हलकंफुलकं, जास्त बुद्धीला ताण देणारं नाही अशा प्रकारचं असणार. बुद्धीजीवी म्हटला की तो पुस्तकं वाचणार, उत्तमोत्तम संगीत ऐकणार. कामगार वर्गाला लोकसंगीत आवडायचं. आणि मध्यमवर्गाला नाट्यसंगीत. तेव्हा ही संगीत नाटकं मोठ्या प्रमाणात असायची. आमची कामगारांसाठीची नाटकं म्हणजे त्यांना रुचेल त्या विषयावर असायची. मोठे, सामाजिक विषय वगैरे असं काही नाही. कारण ते समजण्याची त्यांची कुवतच नव्हती. कुठच्या चळवळीत वगैरे त्यांचा सहभाग नव्हता. निव्वळ करमणूक. मध्यमवर्ग या तमाशाला जात नव्हता. त्यांच्यासाठी 'बैठकीचा तमाशा' म्हणून प्रकार होता. आणि कामगार वर्गासाठी असायचा 'बहुरंगी तमाशा.' किसान, कामगार मंडळींना करमणूक होईल अशा प्रकारे तो बेतलेला असायचा. त्या काळात लिखाण वगैरे हा काय प्रकारच नव्हता. लोक उत्स्फूर्तपणे सादर करायचे. समजा, एक विषय घेतला की राजा हरिश्चंद्र की मग ठरवायचं. हरिश्चंद्र तुम्ही करा, विश्वामित्र तुम्ही करा, तारामती वगैरे. आता ही कॅरेक्टर त्यांना माहीत असणार, तशी ती गोष्ट पुढे न्यायची. संवाद लिहिलेले वगैरे काही नाहीत. प्रेक्षक कशा पद्धतीचा आहे ते बघायचं आणि तसा विषय निवडायचा.

तमाशा हा प्रकार तसा खेडेगावातला. कुठे देवाची यात्रा असेल तिथे एखाद्या खुल्या जागेवर तमाशा व्हायचा. गावातील ब्राह्मण, नाहीतर व्यापारी मंडळी, सरकारी अधिकारी तिथे यायचेच नाहीत. जत्रेच्या गावाकडून तमाशापार्टीला आमंत्रणाची 'सुपारी' दिली जायची. तेव्हा हे पार्ट्यांचे ठेकेदार वगैरे नव्हते. त्या पान, नारळ, सुपारी एवढ्यावर तमाशावाले गावाला यायचे. एवढा विश्वास होता. हा घाटावरच्या लोकांचा आवडीचा प्रकार; त्यामुळे आमच्याकडेसुद्धा. मला आठवतंय की घाटावरचेच लोक प्रेक्षक म्हणून यायचे. कोकणी माणूस तिथे क्वचितच दिसेल. आमच्या थिएटरमध्ये दहादहा, बाराबारा वाजेपर्यंत बाऱ्या चालत. 'बारी' शब्द का? तर बारीबारीने होते म्हणून बारी. कोणाची बारी चाललीय? तर महादेव नगरकरांची गणगौळण चाललीय. किंवा यमुनाबाई वाईरकरांची किंवा शेवंताबाई जेजुरीकरांची किंवा जगताप बाई पिंपळेकरांची बारी चाललीय, असं. मग ढोलकीच्या बाऱ्या व्हायच्या. संगीतबाऱ्या व्हायच्या. रात्रभर चालायच्या. जास्त पार्ट्या असल्या तर पहाटेचे तीन-चार पण वाजायचे. म्हणजे दुसऱ्या दिवशीची धावपळ सुरू व्हायच्या वेळेला.

यात रंगबाजी असाही एक प्रकार होता. म्हणजे आपण ज्याला फर्माईश म्हणतो ते. या संगीतबाऱ्यांमध्ये कथा नसायची. नुसतं गाणं आणि अभिनय. मध्ये-मध्ये विनोदाची मिस्किल

पेरणी. तिथे दौलतजादा व्हायचा. चौकोनी चवली देऊन फर्माईश करायची. मग आवडीचं गाणं त्यांनी म्हणायचं. ते सुरू झालं की त्यावर पैसे उडवायचे. नोटा वगैरे नाही. चवली, पावली असंच दिलं जायचं. प्रेक्षकांना हे तमाशे इतके आवडायचे की त्यापुढे त्यांना जेवणाचंही भान नसायचं.

कोकणातल्या माणसाची करमणूक म्हणजे दशावतार. हा नाटकाच्या जवळपास जाणारा प्रकार. ही कोकणी माणसं गिरणीत कामगार म्हणून मोठ्या संख्येने होती. त्यांना या नाटकांची खूप हौस असायची. कधी होळीला नाहीतर दिवाळीला, कोकणातल्या दशावतारी पार्ट्या इकडे मुंबईला यायच्या आणि त्यांचे दहा-दहा दिवस इथे कार्यक्रम चालायचे. यात विशेष म्हणजे पूर्वी मुली मिळत नव्हत्या म्हणून पुरुषच स्त्रियांची भूमिका करायचे आणि आज 50-55 वर्षांनंतर सुद्धा पुरुषच त्या भूमिका करतात. पूर्वी तर संगीत नाटकांमध्येसुद्धा बालगंधर्व, पटवर्धन वगैरे नट स्त्रीभूमिका करण्यात वाकबगार होते. नंतर पुढे जेव्हा रंगभूमी आर्थिक अडचणीत आली तेव्हा स्त्री कलाकार कामगार रंगभूमीवरून पुढे आल्या. तर दक्षिण रत्नागिरीमध्ये दशावतार प्रसिद्ध होता, तसा उत्तर रत्नागिरी म्हणजे चिपळूण गुहागरकडच्या भागात 'नमन' प्रकार चालतो. राजापूर वगैरे बाजूला त्याला 'खेळे' म्हणतात. तसंच कोकणात 'गंमत' नावाने 'तमाशा'ही व्हायचा. हा कोकणी तमाशा करणारेच नंतर जाखडी नृत्य करायला लागले.

घाटावरच्या मंडळींकडे वाघ्यामुरळी, गोंधळ, भारूड किंवा लळीत हे प्रकारही प्रसंगानुसार व्हायचे. जसं नवीन लग्न झाल्यावर 'जागरण' घातलंच पाहिजे तसे मग रात्रभर खंडोबासमोर कार्यक्रम व्हायचे. सत्यनारायणाला नाहीतर बारशालासुद्धा हे कार्यक्रम व्हायचे.

भजनंसुद्धा त्या काळात मोठ्या प्रमाणात चालायची. फूलाजी बुवा, मद्रासी बुवा वगैरे मोठे बुवा असायचे. किंवा दोन भजनी मंडळं समोरासमोर येऊन त्यांच्या रात्रभर स्पर्धा चालायच्या. या कार्यक्रमांना बायका यायच्या नाहीत. मुंबईत कामगार आपली कुटुंबं आणत नव्हते.

या सगळ्या करमणुकीच्या गोष्टींचं कामगारांच्या आयुष्यात मोठं स्थान होतं. दिवसभर साच्यावर काम करून श्रमलेला असायचा तो. त्या श्रमाचा परिहार कशात होणार? तर मिलमधून सुटल्यावर, आंघोळ करून चहापाणी करून फ्रेश झाला की तो संध्याकाळी आपल्या मंडळाच्या खोलीत जाऊन बसायचा. तिथे भजन चालू असायचं. त्यात तो रमायचा. जेवणाची वेळ झाली की जेवायचा आणि झोपायचा. त्यामुळे तो वाईट मार्गाला कुठे जात नव्हता. आज ही परिस्थिती राहिलेली नाही.

मधल्या काळामध्ये जे नवीन राजकीय पक्ष झाले त्यांची नवी कार्यकर्ती मंडळी आली. त्यांना या जुन्या सांस्कृतिक परंपरेशी काही देणं-घेणं नाही आहे. हे तरुण पुढारी या सगळ्या कलांचे दुष्मन ठरलेत. मग ज्या मैदानांतून हे कार्यक्रम व्हायचे ती मैदानं मिळायची बंद झाली.

गिरणगावात उगम पावलेलं नाट्यक्षेत्र, खास कामगारांची रंगभूमी म्हणून ओळखलं जाऊ लागलं. या रंगभूमीचे नाटककार, नट, नेपथ्यकार, संगीत सर्व गिरणगाववासीयांचं असे. मध्यमवर्गीय दादरमधल्या शिवाजी मंदिर वा गिरगावातल्या साहित्य संघात होणाऱ्या नाटकांपेक्षा परळच्या दामोदर हॉलमध्ये होणाऱ्या नाटकांची जातकुळी वेगळी होती. महाराष्ट्र राज्य नाट्यस्पर्धेमध्ये कामगार रंगभूमीच्या स्पर्धांसाठी वेगळा विभाग असे. शिवाय आंतरगिरणी नाट्यस्पर्धाही अत्यंत चुरशीच्या होत. प्रत्येक गिरणीत, प्रत्येक चाळीत आपापली नाटकमंडळं असत. रोज कुठे ना कुठे तरी, कुठल्या ना कुठल्या निमित्तानं या हौशी नाटकमंडळींचे प्रयोग होत असत. गिरणगावच्या रंगभूमीने ग्रामीण भागातील पारंपरिक खुल्या दशावतारांसारख्या कलाप्रकारांचा मेळ बंदिस्त नाटकगृहातील प्रयोगांशी घातला. या पारंपरिक लोककलांवर शहरी श्रमसंस्कृतीच्या जाणीवांचे संस्कार होऊन नवीन संमिश्र कलाप्रकार जन्माला आले. लोकनाट्य हा खास कामगार संस्कृतीचा कलाविष्कार.

**बाजीराव पोपळकर (वय 50 वर्षे)**

सेंच्युरी मिलमधले कामगार आणि कलावंत. आंतरगिरणी

नाट्यस्पर्धेत सक्रिय भाग घेत असत. नंतर व्यावसायिक रंगभूमी आणि टेलिव्हिजनवर भूमिका केल्या. आपल्या कुटुंबासह सेंच्युरी मिलच्या वरळी येथील चाळीत वास्तव्य.

मी नाटकात कामं करायला लागलो. कारण माझे काकाच नाटकं बसवायचे. मला आधी स्त्रियांच्या भूमिका करायला द्यायचे. तशी माझी ठेवण होती ना. मग मात्र सर्व भूमिका करू लागलो. हळूहळू लोकांच्या नजरेत भरायला लागलो. भजनीमंडळात गाऊन मला तालासुरांचं भान आलं. एकदा माझ्या एका मित्राने, त्याचं नाव होतं विश्वास नार्वेकर. त्याने गणपती उत्सवातल्या एका नाटकात काम दिलं.

गिरणगावात काय चाळीचाळींतून काहीतरी कार्यक्रम असायचेच. तिथे नेहमी नाटकं व्हायची. भजनाचे कार्यक्रम पण खूप व्हायचे. धार्मिक भावनेनेच असं काही नाही, वेळ घालवायचं साधन होतं असे कार्यक्रम. त्यावेळी टी.व्ही.सोडाच, पण रेडिओ तरी कितीजणांजवळ होते? कोणाच्या हातात ट्रांझिस्टर दिसला तर सर्वजण बघत रहायचे.

मला पुढे सेंच्युरी मिलमध्ये नोकरी मिळाली. तिथून मी एवढी नाटकं बसवली, केली, की मला आता नावंसुद्धा आठवणार नाहीत. आंतरगिरणी नाट्यस्पर्धा असायच्या. चाळीस ते पन्नास एन्ट्र्या असायच्या. मी गिरणीत नोकरी मिळाल्याच्या दुसऱ्याच वर्षी आमच्या गिरणीच्या एन्ट्रीत काम केलं. त्या वर्षी आमच्या एन्ट्रीला दुसरं बक्षीस मिळालं. त्याच्या पुढच्या वर्षी पहिलं मिळालं. या आंतरगिरणी स्पर्धांना खूप भाव होता. त्यात बरेच नावाजलेले आणि हुन्नर कलाकार भाग घेत होते. त्यातले बरेच नंतर मराठी रंगभूमीवर मोठे नट झाले. गणेशोत्सवातून कार्यक्रम करून इथले बरेच कलाकार मोठे झालेत.

त्या काळात तुम्हांला सांगतो, लोकांना काय हौस होती नाटकं बघायची! तिकिटांसाठी धक्काबुक्की ठरलेली. हॉलमध्ये फारतर 800-900 माणसं बसू शकणार आणि कामगार जवळजवळ 17,000. मग आम्ही एक्स्ट्रा प्रयोग करायचो. तो सुद्धा हाऊसफुल्ल. स्पर्धांना तर विचारूच नका. एकदम फक्कड. कामगारांची कुटुंबं यायची. नाटकावर चर्चा चालायची. लोक स्तुती करायचे, टीका करायचे. जे कामगार नाटकात काम करायचे त्यांचा उत्साह तर काय असायचा. म्हणजे दिवसा तो साच्यावरचा कामगार असेल तर रात्री, नाटकात का होईना, पण राजा बनायचा ना!

या आंतरगिरणी स्पर्धांना मिल ओनर्स असोसिएशनकडून फंड मिळायचा. सगळ्या गिरण्यांमधून हा फंड जमा व्हायचा. आम्हांला तालमीला कामातून सूट मिळायची. शिवाय प्रयोगाच्या दिवशी आणि नंतर पण सुट्टी द्यायचे. तसं पाहिलं तर गिरणीमालक आणि कामगार बऱ्याच गोष्टी एकत्र मिळून करायचे. गिरणी स्पर्धेमधली काही नाटकं राज्य स्तरावरच्या स्पर्धेत उतरत असत, आणि बक्षीस पण मिळवत. आंतरगिरणी स्पर्धेत यशस्वी झालेल्या नाटकांना एक दर्जा होता. आम्ही खूप बक्षिसं मिळवली. नट निवडण्यासाठी गिरणीत एक नियम होता. त्याच गिरणीतील 307 दिवस कामाचे भरले पाहिजेत. म्हणजे एक वर्ष. हा नियम म्हणजे नियम. 1982च्या संपापर्यंत असं वातावरण होतं. त्यानंतर कामगार आणि मालक दोघांच्या वागण्यात बदल झाला. एक दरी निर्माण झाली. नंतर मालक लोक कामगारांच्या कार्यक्रमांना फार मदत करायला मागत नव्हते. एवढे नट कशाला? कमी करा. वगैरे बोलायचे. गिरण्या तोट्यात जात होत्या. आणि म्हणून सांस्कृतिक कार्यक्रमात पैशाची वाण भासायला लागली.

### सांस्कृतिक आविष्कार आणि राजकीय चळवळ

### शाहीर कृष्णराव साबळे (वय 77 वर्षे)

शाहीर साबळे म्हणून सबंध महाराष्ट्राला सुपरिचित. त्यांची अनेक लोकनाट्ये गाजली आहेत. त्यांच्या वाई या गावी त्यांनी लोककला शिक्षणासाठी एक प्रशिक्षण संस्था सुरू केली आहे.

आम्ही मूळ शेतकरी कुटुंबातले. पण शेती वगैरे नीट नसल्याने आमचे पूर्वज रेल्वेत हमाली वगैरे करण्याच्या दृष्टीने वाई तालुक्यातल्या पसरणी या गावी आलो. माझा जन्म तिथलाच. तिथे थोडी शेती कर, गुरं सांभाळ अशी कामं होती. त्या परिस्थितीत माझं शिक्षण नीट होणार नाही अशी

धास्ती माझ्या आईला होती. पसरणी गावी दोन वर्षं शिकलो आणि नंतर तिने मला मामाकडे अमळनेरला पाठवलं. अमळनेर मुक्कामी मराठी शाळा नं.3 मध्ये मी तिसऱ्या इयत्तेत शिकत होतो. त्यावेळीही मला गाण्याचा छंद होता. लहानपणापासूनच परमेश्वरानं आवाज दिला होता. तेव्हा मी या गाण्याच्या छंदात इतका वेडा झालो होतो की त्यावेळेला ग्रामोफोन तबकड्यांवर जी गाणी ऐकायला मिळायची ती हुबेहूब तशा पद्धतीने गायचो. त्यावेळी सिनेमा मूकपटाकडून बोलपटाकडे आला होता. त्यामुळे 'संत तुकाराम', 'गोपाळकृष्ण' वगैरे प्रभातच्या चित्रपटांची गाणी तबकड्यांवर ऐकायला मिळायची. मी ती गाऊन दाखवल्यावर माझं कौतुक व्हायचं. स्वाभाविकच आपल्याला आणखी संधी मिळावी अशी त्या वयात माझी अपेक्षा असायची. मी दहाएक वर्षांचा असेन तेव्हा. माझ्या आजीला मात्र माझा हा छंद आवडत नव्हता. तिने आईला सांगितलंही की पोरगं बिघडेल. तिच्यापरीने ते बरोबर होतं, पण त्याचा मला जाच होत होता. मी माझ्या गाण्याला कुठेतरी वाव मिळावा म्हणून धडपडत होतो. आणि माझं भाग्य असं थोर की त्या ठिकाणी योगायोगाने तेव्हा वरदेकर वगैरे संगीतातले मोठे मोठे लोक यायचे. जलशामधून त्यांची गाणी ऐकायला मिळायची.

दुसरी एक संस्कार घडवणारी प्रयोगशाळा म्हणजे साने गुरुजी. अमळनेरलाच होते. माझ्या शाळेत जायच्या रस्त्यावरच त्यांचं राहतं घर होतं. सुरुवातीला प्रताप हायस्कूलमध्ये ते शिक्षक होते. नंतर कामगारांच्या प्रश्नांकडे ओढा वाढल्यावर त्यांनी शिक्षकीपेशा बंद करून लोकजागृतीचं कार्य हाती घेतलं. कॉम्रेड डांगे, उषाताई डांगे आणि जिथं म्हणून गिरणी कामगार असेल तिथे कम्युनिस्ट पक्षाच्या सभा व्हायच्या. पण साने गुरुजी कम्युनिस्ट नव्हते. ते काँग्रेसवाले होते. त्यामुळे त्यांच्या व्यासपीठावर कम्युनिस्टांचा लालबावटा आणि काँग्रेसच्या तिरंगी झेंडा एकत्र असायचे. एकदा माझ्या मामाबरोबर तिथे गेलो असता सभा सुरू होण्यापूर्वी एक मुलगा तिथे गात होता, 'हम है तुकडे से हैराण, कहाँ छुपे श्री भगवान.' त्याचं खूप कौतुक झालं. तेव्हा माझ्या मनातही विचार आला की हे चांगलं आहे. मग मी प्रत्येक सभेला आजीला न सांगता चोरून जायचो. एकदा मी त्यांना म्हटलं की मलाही गाणं म्हणायची संधी द्या. ते म्हणाले, तुला येतं तर म्हण. ताबडतोब मग मी 'भारत का डंका आलममें बजवाया वीर जवाहरने, आधीन बनो स्वाधीन बनो सिखलाया वीर जवाहरने' हे गाणं म्हटलं. त्यावर लोकांनी टाळ्यांचा कडकडाट केला. तिथपासून माझं कौतुक व्हायला सुरुवात झाली. हे गाणं मी तबकड्यांवर ऐकून ऐकून पाठ केलं होतं. अशी बरीच गाणी मी जमा केली होती. लहानपणी म्हणजे 1930च्या चळवळीतली ती राष्ट्रगीतं होती. 'चरखा चला चला के, लेंगे स्वराज्य लेंगे' अशा तऱ्हेची. बालवयात ऐकलेल्या माझ्या गाण्यांचा पगडा माझ्या मनावर खूप होता.

मी स्वत: कवी-लेखक नव्हतो. पण अशी गाणी जमा करत होतो. त्यामुळे माझं शिक्षणाकडे दुर्लक्ष होत होतं. याचा आजीला खूप राग आला. तिने सांगितलं, 'ह्या थुपळीची मूठ बांधा आणि त्याच्या आईकडे पाठवून द्या ताबडतोब.' वास्तविक मी व्हर्नाक्यूलर फायनलचा अभ्यास केला होता. पण तिने मला परीक्षेलाही बसू दिलं नाही, आणि मी नॉन-फायनल राहिलो. एकच फायदा मात्र झाला. साने गुरुजींनी माझ्यावर खूप प्रेम केलं. त्यांची प्रहसनं वगैरे मी लिहून द्यायचो. पण पोरगं बिघडलं ही आजीची समजूत ठाम होती. आमचे वडील म्हणायचे, ''अरे, काय गाणं म्हणतोस? गाणं कुणी गावं, तर बामणाघरी लिवणं, कुणब्याघरी दाणं आणि महाराघरी गाणं.'' तेव्हा हे असं होतं.

पुढे मग घरची परिस्थिती बिघडली. सावकाराचं कर्ज झालं होतं. कोणाची मदत नव्हती. घरची सगळी जबाबदारी वडलांवर पडली होती. मी कुठेतरी नोकरी करावी अशी त्यांची इच्छा होती. मग आमची नोकरी म्हणजे गिरणीत कामगार म्हणून. मी काही मंडळींबरोबर मुंबईला आलो. इकडे आल्यावर मी गिरणगावात राहायचो. त्यावेळेला

कामगार हाच मुंबईचा राजा होता. तो चाळीचाळींतून राहायचा. क्लेरिकल जॉब/कारकुनी करणारी मंडळी होती. गिरणगावात नाहीतर दादरला हिंदू कॉलनीत. गिरण्यांचा एरिया म्हणजे डिलायल रोड, परळ, भोईवाडा. मुंबई औद्योगिक नगरी होती आणि महाराष्ट्राची हितवर्धिनी होती. मी स्वदेशी मिलमध्ये साचे चालवायच्या कामावर राहिलो, तेव्हा मुंबईची लोकसंख्या 14 लाखांपर्यंत पोहोचली होती. ही गोष्ट 1940च्या दशकातली.

पुढे मग देशभर चळवळी सुरू झाल्या. 1942मध्ये गांधीजींनी 'चले जाव'चं आंदोलन छेडलं आणि स्वाभाविकच सगळ्यांमध्ये चैतन्य निर्माण झालं. लोकांनी कारखान्यांमधली कामं सोडली आणि देशभक्तीच्या वेडानं झपाटलेल्या या लोकांनी लोकजागृतीचं काम सुरू केलं. यात तरुण मंडळी होती. काही बुजुर्ग आणि विचारवंतही होते. मुंबई चौपाटीवर गांधींची सभा पाहिली, आणि आम्ही एकदम भारावून गेलो. आपला जन्म काही दोन वेळेचं कमावून दोन वेळा खाण्यापुरता नाही असं वाटलं. मग त्या वेडात दोनचार तरुण घेऊन मी स्वत: 1944 साली माझं एक कलापथक तयार केलं. यात मी गाणी म्हणायचो. आता खेड्यापाड्यात प्रचार करायचा तर त्यात पोवाडे हवेत, काही सांघिक गाणी हवीत. आपण पारतंत्र्यात आहोत, गुलाम आहोत हे अशिक्षित लोकांपर्यंत पोहोचवायचं म्हणजे ते त्यांच्याच भाषेत सांगायला हवं होतं. मग मी त्या भाषेत,

चल उठ साहेबा आटप बिस्तरा नीट विलायत गाठ
बोलीची तुझ्या वटवट दीडशे वर्षं ऐकली नीट
अरे खाडीतून हलीव तुझी बोट,
साहेबा नीट विलायत गाठ
आमच्याबरोबर घालतोयस कोट, डोक्यावरती मिरवतोस हॅट
हॅटची लावू आम्ही वाट, साहेबा...

अशा पद्धतीची गाणी केली. विद्यार्थिदशेत एकदा 'रमला कुठे ग कान्हा' हे गाणं ऐकून त्यावर साने गुरुजींनी 'मिळवा जगी ज्ञाना' हे गाणं बनवलं होतं. मीही तसं करायचं ठरवलं. 'रत्नावाणी गाई छान सोभती या माझ्या', हे 'गोपाळकृष्ण' मधलं पेंढ्याचं गाणं होतं. त्याचं मी 'रत्नावाणी झेंडा छान शोभतो हा माझा' असं केलं. ते बाळबोधच होतं. गाय बाजूला करून तिथे झेंडा घातला! पण गुरुजींची शाबासकी मिळाली म्हणून माझा आत्मविश्वास वाढला.

त्यावेळी शाहीर होते, पण राष्ट्रीय कवनं करणारे फार थोडे होते. कुंडलचे शंकरराव निकम एक होते. ते साधारणत: पोवाडे गोळा करायचे. त्यांना ग.दि.माडगूळकर लिहून द्यायचे. जसा हुतात्म्यांचा पोवाडा. स्वातंत्र्यपूर्व काळात काही मंडळी अशीच स्वातंत्र्यासाठी झपाटलेली होती. पण सरकारी नोकरीमुळे त्यांना प्रकट होता यायचं नाही. त्यामुळे ते गुप्तपणे लिहून द्यायचे. धुळ्याचे एक शाहीर मोगल होते. ते छिदराम बसप्पा मोसाट यांना कवनं लिहून द्यायचे. त्यात बाबू गेनूचा पोवाडा, शिरीषकुमारचा पोवाडा असे पोवाडे असायचे. त्यावेळेला इंग्रजांचं धार्मिक गोष्टींवर बंधन नव्हतं. मग कीर्तनकारही कीचकवध लावायचे. इंग्रज म्हणजे कीचक असं भासवायचे. कीर्तनासाठी म्हणून उभे राहायचे आणि राष्ट्रीय पोवाडे म्हणायचे.

त्या काळात स्वातंत्र्यासाठी झपाटलेल्या लोकांमध्ये अडाणी स्त्रियाही होत्या. त्यात एक माझी मानलेली आई होती. आम्ही तिला बोरकुलची आई म्हणतो. खानदेशी अहिराणी भाषा ती बोलायची. क्रांतिकारकांना तिने आश्रय दिला होता. जे.डी.लाड, नाना पाटील वगैरे मंडळी तेव्हा भूमिगत होती. त्यांनी धुळ्याचा साडेपाच लाखांचा खजिना बोरकुलला लुटला. तो तिने आपल्याकडे सुरक्षित ठेवला होता.

स्वातंत्र्य मिळाल्यावर एक काळ असा आला की मी एकाकी पडलो. कारण मी कोणत्याच पक्षाचा नव्हतो. माझा पक्ष एकच तो म्हणजे साने गुरुजी. आता कुटुंब सांभाळायचं तर काम हवं. मी गिरणीत काम मागायला गेलो. तर तिथला लेबर ऑफीसर माझ्या स्वागतासाठी उठून उभा राहिला. म्हणाला, 'तुम्हीच मालक आहात, आम्हां नोकराकडे काय

काम मागता. इंग्रज गेले, आता तुम्हीच देशाचे मालक आहात.' असा मानसन्मान करून मला परत पाठवलं.

आता काय करायचं प्रश्नच होता. मग मी इथलेच कामगारातले काही लोक, काही फेरीवाले यांना जमा केलं आणि एक कलापथक सुरू केलं. राष्ट्रीय गाणी तेव्हा मागे पडली होती. मग करमणुकीची गाणी, लोकगीतं अशातऱ्हेने आम्ही ती गायला लागलो. भलेरी, भारूड, भजनं यातून लोकजागृती करू लागलो. रस्त्याकडेच्या कुडमुड्या ज्योतिषावर एक प्रहसन मी लिहिलं. 'नशीब फुटकं सांधून घ्या.' माणसानं आपलं नशीब प्रयत्नांच्या, मनगटाच्या जोरावर घडवावं असा त्यात संदेश होता. 'नारदाचा रिपोर्ट' म्हणून एक प्रहसन होतं. ते चालल्यावर मी 'बापाचा बाप' लिहिलं. त्यात बापाचा बाप म्हणजे ब्रह्मदेव. त्याच्यानंतर 'यमराज्यात एक रात्र' हे प्रहसन आलं. दर गणेशोत्सवाला आम्ही नवीन नवीन कार्यक्रम बसवायचो. त्यावेळेला गिरण एरिया हा सांस्कृतिक अड्डा होता. तिथले लोक नुसतेच कामगार नव्हते. ते प्रवचनकार होते, कीर्तनकार होते, भजनी बुवा होते. संपूर्ण महाराष्ट्रावर मराठी संस्कृतीचा वर्षाव करणारा हा विभाग होता. 1949 ते 51 या काळात मी इथे कार्यक्रम करायचो; तर एकही दिवस रिकामा नसायचा. गणेशोत्सव असायचे, सत्यनारायणाची पूजा असायची. त्यामुळे भरपूर कार्यक्रम व्हायचे.

दारूबंदीच्या काळात आम्ही दारूबंदी मोहीमही हातात घेतली होती. 'चित्रगुप्ताच्या दरबारात दारुडे' म्हणून मी एक प्रहसन लिहिलं होतं. चित्रगुप्त एका दारुड्याला विचारतो, तू इथे कसा आलास? तो सांगतो, रोज मी अर्धी बाटली घेत होतो. आज एक घेतली आणि गटारात पडलो आणि पटकन इथे आलो. मग तो आपल्या व्यसनाची कहाणी सांगतो. दारू पिण्याचे तोटे सांगतो. पण हा प्रयोग संपूर्णपणे फसला. त्याचा उलटाच परिणाम झाला. वास्तविक पाहता त्या काळात दारू इतकी मिळत नव्हती. पिणारेही मोजकेच लोक होते. पण आमच्या प्रचारामुळे दारू हे काहीतरी वेगळं आहे असं त्यांना वाटलं आणि ते चोरून दारू पिऊ लागले. म्हणजे दारूबंदीऐवजी दारूचांदी झाली. भट्टीवाल्यांचं उखळ पांढरं झालं. कारण ज्यांना महाग दारू परवडत नव्हती त्यांनी हातभट्टीची प्यायला सुरुवात केली. मग कामगारवर्गात आयतोबा खूप झाले. काही कष्ट न करता पैसे मिळायचं ते साधन बनलं. काळा पैसा वाढायला लागला. मग इथल्या मोकळ्या जागा या लोकांनी पटकावल्या. तिथे सुरुवातीला एकदोन पिंप टाकायची आणि नंतर हातभट्टी टाकायची असं सुरू झालं. झोपडपट्ट्या वाढल्या. या हातभट्टीवाल्या दादांचा त्यांना आश्रय होता. झोपडीतल्या पोरांना त्यांनी आपल्या हाताखाली ठेवलं.

आता सगळी सांस्कृतिक चळवळ संपत आलीय. मला आठवतंय, ज्या मुंबईमध्ये मी महिन्याचे 30 दिवस कार्यक्रम करायचो त्या मुंबईत मी महिन्यातून एखादा कार्यक्रम करतो. इथून मराठी संस्कृतीही जवळजवळ नष्टप्राय होण्याच्या मार्गावर आहे. आम्ही रस्त्यावर एकेकाळी मराठी बोलायचो. पण आता घरातून उतरून टॅक्सी पकडायची झाली तरीही हिंदीतून बोलावं लागतंय. मला बाहेरच्या देशांतून 'लोकधारा' घेऊन बोलावतात. पण खुद्द इथे फारसं प्रोत्साहन मिळत नाही.

**मधुकर नेराळे (वय 63 वर्षे)**

लालबागमध्ये असलेल्या हनुमान तमाशा थिएटरचे मालक.

लोकनाट्य हा शब्द पुरोगामी मंडळींनी आणला. तमाशात वग म्हणतात ती कथा त्यांनी लोकनाट्याच्या स्वरूपात आणली. लोकांना आवडणारं नाट्य म्हणून लोकनाट्य. थोडंसं नाटकाच्या पद्धतीने, थोडंसं तमाशाच्या पद्धतीने, असा एक मध्य गाठून त्यांनी तो कलाप्रकार लोकांसमोर आणला. त्यावेळेला असे बरेचसे लिखाण करणारे होते. नारायण सुर्वे, भास्कर मुणगेकर होते. कामगारांच्या व्यथा मांडणारं ते लेखन असायचं. आणि ही लेखक मंडळी बिनधास्त लिहायची. न.र.फाटक होते, आचार्य अत्रे होते. ही मंडळी या शाहीर लोकांना साहित्य पुरवायचे. आणि हे लोक ते विचार प्रभावीपणे लोकांपर्यंत

पोहोचवायचे. आता अमर शेख म्हणजे उभा राहिल्यावर असं वाटायचं की हा आगीचा लोळ आहे. आगीचा लोळ असा आल्यावर माणूस कसा भाजून मरून जाईल, तसं व्हायचं.

त्यावेळेला कम्युनिस्ट पक्षाने हे दोनतीन शाहीर मोठ्या प्रमाणात वापरले. अमर शेख, अण्णा भाऊ साठे, गव्हाणकर. ही मंडळी पक्षाला वाहून घेऊनच काम करत होती. पक्षामुळे कामगारांचे प्रश्न कसे सुटतील हे ते लोकांना सांगायचे. उदाहरणार्थ, अण्णा भाऊ साठेने एक लावणी लिहिली. 'माझी मैना गावावर राहिली, माझ्या जीवाची होतीया काहिली.' आता एक कामगार आपल्या बायकोला सोडून पोट भरण्यासाठी मुंबईला आला. त्यानंतर त्याची जी अवस्था झाली, म्हणजे काम तर मिळालं. पण पोटभर पैसे नाही मिळाले आणि दुसरीकडे विरह आहे, असं त्यात चित्रण आहे. हे एक झालं. अशी चळवळीच्या विषयावरची काव्यं उत्स्फूर्तरीत्या लिहून ही मंडळी लोकांसमोर मांडायची. का? तर चळवळीचे विचार लवकर लोकांपर्यंत पोहोचून त्यांची शक्ती उभी राहावी. त्यामुळे कम्युनिस्ट पक्ष कामगार विभागामध्ये झटकन फोफावला. समाजवादी विचारांची मंडळी फार बुद्धिमान, विचारवंत. पण त्यांच्या विचारांना एक मर्यादा होती. वसंत बापट होते. लीलाधर हेगडे सुद्धा होते. पण त्यांनी समाजातले वेगळे विषय घेतले. म्हणजे प्रबोधनाचे वगैरे.

या कलाक्षेत्रातील लोकांनी एकूणच चळवळींना फार मोठा हात दिला. त्यांच्यामुळे चळवळींना गती मिळू शकली. गहन विषय सुद्धा त्यांच्यामुळे लोकांना तत्काळ अपील होत होते आणि लोक साथ देत होते. जसं संयुक्त महाराष्ट्र चळवळीच्या वेळी झालं. पठ्ठे बापूरावांनी स्वातंत्र्यपूर्व काळात मुंबईची लावणी केली आहे. त्यात तेव्हाच्या मुंबईचं वर्णन आहे. इथली जहाजं कशी, घोडागाड्या कशा आणि नंतर अण्णा भाऊंनी मुंबईची लावणी केली. त्यात त्यांना मुंबई कशी वाटली आहे? तर जीव घेणारी वाटली आहे. कामगारांचा जीव घेणारी आहे. इथले व्यापारी कसे चळवळीला दाबण्याचा प्रयत्न करतात. वगैरे. शाहिरांनी आपल्या काव्यातून वास्तवही दाखवलं आणि करमणूकही केली आणि चळवळीला बाळसं आणलं.

संगीत, नाटक, निरनिराळे उत्सव, सणवार हे सगळे आविष्कार आणि गिरणगावचं रोजचं जीवन याचं अतूट नातं होतं. या सांस्कृतिक संस्थांप्रमाणेच गिरणगाववासीयांवर प्रभाव टाकणाऱ्या दुसऱ्या दोन संस्था होत्या त्या म्हणजे, कामगारांच्या ट्रेड युनियन आणि राजकीय पक्ष. स्वातंत्र्ययुद्धाचं धुरीणत्व काँग्रेस पक्षाकडे; तर कामगारांच्या शोषणविरोधी लढ्याचं डाव्या पक्षांच्या युनियनकडे. 1928 साली गिरणी कामगार (लाल बावटा) युनियनची अधिकृत स्थापना झाली. परंतु अगदी 1908पासून गिरणीमालकांच्या अन्यायाविरुद्ध कामगारांना उत्स्फूर्त संप करण्याचं कौशल्य अवगत होतं. या लढाऊ परंपरेमुळे, स्थापना झाल्यावर अल्पावधीतच 'लाल बावटा' ही देशातली सर्वात समर्थ ट्रेड युनियन ठरली. पुढे स्वातंत्र्यानंतर समाजवादी पक्षाची युनियनदेखील गिरणगावात उभी राहिली. कामगार वर्गातील राजकीय चैतन्य आणि सांस्कृतिक रसरशीतपणा यांचा संगम गिरणगावातल्या राजकीय चळवळीत आणि सांस्कृतिक आविष्कारात पाहायला मिळतो. स्वातंत्र्य-चळवळीपासून ते संयुक्त महाराष्ट्रापर्यंत लोकसभेचे सहा मतदार संघ असलेला मुंबईचा हा विभाग अनेक राजकीय चळवळीचं व्यासपीठ बनला. सामाजिक-सांस्कृतिक संलग्नता असल्याने शिवाय समान आर्थिक स्तराने एकत्र बांधला गेल्यामुळे गिरणगावचा समाज सर्व राजकीय पक्षांना आपले पाय रोवण्यासाठी आकर्षित करून घेत असे. परिणामी अनेक राजकीय विरोधकांची ही युद्धभूमी बनली. शिवसेनेच्या उदयाने यावर शिक्कामोर्तब झाले. गिरणगावची कला आणि संस्कृती अशा चळवळींमुळे वेगवेगळी परिमाणं लेवू लागली.

महाराष्ट्रातले सांस्कृतिक कलाप्रकार राजदरबारच्या आश्रयाने वाढले नाहीत तर लोकांच्या आश्रयावर वाढले.[13] त्यामुळे धर्माव्यतिरिक्त सामाजिक आणि राजकीय बदलांचे प्रतिसाद इथल्या कलाविष्कारात दिसतात. तमाशा हा लोककला

प्रकार महाराष्ट्रात 17व्या शतकाआधीपासून बहुजन समाजात लोकप्रिय आहे. त्या आधी गोंधळ, वाघ्यामुरळी, बहुरूपी, दशावतार, वासुदेवाची गाणी आणि भेदिक लावण्या हे कलाप्रकार होते. त्यांचं अधिष्ठान धार्मिक असलं तरी वेगवेगळ्या रंजक रूप आणि घाटातून, नाट्यात्मकरीत्या, नृत्यमयरित्या, थोडक्यात सृजनशीलतेने लोकांपर्यंत आशय पोचवला जाई. आजही हे लोककला प्रकार ग्रामीण भागात प्रचलित आहेत. तमाशा म्हणजे या सगळ्या प्रकारातून स्फूर्ती घेऊन नाट्य, नृत्य, लावणी, पोवाडा या सकट बनवलेला एक संमिश्र आविष्कार. 'भेदिक' तमाशात शिव आणि शक्ती यांच्यातल्या द्वैतअद्वैत संकल्पनेचा ऊहापोह किंवा अहवाल आणि पोथीपुराणं यातील कूट प्रश्नांवरील, संगीत सवाल जवाब असत. अशा भेदिक तमाशाचे अनेक 'अड्डे' मुंबईत गिरणगाव आणि आसपास होते[14] आग्रीपाडा, भायखळ्याची खटाव मिल, मस्तान टँक मैदान, नागपाडा, दादासाहेब फाळके रोड, क्रॉफर्ड मार्केट या सर्व भागांतून घाटावरून आलेल्या कामगारांनी आपली वस्ती वसवली. तिथल्या मैदानांत, रस्त्यांच्या चौकांमध्ये तमाशाचे फड आपले कार्यक्रम सादर करत. भेदिक तमाशातलं अध्यात्म मागे पडल्यावर त्याचा 'रंगीत तमाशा' झाला. यात वग, गौळण, संगीत बारी, लावणीनृत्य, बैठकीची लावणी, पोवाडा असे अनेक प्रकार आले. तमाशा हा प्रकार 'अश्लील' ठरवून मोरारजी सरकारने त्यावर 1948 साली बंदी आणली; पण कलारसिकांनी सरकारला तमाशाचं सांस्कृतिक महत्त्व पटवून दिल्याने ती उठवली गेली. तमाशातल्या रूपाप्रमाणेच आशयदेखील लवचिक आणि उत्स्फूर्त असे. त्यामुळे सर्वच राजकीय चळवळींना लोकांपर्यंत पोहचविण्यासाठी या कलाप्रकाराचा मोह पडलेला आहे.

1873मध्ये महात्मा जोतिराव फुले यांनी स्थापन केलेल्या सत्यशोधक समाजाचे विचार या लोकांपर्यंत पोचवायला त्यांच्या अनुयायांनी तमाशाचा घाट वापरला. कटाव, फटका, कडाका-पोवाडा अशा प्रभावी शाहिरी बाजांचा उपयोग करून 'सत्यशोधकी तमाशा' त्यांनी निर्माण केला. याला 'सत्यशोधकी जलसा' म्हणूनदेखील संबोधन होते. याच धर्तीवर आंबेडकरांच्या अनुयायांनी 'आंबेडकरी जलसा' सुरू केला. सत्यशोधक जलशात लावणी ही शृंगारिक म्हणून काढून टाकण्यात आली. हिंदू देवांऐवजी 'निर्मकां'ना गणामध्ये आळवण्यात आलं. शेतकऱ्यांमध्ये जागृती करणं, त्यांना मद्यपानापासून परावृत्त करणं, विधवांच्या समस्या मांडणं आणि समतेचं महत्त्व पटवून देणं अशा आशयांसाठी वग लिहिले गेले. पठ्ठे बापूराव, शाहीर लहरी हैदर यांच्या रचनाही म्हटल्या जात. सत्यशोधकी जलसे 1890 ते 1930 या काळात अत्यंत लोकप्रिय होते.

14 जानेवारी 1931 पासून आंबेडकरी जलसा सुरू झाला. आंबेडकरांचे विचार ग्रामीण जनतेच्या 'व्यावहारिक भाषेत' आणि रंजकतेने, जलसा रूपाने सांगणे हा या जलशांचा उद्देश होता असं भीमराव कर्डक यांनी त्यांच्या 'आंबेडकरी जलसे स्वरूप व कार्य' या पुस्तकात म्हटलं आहे. अस्पृश्यांमध्ये असलेली शिक्षणाची गरज, अज्ञान, अंधश्रद्धा असे विषय या जलशात असत. मूळातच तमाशा हा प्रकार तळागाळाच्या समाजामधून आलेल्या कलावंतांनी जोपासलेला खास कलाप्रकार होता. जेव्हा यातल्याच जागृत मंडळींनी आंबेडकरी विचार त्यात घालून त्याला वेगळं रूप दिलं तेव्हा तो जलसा जास्त समृद्ध झाला. आजही दलित-चळवळीच्या प्रत्येक महत्त्वाच्या प्रसंगी जलसा होतो आणि त्याला प्रचंड प्रतिसाद मिळतो. या जलशांच्या गणामध्ये पारंपरिक हिंदू देवतांच्या ऐवजी वा सत्यशोधकी 'एकेश्वरा'ऐवजी भीमरायाला नमन केलेलं दिसतं. 'हे भीमराया, नमितो पाया, द्यावी मति आम्हां तव गुण गाया' हे 'मंगलाचरण' 1931 साली भीमराव कर्डक यांनी 'काळाराम मंदिर सत्याग्रहा'वर आधारलेल्या कार्यक्रमात गायलं होतं.[15]

1946च्या निवडणुकीत कम्युनिस्ट पक्षाने आपल्या प्रचारासाठी पहिलं कलापथक काढलं. पुढे अमाप लोकप्रियतेच्या लाटेवर विराजमान झालेले शाहीर अमर शेख, अण्णा भाऊ साठे आणि शाहीर गव्हाणकर यांना ही जबाबदारी दिली गेली.

1936पासून अण्णा भाऊ साठे हे कॉम्रेड डांगे यांच्या जवळचे. अण्णा भाऊंनी 1942 साली पहिला पोवाडा लिहिला. (चीनमधल्या) नानकिंग नगरापुढे मार्क्सवादी फौजांचा सशस्त्र उठाव हा त्याचा विषय होता. त्याच साली त्यांनी 'स्टालीनग्राडचा पोवाडा' आणि 1946 साली 'बर्लिनचा पोवाडा' लिहिला. रशियन योद्धयांची, शहराची नावं मराठी पोवाड्यात बसवून आंतरराष्ट्रीय कम्युनिस्ट लढ्यांची नाळ त्यांनी गिरणगावच्या कामगार लढ्याशी जोडली.

1920 साली वाटेगावच्या (सांगली जिल्हा) मांगवाड्यात जन्मलेले मांग जातीचे अण्णा भाऊ अकराव्या वर्षी आपल्या कुटुंबासह वाटेगावाहून चालत मुंबईला आले. सुरुवातीला बसमध्ये क्लीनरचं काम करणारे शाहीर अमर शेख मुंबईत कम्युनिस्ट पार्टीत आल्यावर आपल्या पहाडी आवाजामुळे आणि लोभसरूपाने, फक्त पार्टीच्या कलापथकाचे नाहीत तर अवघ्या महाराष्ट्राचे हीरो ठरले. आकाशाशी नजर भिडवून, हातात डफ घेतलेले कुरळ्या केसांचे, उंचेपुरे असे अमर शेख, आजही लोकमानसात ठसलेले आहेत.

**शेख जैनू चांद (वय 63 वर्षे)**

गिरणगावचे शाहीर. शाहीर अमर शेखांचे एकेकाळचे सहकारी. 2006मध्ये निधन.

त्यावेळी शाहीर अमर शेख राहायचे सात रस्त्याला, अण्णा भाऊ राहायचे घाटकोपरला आणि गव्हाणकर गिरगावमध्ये. रोज संध्याकाळी तिघांची भेट असायची. परळला कम्युनिस्ट पक्षाचं ऑफीस आहे तिथे डेली भेटायचे. त्यांचं ते ठिकाणच होतं भेटायचं. मैत्री खूप होती. इतके एकत्र असायचे की त्यांना 'दत्तत्रिमूर्ती' म्हणून लोक ओळखायला लागले होते. त्यांच्याबरोबर तेव्हा मी, लक्ष्मण साठे, वासुदेव ताम्हणकर, राघू कदम, आदम शेख वगैरेही मंडळी असायची. शिवाय जुन्यातले गणपत सातपुते होते. स्त्रियांमध्ये शैला महाडकर, पुष्पा शेलारे, विमल दळवी होत्या. हिंदीतून लिहिणारे पण होते. कनू घोष, शैलेंद्र, सलील चौधरी, कनू राय. इप्टाची स्थापना यांच्यामधूनच झाली. याच्यातून बरेच नवे कवी जन्माला आले. नवी नवी गाणी आली. त्यातले पहिले नारायण सुर्वे. सुर्वे हे खरे मास्तर शाळेतले. पण त्यांनी लिहिलेली गाणी लोकांनी आवडीने गायली. कामगारांचा तो पहिला कवी. आता गल्लोगल्ली झाले आहेत कामगार कवी.

कलापथकांच्या कार्यक्रमासाठी या इथूनच निघायचे एकत्र सगळे. तिघे शाहीर बहुतेकदा एकदमच निघायचे. त्यांची कुटुंबं पण होती ना. अमर शेखांच्या पत्नी ज्योतीबाई होत्या इथे. त्या नोकरीला होत्या. त्यामुळे आर्थिक स्थिती बरी होती. गव्हाणकरांची मिसेसही सर्व्हिसला होती. प्रश्न राहिला अण्णा भाऊंचा. अण्णा भाऊ म्हणजे फकीर माणूस. कफल्लक अगदी. पायी जायचं आणि पायीच यायचं. असा त्या माणसाने त्रास सहन केला त्या वेळेला. त्या त्रासाची कदर आजही झालेली नाही. अण्णा भाऊंनी त्यावेळेला इतक्या कथा-कादंबऱ्या लिहिल्या. त्यांचे अनुवादही झाले. लोकांनी त्यांच्या कादंबऱ्या आपल्या नावावर छापून घेतल्या. कारण त्याला वालीच नव्हता कोणी. कोणी छापायला तयारच नव्हतं असलं पुरोगामी साहित्य. लग्न झालं होतं. एक मुलगाही होता. मधुकर साठे म्हणून. तो वारला नुकताच. पण त्यांच्याइतकी वाताहत कोणाचीच झाली नसेल. नंतर त्या तिघांत दुरावाही निर्माण झाला. काय अवस्था झाली होती की अण्णा भाऊ दारू खूप प्यायचे. कुठेही. घरी, ऑफिसात, रस्त्याने. त्यांना सांभाळणारेच त्यांना पाजत होते. कोणी समजावायला गेलं तरी ऐकायचे नाहीत. म्हणायचे, 'उद्यापासून सोडतो'. परत दुसऱ्या दिवशी प्यायला तयार. हटकलं तर म्हणणार, आजचा शेवटचा दिवस, उद्या तुम्ही मला जोड्याने मारा. पण दुसऱ्या दिवशी पुन्हा तेच. गाणी वगैरे लिहायचे, वीस रुपये मिळाले तरी खूप व्हायचे त्यांना. अमर शेख, गव्हाणकर नाही प्यायचे. म्हणूनच तर शिल्लक राहिले आणि कलापथकही सुरू राहिलं.

मला वाटतं, 1958-59 साली केशर आली कलापथकामध्ये. आमची नजरभेट झाली. नंतर ते फार विचित्र झालं सगळं. अमर शेख वारले तेव्हा आम्ही तर निराधार झालो होतो. कलापथकात होतो, एकाच खोलीत

राहत होतो. तर आमच्याविषयी वावड्या उठायला सुरुवात झाली की केसर आणि जैनू एकत्र राहतात. वाईट वागतात. अमर शेखच्या इज्जतीचा प्रश्न आहे. अमकं तमकं. मग आम्ही ठरवलं की हे म्हणतात ना आम्ही वाईट वागतो, तर लग्नच करून टाकू; म्हणजे यांची तोंडं बंद होतील. मग विदर्भात आमचं लग्न झालं. अकोला जिल्ह्यामध्ये. स्टेजवरती लग्न झालं ते. तिथे माझे मानलेले भाऊ आहेत ना शेकापचे. त्यांनी ठरवलं की जैनू, केशर, तुमचं आम्ही आज लग्न करून टाकणार. म्हटलं, 'आज आमचा कार्यक्रम आहे.' म्हणाले, कार्यक्रमातच लग्न करायचं. मग त्यांनी काय केलं. स्टेजवरतीच होम पेटवला कार्यक्रमाच्या अगोदर. आमचे कलाकार आले स्टेजवर एका बाजूने आणि दुसऱ्या बाजूने ग्रामपंचायतीतले लोक आणि लग्न लावून टाकलं, मंगलाष्टकं म्हणून. 1 मे 1973 ला. तिकीट काढून जी माणसं आली होती अगोदर त्यांना वाटलं की हा नाटकाचाच प्रकार चाललाय सगळा. त्याअगोदर केशर आणि माझं बोलणं झालं होतं, की कलापथकाची जबाबदारी आपण जोडीने उचलली तर बरं. मलाही घरदार नाही. तेव्हा तुझा आधारही होईल. नात्याचंही तसं कोणीच नव्हतं. चळवळीमुळे ते दुरावलेलेच होते. फक्त हिच्या आईची साथ होती.

**केशर जैनू (वय 60 वर्षे)**

शाहीर जैनू चाँद यांच्या हिंदू पत्नी. शाहीर अमर शेखांच्या पथकातून गाण्याचे कार्यक्रम सुरू केले. 'डोंगरी शेत माझं' हे नारायण सुर्वे यांचं त्यांनी गायलेलं गाणं खूप लोकप्रिय आहे. अजूनही अत्यंत जोषात नृत्याच्या लयीवर त्या ते गातात. त्यांचा मुलगा निशांत हा देखील आई-वडिलांबरोबर कार्यक्रमात सामील होतो.

माझ्या वडिलांचा-गुलाबरावांचा-तमाशा होता स्वत:चा. सातारा जिल्ह्यातल्या आणेवाडीत माझं संपूर्ण बालपण गेलं. मी शाळेत होते तेव्हा लोक म्हणायचे, या मुलीला तुम्ही तमाशात बिमाशात घेऊ नका. हिची चांगली बुद्धी आहे. तिला दुसरं काहीतरी वेगळं करायला सांगा. घरी आई होती. ती सुद्धा कलाकार होती. वडीलही कलाकार. ते म्हणतात, पाण्यातल्या माशाला पोहायला शिकवायला लागत नाही. तसं माझ्या घरातच माझं शिक्षण झालं. तिचंही तेव्हा पुष्कळ नाव होतं. रेणुकाबाई कुडचीकर. कानडी मुलखातली होती ती. लग्नानंतर वडलांबरोबर इथे आली.

मी शाळेत पाचवीसहावीपर्यंत होते. ऐन परीक्षेच्या वेळेला यात्रा असायच्या तमाशाच्या. पण सर लोक इतके चांगले की ते म्हणायचे, काही नाही तुमचं पोट आहे त्याच्यावर तर आम्ही हिची परीक्षा आधीच घेतो, आणि तुम्ही जा. मग मी तमाशाला जायचे. तिथं पूर्ण काम केलेलं आहे. आईवडिलांबरोबर. माझी आई माझी खरी गुरू.

माझ्या मैत्रिणी होत्या सगळ्या वरच्या वर्गातल्या. ब्राह्मण वगैरे. त्या म्हणायच्या, 'हे काय ग केशू, काय तमाशा करतेस, आम्हांला बरं नाही वाटत. तू दुसरं काहीतरी करावंस असं वाटतं.' त्याचवेळी मला वाटतं, पेपरला एक जाहिरात आली होती, अमर शेखची, एक कलावंत पाहिजे म्हणून. आमच्या गावाला एक कम्युनिस्ट होते. ते म्हणाले, 'केशर, बघ तुझं दैव चांगलं आहे. तुला इकडे जायचं असेल तर मी आत्ता कळवतो. तू गेलीस तर तुझं सोनं होईल. वेगळं काहीतरी केल्यासारखं होईल. मग मला वाटतं, त्यांनीच पत्र पाठवलं की आमच्याकडे एक कलावंत मुलगी आहे. चांगली आहे. मग त्यांनी पत्र पाठवलं आणि मला न्यायला माणूसही पाठवून दिला. माझं आईवडिलांशिवाय कुठे फिरणं नव्हतं. मी म्हटलं, 'मी जात नाही. मला घाबरायला होतंय.' शेवटी वडील आणि मी आलो मुंबईला. अमर शेखनी एखादं गाणं म्हणायला सांगितलं. पण वाद्याशिवाय कसं गाणार? तर माझे वडील होते चांगली ढोलकी वाजवणारे, हलगीही वाजवायचे. मग त्यांनी साथ केली आणि मी गाणं म्हटलं. गाणं संपल्यावर अमर शेख म्हणाले, गुलाबराव, तुम्ही तरी कुठे जाता, राहा तुमच्या पोरीबरोबर. मग त्यांनी आम्हांला तिथेच मागच्या खोलीत जागा दिली राहायला.

नंतर काही दिवस कार्यक्रम झाले. तेव्हा संयुक्त महाराष्ट्र

चळवळ सुरू झाली होती. बेळगाव कारवार वगैरेच्या दौऱ्यावर आम्ही गेलो. ते सगळं वातावरण बघून मी घाबरले. म्हटलं, आपण जाऊ या घरी. मला काही हे जमणार नाही. वडिलांनी हे अमर शेखना सांगितलं. तर त्यांनी मला जवळ बसवलं आणि समजावलं. म्हणाले, 'तू अशी घाबरू नकोस. इथे आमच्यात राहून तुला तुझ्या आयुष्याचं काहीतरी करता येईल. ज्यातून तू आलीस त्यात तुझी अधोगतीच आहे. इथे तुझं नाव राहील.' काही राजकारणाच्या गोष्टीही मला सांगितल्या. सगळे कलाकार एकत्र बसले की ते या गोष्टी समजावून सांगायचे. कार्यक्रम कसा करायचा वगैरे. त्यांची गाणी पण मला पाठ नव्हती. कार्यक्रमात उभं राहून राहूनच ती मला पाठ झाली. कामगार मैदान, शिवाजी पार्कला वगैरे कार्यक्रम व्हायचे. तेव्हा सगळे यायचे तिथे. आचार्य अत्रे, सेनापती बापट असे लोक.

माझ्या अगोदर तरू केशकर होती पथकामध्ये. हेमा प्रभू पण अगोदरचीच. तिचं लग्न झाल्यावर तरू आणि मीच गात होतो. पण लग्न झाल्यावर त्या कोणी आल्या नाही परत. मी एकटीच मुलगी होते. मग अण्णा भाऊंची मानलेली मुलगी यायला लागली. थोड्या दिवसांनी मग आमचा डान्स सुरू झाला. वेगवेगळे कार्यक्रम व्हायला लागले. पेटी आली, ढोलकी आली. एक-एक वस्तु वाढायला लागल्या. सगळ्यांच्या सारख्या पांढऱ्या साड्या, असं सगळं बेस झालं.

नंतर अण्णा भाऊ आणि अमर शेख यांच्यात दुरावा निर्माण झाला. अण्णा भाऊ म्हणाले की मी स्वत:चं कलापथक काढतो. मग अण्णा भाऊ आणि गव्हाणकर एकत्र झाले आणि अमर शेखनी स्वत:चं पथक काढलं. कम्युनिस्ट पक्षाला बरंच झालं. हे नाहीतर ते. खरं म्हणजे कम्युनिस्ट पक्षाचं फार मोठं कार्य आहे. पण त्यांचे पुढारी कमकुवत ठरले हो. आपल्यापुरतं पाहिलं त्यांनी. पुढे कार्यकर्ते तयार केले नाहीत.

कम्युनिस्ट पार्टीमध्ये मराठी कलापथकाच्या आधीपासून एक मध्यवर्ती कलापथक होतं. त्यात अत्यंत सर्जनशील कलावंत आणि लेखक होते. साम्यवादी वर्गीय जीवनभानाची जोड आपल्या कलेला देऊन या (बहुसंख्य अमराठी) गुणवंतांनी पार्टीच्या प्रचाराबरोबरच कलेच्या मुख्य प्रवाहातही ख्याती मिळवली. उदयशंकर, सचिनशंकर, बिमल रॉय, दीना गांधी (नंतर पाठक), शांता गांधी, प्रेम धवन, बलराज साहनी हे नाट्यचित्रसृष्टीतील काही कलावंत. यातल्या स्त्रिया समाजाच्या उच्चभ्रू वर्गातल्या बंडखोर. त्यामुळे स्टेजवर उभ्या राहण्यासाठी डगमगल्या नाहीत. मराठीत मात्र उषा ऊर्ध्वरेषेसारख्या हिंमत दाखवून लोकनाट्यात काम करायला तयार झालेल्या तरुण कार्यकर्तीला विरोधकांकडून भरपूर टीका सहन करावी लागली. पण या कलापथकाने निवडणूक प्रचारात महाराष्ट्राच्या गावोगावी कार्यक्रम करून अमाप लोकप्रियता मिळवली. देशाला स्वातंत्र्य मिळाल्यावर अमर शेखांनी हिंदी संघराज्याला प्रणाम हे स्वत: लिहिलेलं गीत ठिकठिकाणी गायलं. ग्रामोफोन कंपनीने त्याची रेकॉर्ड काढली.[16] अण्णा भाऊ साठ्यांनी पुढे कम्युनिस्ट पक्षाच्या फक्त वर्गीय लढ्याला प्राधान्य देणाऱ्या प्रचलित विचारसरणीच्या चौकटीबाहेर पडून वर्गीय लढ्याला जातीयताविरोधी लढ्याची जोड दिली. व्यापक परिवर्तनशील दृष्टिकोनामुळे त्यांच्या लेखनात ज्योतिबा फुले, शाहूमहाराज आणि डॉ.आंबेडकर यांच्या विचारांचे प्रतिबिंब स्पष्ट दिसतं. त्यांनी कथा, कादंबऱ्या, नाटकं, प्रवासवर्णन, पत्रकारिता असं मुबलक लेखन केलं. पण ग्रामीण आणि शहरी कामगार भागात मात्र त्यांच्या शाहिरीनेच सर्वांना थरारून टाकलं. त्यांची 'मुंबईची लावणी' अमर शेखांच्या आवाजात अमर झाली आहे. मुंबईचं वैभव आणि दारिद्र्य याच्या विषमतेचं नेमकं वर्णन हे या लावणीचं वैशिष्ट्य आहे. 'मुंबईचा गिरणी कामगार' हा त्यांचा पोवाडा म्हणजे 1908 ते 1950पर्यंतचा गिरणी कामगारांचा ज्वलंत इतिहास आहे. गिरणीवर संपाचा झालेला परिणाम दाखवताना ते लिहितात, ''गिरण्यांची तोंडे दाबूनी साचा बंद केला। शासनात आऱ्या जहाला। थैली फेकून बाजूवाला झाला बाजूला। कपड्याचा हात मोडला। तिरीमिरी आली धोट्याला। रोव्हीण केर, भुलेराव गोंधळ

माजला। मढ्यासमान गिरणी प्राणची गेला।' मुंबईचे गिरणी कामगार टाळ्यांच्या गजरात या पोवाड्याचे जाहीर कौतुक करत असत. याची नोंद वृत्तपत्रातील तत्कालीन नोंदीवरून येते.[17]

**वसंत भोर (वय 75 वर्षे)**

कम्युनिस्ट पक्षाच्या सांस्कृतिक पथकात बरीच वर्षं कार्यरत. कामगारवर्गीय सुप्रसिद्ध कम्युनिस्ट कार्यकर्त्या पार्वतीबाई भोर यांचा मुलगा. सध्या ठाण्यात निवृत्त आयुष्य. एम.एस्सी.पर्यंत शिक्षण. पक्ष सोडल्यानंतर स्वत:चं कलापथक सुरू केलं, व्यावसायिक नाटकांची निर्मिती केली. त्यांच्याकडे जुन्या फोटोंचा खजिना आहे.

मी सहा वर्षांचा असताना माझे वडील वारले. त्यानंतर म्हणजे माझं पंधरावं की सोळावं वर्ष चालू असेल. त्यावेळेला माझ्या आईने असा निर्णय घेतला की प्रत्येकाने नोकरी करायची. त्यावेळी माझी बहीण, माझी मामेबहीण मी आणि माझा भाऊ, सगळे नोकरी करत होतो. माझा भाऊ पार्टीच्या प्रेसमध्ये होता. मशीन ऑपरेट करायचा. त्याने मला तिकडेच कंपोझिटर म्हणून लावलं.

लिगल प्रेसमधल्या नोकरीमध्ये मस्टर ठेवणं किंवा कायदेशीररित्या आवश्यक असणाऱ्या सगळ्या गोष्टी कराव्या लागायच्या. पण त्यामुळे व्हायचं काय, त्यातून लोकांची पोलिटीकल इन्व्हॉल्वमेंट वाढायची. तो कम्युनिस्ट आहे किंवा नाही असे काही विचार नसायचे. पण आपोआप ते डेव्हलप होत जायचे. वन्स यू आर इन, मग हे आपोआपच होतं. माझ्या बाबतीत म्हणायचं तर मी नोकरीला, म्हणजे कम्पोझिटर म्हणून लागलो वयाच्या पंधराव्या वर्षी. तेव्हा मी आठवीला होतो आणि नोकरी होती सकाळी आठ किंवा नऊ ते संध्याकाळी सहा. आणि तेव्हा मी नाइट स्कूलमध्ये ॲडमिशन घेतली होती. शिवाजी नाइट हायस्कूल. आर.एम.भट हायस्कूलच्या मागच्या बाजूला ती म्युनिसिपल शाळा आहे ती अजून आणि ते नाईट हायस्कूल पण आहे.

मी एकंदरीत दोन वेळा जेलमध्ये गेलो. एकदा शुगर शॉर्टेज झालं होतं त्या साखरेच्या आंदोलनात. पण साखरेच्या प्रश्नाच्या वेळी बरीच मंडळी आत गेली. त्यात मी होतो. माझी आई पण पकडली गेली. माझी आई पार्वतीबाई भोर. पार्टीच्या युनियनची धडाडीची पदाधिकारी होती. खूप नाव होतं तिचं. ती अनेक वेळा जेलमध्ये गेली होती.

मला आठवतं, आम्ही वरळीच्या जेलमध्ये होतो. बहुतेक साखरेचंच आंदोलन होतं. त्यावेळेला अमर शेख वगैरे ही मंडळीसुद्धा आत होती. तेव्हा ते संध्याकाळी फूटबॉल, व्हॉलीबॉल वगैरे खेळायचे. कारण राजबंदी होते ना सगळे. त्यांना तसं बाकी सगळ्या सोयी होत्या. फक्त बाहेर जायचं नाही. तिथे सगळ्या बरॅक्स होत्या. आता वरळीची डेअरी आहे ना, तिथली गोष्ट आहे ही. त्यावेळेला तिथे मोकळ्या लांबलचक बरॅक्स होत्या. तिथे प्रत्येकाचं जेवण वगैरे बनवून द्यायचे. कॅण्टीन पण होतं. तुमच्या नावावर जे पैसे असतील त्यातून तुम्ही तुम्हांला हवं ते कॅन्टीनमधून विकत घेऊ शकत होता. सकाळचा नाश्ता, दुपारचं जेवण, कांगणी, वाटाणे, शेंगदाणे. उगीच काहीतरी वेळ घालवायचा उद्योग. एक एक शेंगदाणा निवडायचा. तो बारीक करायचा. असं सगळं चालायचं.

संध्याकाळी खेळ झाल्यावर मला अजूनही आठवतं, समुद्राच्या काठी सगळे जमायचे. म्हणजे कुंपणाच्या अलीकडे. पलीकडे समुद्र. मध्ये त्या सगळ्या तारा वगैरे. समुद्रावर संध्याकाळी लोक फिरायला यायचे. मग अमर शेख गाणं गायचे. कम्युनिस्ट इंटरनॅशनल... असं एक गाणं होतं. बाकीचे सगळे ते त्यांच्याबरोबर गायचे आणि मग साडेसहाच्या दरम्यान पुन्हा बरॅक्समध्ये जायचे.

चारपाच महिने मी आत होतो. माझी एस.एस.सी.ची परीक्षा व्हायच्या आधी थोडे महिने त्यांनी मला सोडलं. या एस.एस.सी.च्या परीक्षेत मी फेल झालो. 50 सालची गोष्ट. मी 18 वर्षांचा असेन. मी पार्टीच्या परळ भाडेकरू संघात, जिथे कलापथकाचं पण ऑफीस होतं, तिथे बसायचो. तिथे नगरचे दोन कॉम्रेड आले. अंडरग्राउंड होते. त्यांना मी डांग्यांना

भेटायला नेणार होतो. पण आधीच पोलिसांनी पकडलं. मी पण त्यांच्याबरोबर. टाकलं भायखळ्याच्या जेलमधल्या अंडा कोठडीत. डेकॉईटी आणि मर्डर अशा दोन गुन्ह्यांखाली मी जवळजवळ तिथं 7-8 महिने होतो. भयानक होतं. संडास नसायचा. एक पॉट आणि बालदी. सॉलिटरी कन्फाईनमेंट होती. संध्याकाळचा फक्त एक तास बाहेर व्यायामासाठी वा फिरण्यासाठी सोडायचे. मग परत कोठडीत बंद.

त्या सुमारास पार्टीचं कसलं तरी आंदोलन झालं आणि आमचे अनेक लोक आत आले. नाशिकच्या प्रसिद्ध मराठा शिक्षण संस्थेचे वाघ गुरुजी होते. त्यांनी मला पुढच्या शिक्षणासाठी तयार केलं. नाहीतर काय शिक्षण न घेता पार्टीचं काम करायला माझ्यासारख्या तरुण माणसाला आवडतंच. म्हणजे निदान लालबागमधल्या वर्गातल्या तरुणांना तरी. मध्यमवर्गात काय आहे, स्टेटस्‌साठी शिकलंच पाहिजे, असं असतं. हे कामगारवस्तीत नसतं. मी एस.एस.सी.ला आहे हे सुद्धा माझ्या घरी माझ्या आईला माहीत नव्हतं. आम्ही कुठे शिकलो? आमचं काय वाईट झालं? ही वृत्ती होती. वाघ गुरुजी म्हणाले, तू नाईट स्कूलमध्ये शिकतोस. तुझी ही लंगड्या घोड्याची पैज आहे. तू शिकायला हवंस. ते माझा अभ्यास घ्यायचे. दुसरे कुणी इंग्लिश शिकवायचे. तिथे जेलमध्ये मास्तर खूप मिळाले. लहान असा मी एकटाच होतो. त्यांना विद्यार्थी म्हणून! मी मग अभ्यास केला आणि जेलमधून बाहेर पडल्यावर 51 साली एस.एस.सी.पास झालो.

जेलमध्ये दोन माणसं माझ्यावर प्रभाव टाकून गेली. एक लालबागचे कृष्णा देसाई आणि दुसरे गीतकार मजरुह सुलतानपुरी. आयुष्यातल्या काही आपल्या आठवणी असतात. ज्याला पर्सनल टचेस म्हणतात, आयुष्यभर आपल्याबरोबर राहातात त्या आठवणी. मजरुहचं इन्कम सगळ्यात जास्त होतं. जेलमध्ये आपल्या पैशांनी बाहेरून शिधा आणायला कधी कधी परवानगी होती. मजरुह स्वतःच्या पैशाने मटण आणायचे आणि आठवड्यातून दोन वेळा स्वतःच्या हातांनी आम्हां दहा माणसांना जेवण करून घालायचे.

तिसरी आठवण गुलबाबूची. प्रभादेवीला कोडॅक कंपनीच्या समोरच्या वाडीत 'दादा' म्हणून प्रसिद्ध होता. गुन्हेगारांना घरून डबे वगैरे येतात हे वाचता ना तुम्ही, तसंच. तो घरून दोन डबे मागवायचा आमच्यासाठी. नंतर मी कॉलेजला जायला लागल्यावर या गुलबाबूने मला मदत केली. कृष्णा देसाईची एक आठवण म्हणजे सर्वजण चेस खेळायचे तेव्हा तो त्यांचे गेम उधळून लावायचा. पण नंतर त्याला एवढी गोडी लागली की तो सर्वांना हरवायला लागला.

माझ्या आईचे आणि उषाताई डांगे यांचे काही पार्टीसाठी व काही ना काही छुप्या अंडरग्राउंड कार्यकर्त्यांसाठी ॲक्टिव्हिटी चालायच्या. त्यासाठी मी उषाताईंकडे –त्या दादरला प्रीतम हॉटेलजवळ राहायच्या. अजूनही डांगे फॅमिली तिथेच राहते–चिठ्ठी, निरोप वगैरे घेऊन जायचो. तेवढीच माझी पोलिटिकल इन्व्हॉलमेंट. आय वॉज नॉट इंटरेस्टेड इन बिकमिंग अ लीडर. पोलिटिकल लिटरेचर वाचण्याची मला आवडच नव्हती. टू बी फ्रँक, रोजचा पेपर वाचून आणि त्यावर चर्चा करून जे पोलिटिकल नॉलेज मिळेल ते मिळवायचं. आमच्या आईला वाचनाची आवड होती. ती तशी आम्हां भावंडात आहे. माझ्या एका भावाची, शिवाजी भोर त्याचं नाव. त्याची आणि नारायण सुर्वे यांची अगदी जीवश्च कंठश्च मैत्री. त्याने सुर्वेंना लालबाग ऑफीसमध्ये राहायला आणलं आणि माझा समज जर बरोबर असेल तर माझ्या आईने त्यांना म्युनिसिपालिटीमध्ये नोकरीला लावलं. कदाचित मी सांगतो ते चुकीचंही असू शकेल. त्यावेळेला म्युनिसिपालिटीमध्ये कपिला खांडवाला म्हणून शिक्षणाधिकारी होत्या. पोलिटिकली तिचं लेफ्ट इन्क्लिनेशन होतं.

पॉलिटिक्समध्ये असं आहे की काही माणसं तळाची असतात, काही मध्ये, तर काही वर असतात. त्यांच्यात एक धागा असतो. जे फार वर असतात त्यांना खाली उतरता येत नाही. पर्टिक्युलरली तुम्हांला उदाहरण द्यायचं तर शबाना आझमीचं. तिनं कधी लपवलं नाही की तिचा बाप कम्युनिस्ट आहे म्हणून किंवा ती पण आहे म्हणून. पण

ती चाळीमध्ये राहू शकणार का? नाही. तिच्याने जेवढं करता येईल ते तिने केलं. आलं ना लक्षात? त्या पर्टिक्युलर स्टेटस्‌ची माणसं त्याच्या पर्टिक्युलर फिल्डमध्ये वाढत असतात. पण एक ॲफिनिटी असते. पार्टीसाठी वा पार्टीतल्या माणसांसाठी शक्य ते करतात. दुसरं उदाहरण म्हणजे रजनी पटेल यांची बायको. अगदी स्ट्राँग कम्युनिस्ट. कुमुद मेहतांची थोरली बहीण. फॅमिलीच कम्युनिस्ट.

नंतर मिडलक्लास लोक. ते पार्टीसाठी काम करायचे. एक सुळे म्हणून वकील होते. ते रेग्युलर कमवायचे, पण गरजेपुरता ठेवून पार्टीला द्यायचे. गिरणी कामगार युनियनच्या वा कामगारांच्या घरच्या सुद्धा केसेस लढवायचे. आता पांढरपेशा बायकांचे रहाणं, बोलणं, खाणंपिणं, वागणं यात डिस्टिंक्ट फरक असतो. म्हणजे गिरगाव आणि गिरणगाव फरक कसा? तसा. तुम्ही कम्युनिस्ट असाल तरी हा फरक जाणवायचाच. त्याच्यातून कुणाची सुटका नाही.

आता आमची आई. लालबागसारख्या ठिकाणी तिचा जन्म झाला. कमीत कमी शिकलेली आणि पार्टीचं फुलटाईम काम करणारी पहिली बाई. युनियनची ती जॉईंट सेक्रेटरी होती. अहिल्या रांगणेकर, कुसुम रणदिवे या देखील कम्युनिस्ट फॅमिलीमधल्या, युनियनचे काम करणाऱ्या. पण त्यांच्या आणि आईच्या इन्व्हॉलमेंटमध्ये फरक होता. गिरणीतल्या बायका हा फरक बरोबर ओळखतात. माझ्या आईला त्यावेळी सगळे कामगार आणि सगळे कम्युनिस्ट पार्टीचे लोक ओळखायचे. उषा डांगे आणि आई यांचा एक खास मेळ होता. माझ्या आईचं महत्त्व पार्टीने ओळखलं आणि वाढवलं सुद्धा. त्याचं कारण तिचं पांढरपेशा बायकांपेक्षा असलेलं कामगारवर्गीय वेगळेपण.

त्यावेळी पार्टी तशी लहान होती. वेल निट होती. खेतवाडीत असलेल्या राजभवन बिल्डिंगमध्ये पार्टीचं कम्यून होतं. एकत्र जेवणाची व्यवस्था असायची. स्वत:ची भांडी, स्वत:चे कपडे स्वत: धुवायचे. इव्हन बलराज साहनींसारखे लोक होते. कैफी आझमी होते. एका रूममध्ये दोन-दोन, तीन-तीन माणसं. फॅमिली म्हणजे नवरा-बायको असले तर त्यांना एक रूम द्यायचे. सर्व विदाऊट रेन्ट. त्यावेळचे जे वातावरण होतं ना, त्यात एक अटॅचमेंट होती. आतासारखी नाही.

त्यावेळी पार्टीचे निरनिराळे फ्रंट असायचे. कामगार फ्रंट, विद्यार्थी फ्रंट. लहान मुलांच्यासुद्धा संघटना कम्युनिस्ट पार्टीने उभ्या केल्या. तुम्हांला आश्चर्य वाटेल. आजच्या प्रसिद्ध दीना पाठक तेव्हा दीना गांधी होत्या. या बालसंगोपनाच्या प्रमुख होत्या. म्हणजे दहा-बारा वर्षांच्या मुलांचे संध्याकाळी जमणारे गट. आर.एस.एस.च्या शाखा कशा? तशा. कम्युनिस्ट पक्षाचा हा पॅटर्न आता बी.जे.पी.ने उचललाय. युवक फेडरेशन, मध्यमवर्गीय संघटना, कामगार संघटना.

शिवाय एक असा गट होता जो हायली सॉफिस्टिकेटेड. ते सिम्पथाइझर पार्टीचे. पण कॅनॉट कम आऊट डायरेक्टली. काही कामं खास त्यांच्यासाठी असतात. सुरुवातीला पार्टीचं एक सेन्ट्रल कल्चरल स्क्वॉड होते. त्यात बलराज साहनी, प्रेम धवन, कैफी आझमी वगैरे ॲक्टीव्ह होते. त्यांनीच इप्टा ही संस्था सुरू केली. ते ऑल इंडिया बेसीसवर ॲक्टीव्ह होते. तर महाराष्ट्र बेसीसवर आपले अमर शेख, अण्णा भाऊ, गव्हाणकर वगैरे. इप्टा ही संस्था खूप नाटकं वगैरे करायची. त्यात अनेक कम्युनिस्ट मंडळी होती. छुपा अजेंडा लपवून वगैरे काही नाही. क्लिअर कट माइंडेड कम्युनिस्टच होते. इप्टाचे लोक आणि महाराष्ट्रातले लोक यांच्यात इंटरॅक्शन होती. एक लूज कॉन्टॅक्ट होता.

काँग्रेसवाल्यांची पण कल्चरल संस्था होती. इंडियन नॅशनल थिएटर. मामा वरेरकर यांचं पण कलापथक होतं. त्यांची मुलगी पण त्यात होती. त्यानंतर सोशालिस्टांचं पण कलापथक होतं. ते बेसिकली मध्यमवर्गीयांचे. त्यातही खालून वर गेलेली दादा कोंडके, राम नगरकर यांच्यासारखी मंडळी होती. निळू फुले होते. सर्व पोलिटिकल माइंडेड ऑनेस्ट लोक. इंडियन नॅशनल थिएटर जरा बड्या माणसांचं होतं. पैसा होता. दे कुड अफोर्ड टू स्पेंड मनी.

आमच्या पार्टीचे सेन्ट्रल स्क्वॉड पुढे दोन भागांत पोलिटिकली विभागलं गेलं. मग कलापथकं पण लूजली वेगळी झाली.

कृष्णा देसाईची आणि माझी जेलमध्ये दोस्ती झाली होती. ते लालबागचेच ना. आम्हां चौघांची घनिष्ठ दोस्ती होती. कृष्णा देसाई, विनायक पाटील, मनोहर तुंगारे आणि मी. आम्ही चौकड म्हणूनच प्रसिद्ध होतो. कलापथकात माझा भाऊ होता. नारायण सुर्वे होता, परब होता, गणपत राऊळ होता. माझी कल्चरल फील्डमध्ये डेव्हलपमेंट होत होती. कारण मी तिथे कॉन्सट्रेट केलं.

एकदा आमचा एक चारपाच दिवसांचा प्रोग्रॅम होता. म्हणजे फेस्टीवलच. नाच, गाणं, रांगोळी प्रदर्शन. बलराज साहनी आमच्या पार्टीचे. त्यांना बोलवायचं ठरलं. त्यांनी सांगितलं होतं, आधी कन्फर्म करा. पण ते न करताच आम्ही बेधडक त्यांचं नाव दिलं. मग त्यांना आणायला मी गेलो. त्यांनी यायचं रिफ्यूझ केलं. म्हणाले, तुम्ही कन्फर्म नाही केलंत. मी काही हललोच नाही. म्हटलं, मी परत जाऊच शकत नाही. तोंडच दाखवू शकणार नाही लालबागमध्ये. शेवटी त्यांना माझी दया आली. म्हणाले, मी येईन. पण माझ्या मोटार सायकलने एवढ्या लांबवर आता येऊ शकणार नाही. मी थकलो आहे. तू मला टॅक्सीने घेऊन जायचं आणि टॅक्सीने सोडायचं. कबूल? त्यावेळी त्यांच्याकडे गाडी नव्हती. मी बोललो मंजूर. ते आले. त्यांनी भाषण केलं. मग परत पोचवताना टॅक्सीत त्यांनी माझं नाव विचारलं. मी सांगितल्यावर त्यांनी विचारलं पार्वतीबाई भोरांचा तू कोण? मी जेव्हा सांगितलं की मी त्यांचा मुलगा आहे, तेव्हा ते म्हणाले, तू आधी का नाही सांगितलंस मला? नंतर येऊन भेट. मी सांगितलं मी इंटर झालोय. मला वाटलं त्यांनी बोलावलं म्हणजे फॉर्मालिटी. मी काही गेलो नाही. मग दुसऱ्या एका प्रोग्रॅममध्ये त्यांची भेट झाली. म्हणाले, 'काय रे, तू आला नाहीस?' मग गेलो. मला वाटलं, त्या फिल्मलाईनमध्ये काम मिळेल. पण त्यांनी सुरुवातीलाच सांगितलं की तू शिकावंस अशी माझी इच्छा आहे. मी रूपारेलला बी.एसस्सी.साठी ॲडमिशन घेतली. त्यांनी मदत केली. मग मला स्कॉलरशिप मिळाली. मी एम.एसस्सी.केलं, बायोकेमिस्ट्रीमध्ये.

आमच्या पार्टीच्या कलापथकाचे किती प्रोग्रॅम व्हायचे असं सांगता नाही यायचं. पण मिटिंग असली किंवा कोणी पुढारी यायचा असला तर तेव्हा अशी पद्धत होती की सुरुवातीला गाण्याचा प्रोग्रॅम व्हायचा, मग पुढाऱ्यांची भाषणं व्हायची, मग शेवटी तमाशा. माणसं जमवायला गाणी आणि भाषणं न ऐकता लोक पळून जाऊ नयेत म्हणून, भाषणानंतर तमाशा असायचा. लोक बरेचदा फक्त तमाशासाठी यायचे!

गावात उरूस, जत्रा भरते ना तसा इलेक्शनच्या मिटिंगचा माहोल असायचा. मुंबईच्या निरनिराळ्या भागांतून म्हणजे लालबाग, प्रभादेवी, नायगाव, शिवडी इथून मिरवणुकीने लोक यायचे, रॅलीसाठी, त्यांच्या कलापथकांबरोबर. मग मिटिंगच्या आधी सर्व कलापथकांना एक एक गाणं म्हणायला लागणार. मग भाषण, मध्ये प्रोग्रॅम, असं. मोठा सोहळाच होता. त्यात भाषणं म्हणजे अनअव्हॉइडेबल हा भाग निराळा!

स्टॅलीनवर, रशियावर गाणी असायची. ती अगदी सोपी. लोकांना न कळण्यासारखं त्यात काही नव्हतं. रशियाबद्दल ॲफिनिटी सर्वांनाच होती त्यावेळेला. काहीतरी नवं होतं ते. आणि कम्युनिस्ट ॲक्टीव्हिटी तेव्हा जोरात होत्या. म्हणजे कुठलाही प्रश्न हातात घेतला तर सरळ रस्त्यावर उतरणार. लोक पेपर वाचायचे. नवाकाळ आणि संध्याकाळ हे गिरणगावचे दोन पेपर. हे कामगारांचे पेपर. तत्त्वज्ञान कळत नसलं तरी जगात काय चाललंय ते कळायचं. त्यावेळी कलापथकातले लोक एकत्र काम करायचे, त्यांना जातीधर्माचं फारसं नव्हतं. कुवतही महत्त्वाची मानली जायची. आता अमर शेख मुसलमान, अण्णा भाऊ साठे मांग आणि गव्हाणकर म्हणजे संपूर्ण मध्यमवर्गीय. हा मेळ बसणं एरवी अशक्य. पण एका ध्येयासाठी, कामासाठी आपापल्या कुवतीचा आपण कसा उपयोग करू शकतो ही भावना महत्त्वाची होती. आमचं जे

लालबाग कलापथक होतं त्याच्यातर्फे आम्ही गोवा आंदोलनावर 'ज्वाला' नाटक बसवलं. हे नाटक मी विनायक पाटीलकडून अ‍ॅक्चुअली लिटरली लिहून घेतलं. कृष्णकांत दळवी हा फक्त बाहेरचा घेतला. बाकी सगळे लालबागचेच होते. राज्यस्पर्धेत दादर केंद्रावर या नाटकाला बक्षीस मिळालं. त्याचा प्रयोग आम्ही नागपूरला केला. दिल्लीच्या इप्टाच्या कॉन्फरन्समध्ये पण आम्ही हे नाटक घेऊन गेलो. तोपर्यंत आम्ही फारशी बाहेरची माणसं घेत नव्हतो. लालबाग कलापथक उभं राहिलं तेव्हा ती पार्टीची प्रचाराची कल्चरल ऑर्गनायझेशन होती.

आता मामा वरेरकरांचे कलापथक प्रोफेशनल होतं. शाहीर साबळे, राजा मयेकर, डिलायल रोडला रहाणारे. वरेरकरांच्या पथकात प्रोफेशनल आर्टिस्ट असायचे. काँग्रेसचंच कलापथक प्रोफेशनल पैसे घेऊन कार्यक्रम करायचं. नवरात्री, गणपती उत्सव, यांमधल्या संस्था त्यांना पैसे द्यायच्या. आम्हांला पण नाईट मिळायची, पण ती एवढी नाही. म्हणजे आमच्या आर्टिस्टना वगैरे आम्ही पे नाही करू शकायचो.

त्यावेळची रिलेशन्स कशी होती ते मी तुम्हांला सांगतो. आम्ही नंतर शिरवाडकरांचं 'वैजयंता' नाटक केलं. तेव्हा आम्ही गिरगावमधल्या आय.एन.टी.(इंडियन नॅशनल थिएटर) ची मदत घ्यायची ठरवली. त्यावेळी सरळ सरळ दोन विभाग होते. गिरगाव आणि गिरणगाव. गिरगाव मध्यमवर्गीय आर्थिक सुखाचे, आम्ही गिरणगावचे कामगार वस्तीतले. आय.एन.टी.तले बबन प्रभू, आत्माराम भेंडे वगैरे. बबन प्रभू इंजिनियर होते. हे लोक परीक्षक मंडळात होते म्हणून आम्हांला ओळखत होते. 'पोरं करू शकतील' म्हणाले. मग बर्माशेलमध्ये आडारकर म्हणून होते, ते सेट डिझायनर होते. त्यांच्या कल्पनेप्रमाणे आम्ही सेट डिझाईन, लाइटिंग सगळं केलं. म्हणजे त्या लेव्हलची माणसं देखील आम्ही आणली.

हे नाटक म्हणजे पार्टीचा प्रचार नव्हता. तरी ते प्रोग्रेसिव्ह होतं. त्यात स्त्रीचे स्वतंत्र व्यक्तिमत्त्व आहे, तिचे हक्क काय, मर्यादा काय, असे प्रश्न होते. पण शेवटी मध्यमवर्गीय नाटक होतं ते. आम्हांला न पचणारं, आमच्या कुवतीच्या बाहेर. या सगळ्या खर्चासाठी आम्ही पर्सनल लोन्स आणली होती. मीच सगळ्यात जास्त आणली होती. ती फेडता फेडता एवढा त्रास झाला की मी या फील्डला कोपरापासून नमस्कार केला. आणि माझं लग्नही झालं होतं त्याच सुमाराला.

**नारायण सुर्वे (वय 78 वर्षे)**

गिरणगावच्या मुशीत घडलेले आंतरराष्ट्रीय ख्यातीचे कवी. भूपेश गुप्ता भवनमधल्या लोकवाङ्मय गृहाच्या कार्यालयात त्यांची मुलाखत घेतली गेली.

मी गेल्या 55 वर्षांपासून गिरणी कामगारांच्या चळवळीत आहे. नुकतंच 1942चं आंदोलन संपलेलं होतं. आणि मी बेकार होतो. ना घर ना दार. ना पुढे कोणी. ना मागे कोणी. मी गिरण्यांतून काम करून करून हळूहळू गिरणी कामगारांच्या चळवळीत आलो. त्यावेळेस गिरणी कामगार युनियन ही सर्वात मोठी युनियन होती. महाराष्ट्रामध्ये त्याला लाल बावटा म्हणतात. मी पहिल्यांदा गिरणीमध्ये कामाला लागलो तो कोहिनूर मिल नं.3 मध्ये. तिथे आमचं खातं सांभाळणारे वामन सावंत होते. ते लेखकही होते आणि युनियनचं कामही बघायचे. त्यांच्याबरोबर मी वाइंडिंगमध्ये कामाला लागलो. तिथेच मी गिरणी कामगारांची पहिली पावती फाडली. असा हळूहळू गिरणी कामगारांच्या चळवळीत शिरलो. आणि आता बघा, हा कालखंड 55 वर्षांचा झाला आहे. स्वत: कामगार होतो म्हणून डाव्या आणि कम्युनिस्ट चळवळींशी मी जोडला गेलो. तेव्हा कम्युनिस्ट पक्षाची रेडगार्ड नावाची संघटना होती. त्या रेडगार्ड संघटनेत मी देखील गार्ड म्हणून गेलो. तेव्हा कम्युनिस्ट पक्षाचं ऑफीस राजभवन, खेतवाडीत होतं. तो पी.सी.जोशींचा कालखंड होता. पूरणचंद्र जोशी. मला तिथे घेतलं कामाला दारावर. काय पाहिजे? कोण पाहिजे आपल्याला? वगैरे विचारायचं. वर जाऊन चिठ्ठी पोहचवायची. बोलावलं तर वर सोडायचं, असं काम. रहाण्याची व्यवस्था तिथेच राजभवनवर. तिथे जेवण वगैरे करायची आमची माई. हो, माई म्हणायचो आम्ही तिला. जेवणाची व्यवस्था चांगली होती.

1943-44-45चा कालखंड आहे. दुसरं महायुद्ध जोरात

चालू होतं तेव्हाचा. 'लोकयुद्ध' नावाचं आमचं वर्तमानपत्र निघायचं. मराठीत 'लोकवाङ्मय' हिंदीतून 'जनयुद्ध'. मी होतो त्या राजभवनमधून ही साप्ताहिकं निघायची. ती वाचल्यामुळे डायरेक्ट राजकारणात काय चाललंय त्याचं एक भान आलं व वाचनाचं भान आलं. एक दृष्टिकोन मिळाला.

याच दरम्यान आपल्याला असं चित्र दिसतं की कम्युनिस्ट पक्षाला वाटायला लागलं की केवळ राजकीय किंवा आर्थिक बाजूंशी संबंधित रहाण्यापेक्षा आपल्याला कलेचं व्यासपीठही वापरता येईल. एकदा हे लक्षात आल्यावर त्यांनी माणसं जोडायला सुरुवात केली. मग तिथे अण्णा भाऊ साठे, अमर शेख अशी माणसं आली आणि लाल बावटा कलापथक सुरू केलं. अण्णा भाऊ म्हणजे मातंग समाजातले, बरं का? वाटेगावचे. कासेगावजवळ वाटेगाव येतं, तिथले. त्यांनीच लिहिलंय एका ठिकाणी, 'बापाचं बोट धरून चालत चालत मुंबईला आलो, तेव्हा मुंबईत संप चालू होता. कामगार म्हणून नोकरी तरी मिळेल म्हणून आलो. मोरबागच्या गिरणीमध्ये. तिकडे डांगे यांच्या पत्नी उषाताई होत्या. म्हणाल्या, तुम्ही गिरणीत जाऊ नका. नाहीतर मला ओलांडून जावं लागेल. मी गेलो ओलांडून, उडी मारून गेलो. म्हटलं, कसंतरी होऊन मला नोकरी मिळू दे. म्हणजे आधी मी संपफोड्या होतो. नंतर जन्मभर संपावर राहिलो.' असं फार सुरेख वर्णन केलंय त्यांनी. अशी ती माणसं. आता अमर शेख. ते क्लिनर होते. प्रायव्हेट बसेसमध्ये. पण त्यांना लिहिण्याची, बोलण्याची आवड होती. ते मूळचे कोल्हापूरचे.

अशी सगळी मंडळी कम्युनिस्ट पक्षात होती. तो सगळा पी.सी.जोशींचा काळ. त्यांना एक दृष्टिकोन होता. त्यांच्याच काळात आपली जुनी लोककला, जननाट्य, जननाट्य संघ, युनियन थिएटर वगैरे संस्था देशभर सुरू झाल्या.

कामगारांना काय देता येईल ते पाहिलं जायचं. उदाहरणार्थ, अण्णा भाऊंचा 'अकलेची गोष्ट' हा तमाशा केवढा गाजला महाराष्ट्रात! पुढे मग हे जननाट्य लोकलढ्याशी जोडलं गेलं. जसं संयुक्त महाराष्ट्र चळवळ.ह्या चळवळीमध्ये अण्णा भाऊ, अमर शेख, गव्हाणकरांचं कार्य फार मोठं आहे. 'माझी मुंबई' हा अण्णा भाऊंचा तमाशा फार गाजला तेव्हा. पुढे पुढे मोरारजी सरकारने तो बंद केला. हे लोक सहासहा महिने भूमिगत राहिले इतका त्याचा प्रभाव होता. आचार्य अत्रेंनी त्याचा फार मोठा गौरव केला. अशा प्रकारे कलापथकांचं माध्यम घेऊन आपापल्या विचारांचा प्रचार करणं चालू होतं. आणि ते पोहचतही होतं. तेव्हाच अन्य भारतीय भाषांतून लिहिणारे लोकही यात आले होते. चित्रपटातले साहिर लुधियानवी आहे. प्रेम धवन आहे, मुंबई एक असं केंद्र आहे, जिथे सगळीकडून आलेले लोक सापडतात.

महाराष्ट्रात हे आंदोलन सर्वात अधिक यशस्वी झालं. याचं कारण म्हणजे आम्हांला इथल्या लोकल कलांमधून पुढे आलेले कलावंत मिळाले. पण त्यांच्यात पुढे असं झालं की पक्षाशी संबंधित असलेल्या या कलापथकांवर स्वाभाविकच त्या पक्षाची छटा आली. त्यामुळेच मग पुढे पुढे अण्णा भाऊ, अमर शेख यांच्यामध्ये मतभेद झाले. शिवाय त्याचवेळेस आमचे पक्ष निवडणुकीचं साधन म्हणून कलापथकांना वापरायचे. हे झालं नसतं, तर त्याला स्वार्थी रूप आलं नसतं. पण असा गरजेपुरताच त्याचा वापर झाला. या कलापथकाने नाटक करून, गाणी गाऊन, पोवाडे म्हणून, हजारो लोक गोळा करायचे आणि त्यांनी जाऊन व्याख्यानं द्यायची. त्याला एक अधिक बेसिक रूप देता आलं असतं. कारण जुन्या कलेला उजाळा देणं काय किंवा नव्या कलेची मांडणी करणे काय, हेच काम जास्त गरजेचं आहे. त्याला एक अधिक सुसंगत आणि अधिक भक्कम प्रयोजन आहे. कलावंत जातो येतो. पण विचार राहतो. व्यासपीठ राहतं. पण पक्षानं काही त्याकडे लक्ष दिलं नाही. कारण पक्षाची कलेमध्ये काही भूमिका आहे याचा त्यांनी विचारच केला नाही, असं माझं स्पष्ट मत आहे. साहित्याकडे बघण्याची पुढाऱ्यांची दृष्टी कशी होती? तर वा! अण्णा भाऊ फार छान गण गवळण लिहितात. बस्स. त्यापेक्षा खोलात जाऊन विचार केला नाही. यातच पुढाऱ्यांची अक्षमता

दिसते. असं झालं नसतं तर ते व्यासपीठ अजून जिवंत राहिलं असतं.

आणखी एक दुर्दैव. मला असं वाटतं, की पक्षामध्ये काही मतभेद झाले की पक्षाबरोबर जे कलाकार जोडलेले असतात त्यांच्यातही मतभेद होतात. त्यांचे दृष्टिकोन बदलले की मग फाटाफूट किंवा इकडे तिकडे पांगण्यामध्ये त्याची परिणती होते. नंतरही ते टिकून राहिले ते व्यक्तिगत पातळीवर, त्यांच्याकडे कला असल्यामुळे, ओरिजिनॅलिटी असल्यामुळे. मग काही फिल्ममध्ये गेले. काही नाटकात गेले. पण संयुक्तपणे जो प्रचार या सामूदायिक माध्यमातून होणार होता याची लिंकच तुटली.

ह्या सगळ्याचा विचार माझ्या मते 1934 किंवा 1935 साली महाराष्ट्रात, विशेषतः मुंबईत प्रोग्रेसिव्ह रायटर्स असोसिएशनकडून झाला. यात लालजी पेंडसेंचा पुढाकार होता. प्रभाकर पाध्ये, अनंत काणेकर वगैरे मंडळी त्यात होती. त्या सगळ्यांना वाटलं की मराठी साहित्यामध्ये पुष्कळशी त्रुटी आहे. यापेक्षाही काही वेगळं लिहायला पाहिजे. अशा विचारांच्या प्रभावाचा तो काळ होता. एक ऊर्मी त्यात होती. त्या ऊर्मीमुळे या सगळ्या मध्यमवर्गातून आलेल्या नव्या दृष्टिकोनातून बघणाऱ्या लेखकांना हे बहुजन साहित्य आपलंसं वाटे.

लालजी पेंडसेंनी ‘साहित्य आणि समाजजीवन’ असा एक चांगला ग्रंथ लिहिला. त्याच्यावर खूप मोठी चर्चा झाली. वादविवाद झाले. फडक्यांनी मग ‘पुरोगामी कशाला म्हणतात’ वगैरे लेख लिहिला. त्यावर आचार्य जावडेकरांनी ‘पुरोगामी साहित्य’ असं दुसरं पुस्तक लिहिलं. पण ती सगळी क्षणिक, पेल्यातली वादळं ठरली. अर्थात त्यातून वर्किंग क्लासमधले नवे लेखक पुढे आले. ‘कामगार म्हणजे त्याला फक्त काय कळतं, तर तो आर्थिक लढ्यात असतो, दारू पितो, घरी जाऊन बायकोला मारतो’ अशी जी गिरगावी साहित्यात समजूत दिसते त्याला या ‘गिरणगावी’ साहित्यातून उत्तर मिळालं. पण ते तिथेच सगळं थांबलं.

माझा लेखनाचा कालखंड सुरू झाला 1950 साली. तेव्हा मी टाटा मिलमध्ये होतो. कामगार चळवळी जोरात सुरू होत्या. त्यांच्याशी जोडला गेलो. त्यातून काही करण्याची गरज वाटू लागली. म्हणून मी, अमर शेख वगैरेंनी पुढाकार घेऊन ‘युगदीप’ नावाचं मासिक काढलं. न.र.फाटक आमचे संपादक होते. आचार्य अत्रे वगैरे मंडळी कायम पुरोगामी चळवळीशी प्रामाणिक राहिली. अत्र्यांनी त्यांच्या ‘मी उभा आहे’ नाटकात भाई टोळ वगैरे सारखी कम्युनिस्टांची टिंगल करणारी पात्रं लिहिली होती. पण चळवळींच्या ते सतत बरोबर होते. एकदा समितीच्या भाषणात ते म्हणाले होते की मी काँग्रेसबरोबर जाणार नाही, पण कम्युनिस्टांबरोबर नरकातही जायला तयार आहे. पण हे समजायला आमचं आकलन तोकडं पडलं. बरं, दुसरीकडे मध्यमवर्गीय लेखकांचा जो गट होता तो कायम आमच्याकडे संशयाने बघायचा. की हे प्रचारी लोक आहेत. असा सगळा तो गुंतागुंतीचा प्रकार होता. अनंत काणेकर, प्रभाकर पाध्ये, पां.वा.गाडगीळ, पु.य.देशपांडे वगैरे लेखक तसे मार्क्सवादीच होते. पण पार्टीच्या बाहेर होते. त्यांनाही आम्ही समजून घेतलं नाही. पुढे बेचाळीसच्या लढ्यात भाग न घेण्याच्या भूमिकेमुळेही आमचं खूप नुकसान झालं. हे असे झापड लावलेले नेते होते. त्याचाच परिणाम म्हणून पुरोगामी लेखक संघ पुढे टिकला नाही.

आमच्या प्रयत्नात सातत्य नव्हतं. तेव्हाच्या मध्यमवर्गाने जो मार्क्सिझम स्वीकारला त्याला फॉलोअर्स मिळाले नाहीत. खरं तर महाराष्ट्रातला मध्यमवर्ग हा नेहमीच लिबरल वृत्तीचा राहिला आहे. इथे प्रबोधनाची परिस्थिती असताना हा मध्यमवर्ग अधिक जोमाने आमच्याबरोबर यायला हवा होता. तो आला नाही. कारण आमच्या पुढाऱ्यांना नीट आकलन झालं नाही. तुम्हांला आश्चर्य वाटेल, गेल्या पंधरा वर्षांतच आंबेडकर आणि फुले यांची चर्चा पक्षात व्हायला लागली आहे. तत्पूर्वी हे नेते होते की नव्हते इतिहासात?

1935-36 साली रवींद्रनाथ टागोर यांच्या आशीर्वादाने आणि मुन्शी प्रेमचंद यांच्या अध्यक्षतेखाली पुरोगामी लेखक

संघ स्थापन झाला. देशभर जिथे जिथे बुद्धिजीवी वर्गात कम्युनिस्ट विचारसरणीचा आणि पक्षाचा प्रभाव होता तिथे पुरोगामी लेखक संघाच्याबरोबरीने लोकनाट्य परिषद आणि सोविएत मित्र संघ या संघटना कार्यरत होत्या. हिंदी, बंगाली, उर्दू, तेलगू, मल्याळम अशा भाषांमधून या संघटनांना जोर होता. मुंबईत मुल्कराज आनंद, ख्वाजा अहमद अब्बास, कैफी आझमी, सज्जाद जहीर, शैलेंद्र यांच्यासारखे लेखक आणि बलराज साहनी, दीना आणि शांता गांधी असे कलावंत या तीन संघटनांशी संबंधित होते. परंतु इथले मराठी लेखक-कलावंत मात्र या संघटनांपासून दूरच राहिले. आणि पक्षाने देखील पुरोगामी मराठी लेखक कलावंतांना एकत्र आणण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न केला नाही. स्त्रीस्वातंत्र्याच्या पुरस्कर्त्या लेखिका, अस्पृश्यतेविरोधी भूमिका असणारे लेखक हे सर्व केवळ काटेकोर वर्गीय दृष्टिकोनातून विचार न मांडल्याने पक्षाच्या नजरेला आले नाहीत.

परंतु पक्षाच्या मर्यादित कलादृष्टीच्या पलीकडे जाऊन अमराठी लेखक कलावंतांनी आपली कलानिर्मिती केली. तशी स्फूर्ती मराठी लेखकांना का मिळाली नाही? याचं नेमकं उत्तर मिळत नसलं तरी ऊर्ध्वरेषे यांनी गांधीजींच्या 1942च्या चलेजाव चळवळीबद्दल पक्षाने घेतलेल्या विरोधी भूमिकेला काही अंशी जबाबदार धरलं आहे. मराठीतले सामाजिक बांधिलकी मानणारे अनंत काणेकर, प्रभाकर पाध्ये, साने गुरुजी, पां.वा.गाडगीळ, पु.य.देशपांडे हे पार्टीच्या फार जवळ येऊनही बेचाळीसमध्ये पार्टीच्या एकांगी आणि अतिजहाल धोरणामुळे पार्टीपासून दूर गेले. त्यामुळे महाराष्ट्रात पुरोगामी लेखक संघ, लोकनाट्य संघ ही आंदोलनं उभीच राहिली नाहीत. खऱ्याखुऱ्या व्यापक अर्थाने राष्ट्रीय स्वातंत्र्याचा, सामाजिक समतेचा, अस्पृश्यतानिर्मूलनाचा, स्त्रीमुक्तीचा, बुद्धिवादाचा पुरस्कार करणारे सर्वच विचारवंत, लेखक, कवी कलावंत यांची संयुक्त आघाडी उभारण्याचा दृष्टिकोन पार्टीने स्वीकारला असता तर वि.स.खांडेकर, आचार्य जावडेकर, आचार्य अत्रे, साने गुरुजी, न.र.फाटक, मालतीबाई बेडेकर, वीर वामनराव जोशी, कुसुमाग्रज यांच्यासारखे अनेक नामवंत साहित्यिक या व्यासपीठावर येऊन साहित्याच्या आणि कलेच्या क्षेत्रात त्यांनी खरेखुरे प्रगतिशील वातावरण निर्माण केले असते.[18]

**वसंत भोर (वय 75 वर्षे)**

कम्युनिस्ट पक्षाच्या सांस्कृतिक पथकात बरीच वर्षं कार्यरत.

काही वर्षांनी आमच्या पार्टीचं सेंट्रल स्क्वॉड पोलिटिकली दोन भागांत विभागलं गेलं. मग पार्टीच्या कलापथकाचे सुद्धा दोन ग्रुप झाले. तसे मनाने एक होते, पण अण्णा भाऊ साठे आणि गव्हाणकर यांचा एक ग्रुप झाला तो डाव्या कम्युनिस्टांबरोबर. उजव्यांबरोबर अमर शेख. मी अमर शेखबरोबर. मी तेव्हा कॉलेजमध्ये होतो. माझी फर्स्ट इयर, इंटर ही दोन वर्षं मी अमर शेखबरोबर महाराष्ट्रभर प्रोफेशनल सिंगर म्हणून काम केलं. म्हणजे एका शोचे वीस रुपये मला दिले जायचे. अमर शेखांचं हे स्वत:चं कलापथक होतं. म्हणजे पार्टीच्या कार्यक्रमाचे पैसे घ्यायचे नाहीत. पण, जे गावातले इतर म्हणजे जत्रेचे किंवा फंक्शनचे पैसे घ्यायचे. पार्टीचे कार्यक्रम आम्ही मे दिन वगैरेला करायचो. नरेपार्क, कामगार मैदान इथे रॅली व्हायच्या. त्याचे काही पैसे नाही घ्यायचे. अमर शेख हे फॅमिली मॅन होते. मुलं होती. शेवटी फुलटाईमर म्हणून किती मिळणार? मग थोडा बिझनेस पण बघितला. खरोखर, त्यांचा आवाज म्हणजे अगदी बुलंद आवाज होता. त्याला महाराष्ट्रात तरी कोणी कॉम्पिटिटर नव्हता. त्यांनी इतर कलापथकं पण डेव्हलप केली. दादरला होते ते विसू राजे बघायचा. मग प्रभादेवीमध्ये भास्कर मुणगेकर वगैरे मंडळी बघायची. आमचं लालबागचं कलापथक होतं. शिवडीचं होतं, पण फारसं नावाजलेलं नव्हतं. अशी निरनिराळी डेव्हलप झालेली कलापथकं इलेक्शनच्या पिरियडमध्ये खूप कामं करायची; विदाऊट कलापथकं, मिटिंग कधी व्हायच्याच नाहीत.

महाराष्ट्रभर अमर शेखांची ही कलापथकं डेव्हलप करण्याचं अॅडमिनिस्ट्रेशन माझ्यावर आलं. हे ऑर्गनायझेशन, मॅनेजमेंट टाईप होतं. स्थानिक लोकांना, गायकांना आम्ही

पुढे करून ही पथकं उभारली. अमर शेखचा प्रोग्रॅम म्हणजे अमर शेखच असं हार्ड ॲण्ड फास्ट नव्हतं. आम्ही मराठवाड्याचा दौरा केला तेव्हा मी आणि अमर शेख दोघंच होतो. पण मराठवाड्याची माणसंच होती दौऱ्यावर. त्यावेळेला गरज म्हणूनच ही कलापथकं डेव्हलप झाली. तो माहोलच होता तसा म्हणून गरज होती. महाराष्ट्राच्या जिल्ह्या-जिल्ह्यामधून अमर शेखांमुळे कलापथकं निर्माण झाली. अमर शेख पक्षाच्या पाठिंब्याने लोकप्रिय झाले. त्याचबरोबर त्यांच्यामुळे पक्षाला तळागाळात लोकप्रियता मिळाली हेदेखील सत्य. अमर शेखांच्या अकाली मृत्यूमुळे पक्षाच्या मूलाधारालाच हादरा बसला.

### शेख जैनू चांद (वय 63 वर्षे)

(गिरणगावचे शाहीर. शाहीर अमर शेखांचे एकेकाळचे सहकारी. 2006मध्ये निधन.)

1969 साली अमर शेख वारले. एका अपघातात. मी होतो तेव्हा. आम्ही चाललो होतो बार्शीजवळच्या वैराग गावाला कार्यक्रमासाठी. पुण्याजवळ यवत नावाचं गाव आहे. तिथे जेवण वगैरे केलं. तिथले लोक सांगत होते की तुम्ही आता थांबा, रात्र आहे. पण अमर शेख म्हणाले, मला लवकर जायला पाहिजे. काम आहे. त्या घाईघाईत आम्ही निघालो. नारळीपौर्णिमेचा दिवस होता. श्रावण महिना. पाऊस रिमझिम पडत होता. आमची छोटीशी जुनी स्टेशनगाडी होती. एका वळणावर, इंदापूरजवळ ती गाडी निसटली आणि तो अपघात झाला. आम्ही जागे होतो ना सगळे. सगळं आमच्या डोळ्यांसमोरच झालं. गाडी उलटी झाली पूर्ण. अमर शेख जाग्यावरच गेले. हिचे (केशरचे) वडील दुसऱ्या दिवशी ससून हॉस्पिटलमध्ये वारले. मी, अमर शेखची मुलगी प्रेरणा आणि वसंत आचरेकर, आम्ही तिघे चांगले होतो. म्हणून सगळ्यांना ससूनमध्ये आणू शकलो. नाहीतर कोण बघतो रात्रीचं काय झालं ते. सर्वजण येईपर्यंत मी रक्ताचे कपडे घेऊन बसलो होतो. 18 ऑगस्ट 1969 ही तारीख होती. 34 वर्षं झाली या गोष्टीला.

### केशर जैनू (वय 60 वर्षे)

शाहीर अमर शेख कलापथकात सक्रिय.

मी तर बेशुद्धच होते. हे नाक आणि ओठाचा भाग तुटून लोंबत होतं. तीन टाके मारून ते नाक बसवलं, आणि मला पुण्याला आणलं. तिथेच तीन महिने मला ठेवलं होतं. कसेतरी टाके मारले होते इकडचे तिकडे करून. मग अमर शेखची मुलगी प्रेरणा आली आणि तिने मला मुंबईला आणलं. इथे परत मला केईएममध्ये ॲडमिट केलं. तिकडे आंबोडकर डॉक्टर होते. ते म्हणाले, ‘केशर, घाबरू नकोस, तुझं नाक तुझ्यासारखं करून देतो अगदी. तीन वेळा ऑपरेशन केलं. थोडीशी खूण राहिली फक्त. 31 वर्षांची होती मी तेव्हा.

अमर शेख वारले, वडील वारले, आता आम्हांला वालीच उरला नाही.

**- मौज पब्लिकेशन्स यांच्याकडून साभार**

▪ ▪ ▪ ▪ ▪





